नं० /१४८

# सार्थ प्राकृत प्रकाश.

हा ग्रंथ

शंकर रामचंद्र हतवळणे

ह्यांनीं केला

तो

पुणें येथें 'चित्रशाळा' छापखान्यांत छापिला.

इ० स० १९००

किंमत आठ आणे.

२०४

# सार्थ प्राकृत प्रकाश.

हा ग्रंथ

## शंकर रामचंद्र हतवळणे

ह्यांनीं केला

तो
पुणें येथें 'चित्रशाळा' छापखान्यांत छापिला.

इ० स० १९००

किंमत आठ आणे.

# प्रस्तावना.

—○*○—

संस्कृत भाषेच्या अभ्यासापासून प्राचीन आचारविचार, इतिहास वगैरे गोष्टींविषयीं माहिती मिळून कोणते लाभ झाले आहेत, हें सर्वांस माहीत झालें आहे. संस्कृताचा अभ्यास दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे, ही संतोषाची गोष्ट आहे. परंतु त्याबरोबर प्राकृताचाही अभ्यास, तितका नाही तरी, थोडाबहुत जरी चालू असता, तरी आनंद मानण्यासारखी गोष्ट झाली असती. संस्कृत ही विद्वानांची भाषा; व तिच्या अध्ययनाने त्यांचे आचारविचार वगैरे कळण्यास मार्ग आहे; परंतु एक काळीं जी प्राकृत भाषा सामान्य लोकांची बोलण्याची भाषा होती, ती समजून त्यांचे आचारविचार वगैरे कळण्याची आवश्यकता नाही काय ?

संस्कृत ही संस्कारयुक्त उदात्त भाषा म्हणून तिचाच आदर करावयाचा व प्राकृत ही अडाणी लोकांची वेडीवाकडी भाषा असें समजून तिचा अनादर करावयाचा, हें इष्ट नाही. प्राचीन विद्वानांपैकीं बहुतेकांनी प्राकृताचा अनादर केल्यामुळें इतिहासदृष्ट्या केवढें नुकसान झालें आहे, तें सांगण्याचें कारण नाही. प्राकृताची त्यांस जरूरी वाटली नसावी, किंवा दुसऱ्या कोणत्या तरी कारणामुळें त्यांस तिकडे लक्ष देतां आलें नसावें. हें काहीं असो.

जो तोटा झाला आहे तो फार आहे. पूर्वींच्या विद्वानांच्या हयगयीबद्दल त्यांस दोष देण्यांत तात्पर्य नाही. त्यांस प्राकृताच्या अभ्यासाची विशेष आवश्यकता वाटली नाही; परंतु ती आह्मांस वाटूं नये काय ? आज मराठी भाषेचें जें रूप बनलें आहे, त्यास फक्त संस्कृताचीच मदत नसून प्राकृत भाषेचीही पुष्कळ मदत आहे. तेव्हां संस्कृताबरोबर प्राकृताचेंही अध्ययन चालू असलें पाहिजे. निदान मराठीचें शिक्षण देण्याचें काम ज्यांकडे आहे त्यांनी हें अध्ययन करणे फार अवश्य आहे.

मुळांतच एक चूक झाली आहे असें दिसतें. ती ही कीं, प्राकृत भाषा म्हणजे संस्कृतापासून अपभ्रंश होऊन जी भाषा बनली ती भाषा; ही भाषा प्राकृत जन ह्मणजे सामान्य लोक बोलत; तेव्हां सामान्य लोकांची भाषा म्हणजे संस्कृतापासून अपभ्रंश होऊन बनलेली भाषा, असा समज आहे. परंतु वस्तुस्थिती अशी नाही. आर्य लोक ह्या देशांत येण्यापूर्वीं ह्या ठिकाणीं मूळचे लोक होते. त्यांची वेडीवाकडी कशीबशी भाषा होती. तिचा व संस्कृताचा अर्थाअर्थी संबंध नव्हता. आर्य व मूळचे लोक ह्यांचा निकट संबंध मागाहून झाला. तेव्हां मूळच्या लोकांच्या भाषेंतले कित्येक शब्द संस्कृतांत येऊन ते संस्कृतच बनले असले पाहिजेत. उलट पक्षीं संस्कृतापासून अपभ्रंश होऊन काहीं नवीन शब्द बनले व त्यांसमात्र प्राकृत हें नाव देणे योग्य आहे.

मूळच्या लोकांच्या बोलण्यांतील शब्द ते देशज, व संस्कृतापासून अपभ्रंश होऊन आलेले शब्द प्राकृत. तेव्हां प्राचीन काळच्या सामान्य लोकांची भाषा निवळ प्राकृत नसून देशज व प्राकृत शब्दांचें मिश्रण होऊन बनलेली होती. प्राकृत शब्दांच्या संबंधाने काहीं तरी व्यवस्था दिसून येते, तशी देशजांच्या संबंधाने दिसून येत नाही. असो. हिंदुस्थानांतील हिंदी, बंगाली, मराठी, गुजराथी, पंजाबी, सिंधी, उर्दू व मराठी ह्या भाषांत जे कित्येक शब्द प्राकृताच्या द्वारें आले आहेत, त्यांचें उत्तम ज्ञान प्राकृताच्या अध्ययनाने होईल. तेव्हां प्राकृताचें ज्ञान करून घेणे, ह्मणजे वर सांगितलेल्या भाषांचेंही अंशतः ज्ञान करून घेण्यासारखें आहे.

प्राकृत भाषा ही संस्कृत व हिंदुस्थानांतील चालू देशभाषा ह्यांमधील एक सांखळी आहे. संस्कृतांतून प्राकृतांत व प्राकृतांतून अर्वाचीन भाषांत रूपें कशीं आलीं हें समजल्याशिवाय शब्दांची खरी व्युत्पत्ती समजली असें समजूं नये. ही गोष्ट शब्दांची झाली. उच्च प्रतीच्या लोकांचा इतिहास संस्कृताच्या द्वारें कळण्यास मार्ग आहे; परंतु सामान्य लोकांचा खरा इतिहास समजावयास पाहिजे आहे, तर त्यांच्या भाषेचा अभ्यास करणे जरूर आहे. तो वरवर करून उपयोगी नाही; पद्धतशीर झाला पाहिजे.

पुष्कळ ऐतिहासिक प्रश्नांशीं प्राकृताचा निकट संबंध आहे. ह्या भाषेचा चांगला परिचय असल्याशिवाय त्या

प्रश्नांचा उलगडा करण्यास अडचण पडेल. बौद्धपंथीय व जैनपंथीय लोकांच्या भाषेस मुख्य आधार प्राकृताचा. ह्या उभयतांनी व विशेषतः बौद्धांनी ह्या देशांत केवढाल्या उलाढाली केल्या व ह्यास उच्चावस्था आणण्यास त्यांची मदत किती झाली, हें सांगावयास नको. अशोकाच्या वेळीं व नंतर काहीं वर्षें सामान्य लोकांची बोलण्याची भाषा प्राकृत होती. काहीं कोरीव लेख ह्या भाषेंत आहेत. संस्कृत नाटकांतील काहीं पात्रांची ही भाषा असे. असो.

वरील सर्व गोष्टींचा विचार केल्यास प्राकृताचें ज्ञान हें अनेक कारणांस्तव अवश्य आहे, असें दिसून येईल. ह्या भाषेस थोडेंबहूत जें व्यवस्थेशीर स्वरूप आलेलें आहे, तें मुख्यत्वें वररूचीमुळें होय. संस्कृतावर जसे पाणिनीचे, तसे प्राकृतावर वररूचीचे मोठे उपकार आहेत. धनपाल, हेमचंद्र वगैरे थोड्या पंडितांनी मागाहून काहीं साहाय्य केलें; परंतु खरें श्रेय वररूचीसच देणे योग्य आहे. वररूचीस कात्यायनही ह्मणत. पाणिनीच्या व्याकरणावर पुरवणीरूप वार्तिकें ज्याने केलीं तोच हा कात्यायन, असें काहींचें ह्मणणे आहे. हें काहीं असो. प्राकृत व्याकरणावर प्रथमचा ग्रंथ वररूचीचा आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. ज्या पाणिनीने संस्कृत व्याकरणावर ग्रंथ केला त्याचें व त्याच्या कृतीचें गौरव किती होत असतें, व प्राकृताचें गौरव करणारे किती सांपडतात,

ह्याविषयीं विचार केला असतां संस्कृत व प्राकृत ह्या दोन भाषांच्या संबंधानें किती पंक्तिप्रपंच आहे, व विद्वान लोकांच्या भाषेविषयीं आम्ही केवढा अभिमान बाळगतो, व सामान्य लोकांच्या भाषेविषयीं आमची किती अनास्था असते, हें समजून येईल. प्रत्येक गोष्टीबद्दल कांहीं तरी कारण पुढें करण्यांत येतें व त्याप्रमाणें ह्या अनास्थेबद्दलही कांहीं कारण दाखविणारें सांपडतील. परंतु संस्कृत ही आवडती भाषा व प्राकृत ही नावडती भाषा ह्मणून एकीविषयीं प्रेम व दुसरीविषयीं निष्काळजी, ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाही, असें आम्हांस वाटतें, व ह्या गोष्टीस मोठें प्रमाण पाहिजे असल्यास वरील पंडितद्वयास व त्यांच्या कृतीस जो मान मिळाला व मिळत आहे हें होय. असो. आम्ही जी माहिती देणार आहो ती वररुचीच्या प्राकृत प्रकाशाविषयीं देणार आहो, व ती केवळ प्राकृताविषयीं लोकांत गोडी उत्पन्न व्हावी ह्या हेतूनें मुख्यत्वें देणार आहो. शब्दांचीं रूपें कशीं बनलीं व त्यांस आचार्यांच्या सूत्राचा मूळ आधार कोणता, हें प्रस्तुतच्या पुस्तकांत दाखविलें आहे. प्राकृत प्रकाशाचे एकंदर १२ परिच्छेद आहेत. पहिल्या ९ परिच्छेदांत महाराष्ट्री जी मुख्य प्राकृत भाषा आहे तिजविषयीं व बाकीच्या तीन परिच्छेदांत पैशाची, मागधी व शौरसेनी ह्यांच्या संबंधाच्या विशेष गोष्टी कोणत्या त्या सांगितल्या आहेत. बारा परिच्छेद मिळून ४८७ सूत्रसंख्या आहे.

प्रस्तुत पुस्तकांत प्रथम सूत्र, नंतर त्याचा अर्थ व मग सूत्र समजण्याकरितां थोडीं उदाहरणें दिलीं आहेत. सूत्रांच्या पुढें जे आंकडे दिले आहेत ते त्या त्या परिच्छेदांतील सूत्रांचे अनुक्रमांक आहेत असें समजावें. सर्व सूत्रें सामान्य नियमादाखल आहेत असें समजूं नये; अपवादक स्थळें काहीं आहेत. हें पुस्तक मराठी शिक्षक, ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थी, व हायस्कुलांतील वरच्या वर्गांत मराठी शिकणारे विद्यार्थी ह्यांस विशेष उपयोगी पडेल असें वाटतें.

# उपोद्घात.

—○*○—

प्राकृत हें नाव प्रकृती म्हणजे मूळ भाषा जी संस्कृत तिजपासून आलें आहे. संस्कृत भाषेपासून महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, पैशाची वगैरे ज्या भाषा झाल्या त्या सर्व भाषांस प्राकृत ही सामान्य संज्ञा आहे. ह्या बाबतींत वादाचा एक मोठा प्रश्न आहे. तो हा कीं, प्राकृत भाषा ही प्रत्यक्ष संस्कृत रूपांचा अपभ्रंश होऊन बनली किंवा संस्कृतापासून पाली व पालीपासून प्राकृत झाली. हा प्रश्न महत्वाचा आहे, पण त्याविषयीं जसा उलगडा व्हावा तसा झालेला दिसत नाही. संस्कृतापासून प्रत्यक्ष प्राकृत भाषा झालेली आहे, असें हेमचंद्र वगैरे विद्वानांचें म्हणणे आहे. हें काहीं असो. नर्मदेच्या उत्तरेस आमच्या आर्यांचा ठिकठिकाणीं प्रसार झाला, तेंव्हां ठिकठिकाणचे लोक संस्कृत शब्दांचा निरनिराळा उच्चार करूं लागले, व अशा रितीने स्थलपरत्वें ज्या भाषा प्रचारांत आल्या त्यांस महाराष्ट्री, मागधी, शौरसेनी व पैशाची हीं नावें पडलीं असावीं, असें दिसतें. आपल्या इकडे मराठीच्या जशा स्थलपरत्वें कोंकणी, देशी वगैरे पोट भाषा बनल्या, तसाच प्रकार प्राकृताच्या संबंधाने झाला असावा. प्रथम

---

१–पैशाची भाषेची ठिकाणें–पांड्य, केकय, वाल्हीक, सह्य, नेपाल, कुंतल, सुधेष, भोत, गांधार, हैव व कनोज.

थोड्या भाषा असून पुढें बऱ्याच झाल्या असाव्या. वररुचीनें महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी व पैशाची ह्या चारच भाषांच्या व्याकरणाचे नियम दिले आहेत. ह्यावरून त्या वेळीं ह्या चारच भाषा मुख्यत्वें प्रचारांत असाव्या. काहींचें ह्मणणे अवंतिका, शौरसेनी, प्राच्या व मागधीं ह्या चार भाषा होत्या. काहींचें ह्मणणे मागधी, अवंती, प्राच्या, शौरसेनी, अर्धमागधी, बाल्हीका व दाक्षिणात्या अशा ७ भाषा असंत. असो. प्राकृत भाषा व मूळच्या लोकांची भाषा ह्यांच्यांतील शब्दांच्या[२] मिश्रणाने बऱ्याच भाषा पुढें झाल्या.

प्राकृत भाषांपैकीं महाराष्ट्री ही मुख्य गणली आहे. हिच्या खालोखाल शौरसेनी, मागधी, पैशाची व अपभ्रंश ह्या होत. अर्धमागधी ह्मणून जी वर भाषा सांगितली ती मागधीची पोटभाषा आहे, हें निराळें सांगणे नको. अपभ्रंश हें नाव नागर, उपनागर, द्राविड, माळवी, पांचाली, कालिंदी, गुर्जरी, द्राविडी, वैतालिकी, कांचीं, अभीरी, सावरी वगैरे भाषांस लागू होतें. अपभ्रंश हें नाव पडण्याचें कारण कीं हींत फारच फेरफार झालेला आहे.

कोणत्या जातींच्या लोकांनी कोणतीं कामें करावीं, हें

---

२–पुढील शब्द प्राकृतांत आढळतात; तेव्हां मूळच्या लोकांच्या भाषेतून ते घेतले असावे असें दिसतें. उदाहरणार्थ:–चप्प =चांप; पोट्ट, पोट=पोट; छिनालिआ=छिनाल, शिंदळ; खुंट=खुंटा; थरतरेदी=थरथरणे; डुब्बंत=डुबणे; घोट्ट=घोटणे; चमकंत=चमकणे.

ज्याप्रमाणें स्मृतिकारांनी ठरवून टाकलें होतें, त्याप्रमाणें साहित्यदर्पणकारासारख्या ग्रंथकारांनी भाषांच्या संबंधाने व्यवस्था ठरवून टाकली होती. ती अशी कीं, कुलीन व सुशिक्षित लोकांनी संस्कृत व त्यांच्या बायकांनी शौरसेनी भाषा वापरावी. गाण्यांत व कवितांत ह्याच बायकांची महाराष्ट्री भाषा असावी. राजे लोकांच्या अंत:पुरांत असणाऱ्या नोकरचाकरांची भाषा मागधी; इतर नोकर, राजपुत्र व व्यापारी ह्यांची अर्धमागधी; विदूषक व दुसरे काहीं ह्यांची प्राच्य ( गौड ); धूर्तांची अवंती; द्राविडी ( दाक्षिणी ) शिपाई व जुवेबाज ह्यांची; उत्तरेकडील लोकांची बाल्हीकी; चांडाली चांडाळांची; अभीरी व सावरी लाकडें व पानें गोळा करून उपजीविका करणारांची; पैशाची लोणारी वगैरेंची. संस्कृत नाटकांतून ह्या भाषांपैकीं बऱ्याच भाषांचा उपयोग केलेला दिसून येतो. तेव्हां निदान मुख्य प्राकृत भाषांची माहिती असणे फार अवश्य आहे.

---

१. पुरुषाणामनीचानां । संस्कृतं संस्कृतात्मनाम् ॥
शौरसेनी प्रयोक्तव्या । तादृशीनाञ्च योषिताम् ॥
आसामेव तु गाथासु । महाराष्ट्रीं प्रयोजयेत् ॥ २ ॥
अत्रोक्ता मागधी भाषा । राजन्तःपुरचारिणां ॥
चेटानां राजपुत्राणां । श्रेष्ठीनाञ्चार्द्धमागधी ॥ ३ ॥
प्राच्या विदूषकादीनां । धूर्तानां स्यादवान्तिका ॥
योधनागरिकादीनां । दाक्षिणात्या हि दीयताम् ॥ ४ ॥
शकराणां शकादीनां । शाकरीं संप्रयोजयेत् ॥
बाल्हीकभाषा दिव्यानां । द्राविडी द्रविडादिषु ॥ ५ ॥

प्राकृत भाषांच्या संबंधाने वररुचीचा प्राकृत प्रकाश, चंडचा प्राकृत लक्ष्मण, मार्कंडेयाचा प्राकृत सर्वस्व, हेमचंद्राची प्राकृताष्टाध्यायी, वसंतराजाची प्राकृत संजीवनी, व प्राकृत लंकेश्वर, प्राकृत कल्पलतिका वगैरे अनेक ग्रंथ आहेत. ह्यांपैकीं सर्वमान्य व आद्य ग्रंथ म्हटला ह्मणजे वररुचीचा प्राकृत प्रकाश होय. वररुची हा प्राकृत व्याकरणाच्या बाबतींत पाणिनी होय, इतकें सांगितलें असतां ह्या ग्रंथाची थोरवी किती आहे, हें सांगावयास नको. प्राकृत भाषेचा व प्रस्तुतच्या देशी भाषांचा फार निकटचा संबंध आहे, पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, प्राकृत भाषा परकी भाषेप्रमाणें झालेली आहे. ही स्थिती शोचनीय

---

आभीरेषु तथाभीरी । चांडाली पुकसादिषु ॥
आभीरी शावरी चापि । काष्ठपत्रोपजीविषु ॥ ६ ॥
तथैवाङ्गारकारादौ । पैशाची स्यात्पिशाचवाक् ॥
चेटीनामप्यनीचाना ॥ मपि स्याच्छौरसेनिका ॥ ७ ॥
बालानां षंडकानाञ्च । नीचग्रहविचारिणां ॥
उन्मत्तानामातुराणां । सैव स्यात्संस्कृतं क्वचित् ॥ ८ ॥
ऐश्वर्येण प्रमत्तस्य । दारिद्र्योपस्कृतस्य च ॥
भिक्षुबंधधरादीनां । प्राकृतं संप्रयोजयेत् ॥ ९ ॥
संस्कृतं संप्रयोक्तव्यं । लिंगिनीषूत्तमासु च ॥
देवीमंत्रिसुतावेश्या । स्वपि कैश्चित्तथोदितम् ॥ १० ॥
यद्देशं नीचपात्रं तु । तद्देशं तस्य भाषितं ॥
कार्यतश्चोत्तमादीनां । कार्यो भाषाविपर्ययः ॥ ११ ॥
योषित्सखीबालवेश्या । कितवाप्सरसां तथा ॥
वैदग्ध्यार्थं प्रदातव्यं । संस्कृतं चान्तरान्तरा ॥ १२ ॥

होय. असो. प्राकृत भाषेचा परिचय विद्यार्थ्यांस लवकर व्हावा, ह्या हेतूने तींतील मुख्य गोष्टी सांगणे अवश्य आहे, असें वाटल्यावरून त्या पुढें देतो.

१ संस्कृत स्वरांपैकीं ऋ, ॠ, ऌ, ॡ, ऐ व औ हे स्वर प्राकृतांत मुळींच नाहीत. प्रारंभींच्या ' ऋ ' बद्दल ' रि ' आदेश होतो. जसें:- ऋण= रिण. ह्या ' ऋ ' पूर्वीं व्यंजन आलें असतांही केव्हां केव्हां ' ऋ ' बद्दल ' रि ' आदेश होतो. जसें:- सदृश= सरिस. 'ऋ' पूर्वीं ओष्ठ्यवर्णाशिवाय इतर व्यंजन आलें, तर 'ऋ' बद्दल 'अ' अथवा 'इ' होते. जसें:- तृण=तण; भृंग=भिंग. हे आदेश प्रारंभींच्या ' ऋ ' बद्दल क्वचित् होतात. ' ऐ ' बद्दल ' ए ' अथवा ' अइ ' असे आदेश होतात. जसें:- शैल=सेल; दैत्य= दइत्त. ' औ ' बद्दल ' ओ ' अथवा ' अउ ' असे प्रायः आदेश होतात. कधीं कधीं ' उ ' आदेश होतो. जसें:- कौमुदी= कोमुइ; पौर= पउर; सौन्दर्य= सुंदेर.

२. दोन व्यंजनांपूर्वीं असणारा दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो. जसें:- मार्ग= मग्ग; दीर्घ= दिग्घ. ह्या नियमास अनुसरून आणखी दोन नियम आहेत. ते असे:- जर दीर्घ स्वर ठेवण्यांत आला, तर दोन व्यंजनांपैकीं एकाचा लोप होतो. जसें ईश्वर= ईसर अथवा इस्सर. दोन व्यंजनांपूर्वींचा ऱ्हस्व स्वर कधीं कधीं दीर्घ होतो व दोन व्यंजनांपैकीं एकाचा लोप होतो. जसें:- जिव्हा= जिहा.

प्राकृतांत 'ए' व 'ओ' हे विशेष प्रचारांतील स्वर होत. त्यांचा उपयोग 'इ' व 'उ' बद्दलही करण्यांत येतो. जसें:-पिण्ड= पेण्ड, तुण्ड= तोंड. हे जे प्रकार सांगितले ते सामान्यत्वें होतात. अपवादक स्थलें काहीं आहेत, हें सांगावयास नको. ङ, ञ, श, ष, न, य हीं व्यंजनें प्राकृतांत नाहीत; पण क्वचित् ठिकाणीं ङ व ञ ह्या दोन व्यंजनांचा त्याच वर्गांतील व्यंजनांशीं संयोग झालेला आढळण्यांत येतो. 'श', 'ष' ह्यांबद्दल 'स', व 'न' बद्दल नेहमीं 'ण' होतो. प्रारंभींच्या 'य' बदल 'ज' होतो.

३ प्राकृतांत स्वररहित व्यंजनें असावयाचीं नाहीत व शेवटीं व्यंजन कधीं असावयाचें नाही. 'म' व 'न' हीं व्यंजनें आल्यास त्यांचा कधीं कधीं अनुस्वार होतो व कधीं कधीं शेवटील अनुस्वाराचाही लोप होतो. नामांच्या अंत्य व्यंजनाबद्दल 'अ' अथवा 'आ' असे आदश होतात. जसें:—प्रावृष् = पाउस; सरित् = सरिआ. शब्दांच्या प्रारंभीं नसणारे क, ग, च, ज, त, द, प, व व ह्या व्यंजनांचा विकल्पें लोप होतो. पण ज्या वेळेस 'व' व 'त' ह्यांचा लोप होत नाही, त्या वेळेस त्यांबद्दल ब, व अथवा द होतो असा प्रकार गद्यापेक्षां पद्यांत फार आढळतो. 'प्रति' ह्या उपसर्गाबद्दल 'पडि' असें रूप होतें. शब्दाच्या मध्यें 'य' आला असतां त्याचा प्रायः लोप होतो. वायु = वाऊ; नयन = णअण. 'ट' चा 'ढ' व 'ड' चा कधीं कधीं 'ल' होतो. ख, घ,

थ, ध, व भ हीं व्यंजनें कधीं कधीं तशींच राहतात, परंतु प्रायः त्यांबद्दल 'ह' होतो. जेव्हां 'थ' बद्दल 'ह' होत नाही, तेव्हां त्याबद्दल 'ध' होतो. छ, झ, व ढ हे बदलत नाहीत. 'ठ' बद्दल 'ढ' होतो. 'फ' हा जशाचा तसाच राहतो, किंवा कधीं कधीं त्याबद्दल 'भ' होतो. मागधी वगैरे भाषांत हा नियम सार्वत्रिक आढळतो. ण, म, ल, स व ह हीं व्यंजनें जशींच्या तशींच राहतात. 'श' व 'ष' ह्यांबद्दल 'स' होतो, असें वर सांगितलें आहे, पण दश वगैरे शब्दांत 'श' बद्दल 'ह' होतो.

४ संयुक्त व्यंजनें:– प्राकृतांत दोन भिन्न व्यंजनांचा संयोग होत नाही. ज्या ठिकाणीं दोन भिन्न व्यंजनें असतील त्या ठिकाणीं दोहोंपैकीं एकाचा लोप होऊन अवशेष राहिलेलें व्यंजन द्वित्त होतें. सामान्य नियम असा समजावयाचा कीं, संयुक्त व्यंजनापैकीं पहिल्याचा लोप करावयाचा, व 'र', 'ल' अथवा 'व' हा पहिला असो किंवा दुसरा असो, त्याचा लोप करावयाचाच. ह्याला काहीं ठिकाणीं अपवाद आढळतात. 'र' व 'ह' ह्यांस द्वित्व कधींही होत नाही. संस्कृत संयुक्त वर्णाबद्दल प्राकृतांत कोणते आदेश होतात, हें पुढील हकीकतीवरून समजेल. हे संयुक्त वर्ण शब्दाच्यामध्यें असले पाहिजेत; प्रारंभीं असल्यास प्रथम वर्णाचा लोप करावयाचा.

प्राकृत  संस्कृत संयुक्त वर्ण.

क्क = त्क, क्त, क्य, क्र, र्क, क्ल, क्व. जसें उत्कंठा = उक्कंठा, चाणक्य = चाणक्क इत्यादी.

क्ख = त्ख, ख्य, क्ष, त्क्ष, क्ष्य, ष्क, स्क, ष्ख, स्ख, :ख; जसें:—आख्या = अक्खा, यक्ष=जक्ख इ०

ग्ग = ड्ग, द्ग, ग्न, ग्म, ग्य, ग्र, र्ग, व ग्ल. जसें:— खड्ग = खग्ग, नग्न = णग्ग इ०

ग्घ = घ्न, द्घ, घ्र, र्घ,. जसें:—उद्घाटित = उग्घाडिद, विघ्न = विग्घ.

च्च = च्य, त्य, र्च. जसें:—अच्युत = अच्चुद, सत्य = सच्च इ०

च्छ = थ्य, र्छ, क्ष, त्क्ष, क्ष्म, त्स, त्स्य, प्स, श्च. जसें:— मिथ्या = मिच्छा, मूर्छा = मुच्छा इ०

ज्ज = ब्ज, ज्ञ ( कधीं कधीं ), ज्र, र्ज, ज्व, द्य, र्य, य्य ( क्वचित् ). जसें:—कुब्ज = खुज्ज, सर्वज्ञ = सव्वज्ज इ०

ज्झ = ध्य, ह्य. जसें:—मध्य=मज्झ, वाह्यक=वज्झह.

ट्ट = र्त. जसें:—नर्तकी = णट्टई.

ट्ठ = ष्ट, ष्ठ. जसें:—दृष्टि = दिट्ठी, गोष्ठी = गोट्ठी.

ड्ड = र्त, र्द ( क्वचित् ). जसें:—गर्त=गड्ड, गर्दभ=गड्डह.

ड्ढ = ढ्य. जसें:—आढ्य = आड्ढ.

ण्ण = ग्ण, ज्ञ, म्न, न्न, ण्य, न्य, र्ण, ण्व, न्व. जसें:— रुग्ण = रुण्ण, यज्ञ = जण्ण, कर्ण = कण्ण.

ण्ह = क्ष्ण, श्न, ष्ण, स्न, ण्ह, ह्न. जसें:–तीक्ष्ण=तिण्ह, विष्णु = विण्हू.

त्त = क्त, त्त, त्न, त्म, त्र, त्व, र्त. जसें:–भक्त = भत्त, सुप्त = सुत्त.

त्थ = क्थ, त्र, र्थ, स्त, स्थ. जसें:—तत्र = तत्थ, पार्थ = पत्थ.

द्द = द्व, द्र, र्द, द्द. जसें:—शब्द=सद्द, भद्र=भद्द.

द्ध = ग्ध, ब्ध, र्ध, ध्र. जसें:—स्निग्ध = सिणिद्ध, अर्ध = अद्ध.

प्प = त्प, प्य, प्र, र्प, ल्प, प्ल, क्म. जसें:—उत्पल= उप्पल, अप्रिय = अप्पिअ.

प्फ = त्फ, ष्फ, स्फ, ष्प, स्प. जसें:–उत्फुल्ल= उप्फुल्ल, निष्फल = निप्फल.

ब्ब = द्व, र्व, ब्र. जसें:–उद्बंध्य=उब्बंधिय.

ब्भ = द्भ, भ्य, भ्र, र्भ. जसें:—सद्भाव=सब्भाव, गर्भ = गब्भ.

म्म = ज्म, ण्म, न्म, म्य, र्म, ल्म. जसें:—षण्मुख = छम्मुह, गुल्म = गुम्म.

म्ह = ष्म, क्ष्म, स्म, ह्म. जसें:—ग्रीष्म = गिम्ह, विस्मय = विह्मअ.

य्य = र्य, र्ज ( मागधी ). जसें:—कार्यम्=कय्ये, दुर्जन = दुय्यणे.

ल्ल = ल्य, र्ल, ल्व, र्य (क्वचित्). जसें:—शल्य = सल्ल, निर्लज्ज = निल्लज्ज.

व्व = व्य, व्र, र्व. जसें: काव्य = कव्व, पूर्व=पुव्व.

सं = र्श, श्र, श्व, स्व. जसें:–दर्शन=दंसण, अश्रु= अंसु, अश्व = अंस, मनस्विनी = मणंसिणी.

स्स = र्ष, श्म, श्य, श्र, श्व, ष्म, ष्य, ष्व, स्य, स्र, स्व. जसें:– ईर्षा = इस्सा, रश्मि = रस्सी.

एकाद्या वर्णांत तीन व्यंजनें असून त्यांपैकीं एक अंतस्थ असेल, तर प्रथम त्याचा लोप करावयाचा; मग बाकी राहिलेल्या दोहोंची वर सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करावयाची. जसें:—मत्स्य=मच्छ. पण ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, ह्या तिहींत अनुनासिक असेल, तर अनुनासिकाचा लोप होत नाही. जसें:–विन्ध्य=विंझ.

४ प्राकृतांत द्विवचन व चतुर्थी विभक्ती हीं नाहीत. चतुर्थीच्याऐवजीं षष्ठीचा उपयोग करतात.

५ ज्या ज्या ठिकाणीं ‘ बहुल ’ ही संज्ञा येईल, त्या त्या ठिकाणीं तिचा अर्थ निरनिराळ्या प्रकारें अथवा विकल्पें असा करावा.

६ संस्कृतांत जे संधी होतात ते प्राकृतांत विकल्पें होतात. जसें:– दधि+ईश्वर= दहिईसर किंवा दहीसर.

७ इ, उ हे भिन्न स्वरांशीं संयोग पावत नाहीत, म्हणजे ते तसेच राहतात. जसें:–मधूनि = महुइ. पण

'ए' व 'ओ' ह्यांपुढें कोणताही स्वर आला, तरी ते संयोग पावत नाहीत. जसें:—एकोऽत्र = एओ एत्थ.

८ जेव्हां ' अ ' स्वरापुढें विसर्ग येतो, तेव्हां दोहों-बद्दल 'ओ' आदेश होतो. जसें:–सन्त+: = सन्तो.

९ जेव्हां श, ष अथवा स ह्यांपुढें य, र, व, श, ष अथवा स ह्यांपैकीं एकादा वर्ण येतो, तेव्हां पूर्व स्वर दीर्घ होतो; व य, र वगैरे वर्णांचा लोप होतो. कश्यप= कासव, विश्राम = वीसाम, विश्वास = वीसास, दुश्शा-सन = दूसासण, शिष्य = सीस.

१० ' यथावर्ग ' अशी एक संज्ञा आहे. कल्पलति-कारांच्या मताप्रमाणें ह्या वर्गांत पुढें लिहिलेल्या शब्दांचा समावेश होतो:–यथा, तथा, तालवृन्त, उत्खात, चामर, चाटु, प्रवाह, प्रहाव, प्रस्तार, हालिक, मार्जार, कुमार, संस्थापित, खादित व मराल. ह्या शब्दांतील ' आ ' चा विकल्पें ' अ ' होतो. जसें:–यथा = जह अथवा जहा.

११ सम (सारखा) ह्या संज्ञेचा काहीं सूत्रांत उपयोग केला आहे, तेव्हां त्या ठिकाणीं तिचा असा अर्थ सम-जावयाचा कीं, ' इ ' ह्या पुढें संयुक्त वर्ण आला असतां मात्र नियमाची व्याप्ती आहे.

१२ ' इदीतः पानियादिषु ' असें एक सूत्र आहे. कल्पलतिकारांच्या मताप्रमाणें पानीयादी शब्द म्हटले ह्मणजे पानीय, व्रीडिता, लीक, द्वितीय, तृतीय, गृहीत,

मानीत, गभीर, करीषवत्, इदानीम् व तदानीम्. ह्या शब्दांतील दीर्घ ' ई ' बद्दल ऱ्हस्व ' इ ' होतें.

१३ 'अन्मुकुटादिषु' असें एक सूत्र आहे. त्यांतील मुकुटादी शब्द—मुकुट, कर्बुर, गुर्वी, सौकुमार्य, युधिष्ठिर, गुरुक व उपरि हे होत, असें कल्पलतिकारांचें ह्मणणे आहे. ह्या शब्दांतील ' उ ' बद्दल ' अ ' आदेश होतो.

१४ " उत् ओत्तुण्डरूपेषु " ह्या सूत्रांतील रूप शब्दाचा अर्थ सारखा असा आहे. पण ह्याचा अर्थ असा समजावयाचा कीं, ' उ ' पुढें संयुक्त व्यंजन असलें पाहिजे, तर ' उ ' चा ' ओ ' व्हावयाचा. शौरसेनींत हा ' ओ ' विकल्पें होतो. तुण्डादी शब्द—तुण्ड, कुट्टिम, कुद्दाल, मुक्ता, मुद्गर, लुब्धक, पुस्तक, कुम्भी, कुन्तल व पुष्कर हें होत, असें कल्पलतिकार म्हणतात.

१५ ' इदृष्यादिषु ' ह्या सूत्रांतील ऋष्यादी शब्द ऋषि, कृति, कृत्या, धृष्ट, वृषभ, वृश्चिक, वृष, पृथुल, गृध्र, मृगाङ्क, मसृण, कृषि, सृष्टि, दृढ, सृत, गृष्टि, वितृष्ण, कृत, कृति, कृष्ण ( देव ) होत, असें कल्पलतिकार म्हणतात. ह्या शब्दांत ' ऋ ' बद्दल ' इ ' आदेश होतो. हा गण मोठा आहे.

१६ कल्पलतिकारांच्या मताप्रमाणें ' उदृत्वादिषु ' ह्या सूत्रांतील ऋत्वादी शद्ब येणेंप्रमाणें:— ऋतु, मृदङ्ग, निभृत, वृत, परभृत, मृत, प्रावृट्, प्रवृत्ति, वृत्तान्त, मातृ-

का, भ्रातृक, मृणाल, पृथिवी, वृन्दावन, जामातृक, वृन्दारक, प्रभृति, पृष्ठ, वृद्ध. ह्या शद्वांत ' ऋ ' बद्दल ' उ ' आदेश होतो.

१७ ' दैत्यादिष्वइ ' ह्या सूत्रांतील दैत्यादीं शद्व दैत्य, वैश्य, वैशाख, वैशंपायन, कैतव, स्वैर, वैदेह, वैदेश, क्षैत्र, वैषयिक होत. ह्यांत ' ऐ ' बद्दल ' अइ ' असा आदेश होतो.

१८ ' उत् सौन्दर्यादिषु , ह्या सूत्रांतील सौंदर्यादी शद्व– सौन्दर्य, शौण्डिकी, दौवारिक, शौण्ड, कौक्षेय, पौरुष, पौलौमि, मौञ्ज होत. ह्या शद्वांतील ' औ ' बद्दल ' उ ' आदेश होतो.

१९ ' नीडादिषु ' ह्या सूत्रांतील नीडादी शद्व- नीड, व्याहृत, मण्डूक, श्रोत, प्रेम, यौवन, ऋजु, स्थूल, तैल, त्रैलोक्य हे होत. ह्या शद्वांतील प्रारंभीं नसणारें व्यंजन द्वित्त होतें.

२० ' सेवादिषु ' ह्या सूत्रांतील सेवादी शद्व:—सेवा, कौतुहल, दैव, विहित, नख, जानु, कर्णिकार, रात्रि, विश्वास, निश्वास, ईश्वर, रश्मि, तूष्णीक, मित्र, पुष्प, दुष्कर, निष्कृप व कर्म हे होत.

२१ नामें चालविण्याच्या संबंधाने शद्वांचे ९ प्रकार आहेत. ते:— १ अकारान्त व आकारन्त, २ इकारान्त व ईकारान्त, ३ उकारान्त व ऊकारान्त, ४ मुळांत जे

शब्द ऋकारान्त आहेत, ५ मुळांत जे शब्द व्यंजनान्त आहेत. ह्यावरून प्रकृतांत एकारान्त अथवा ओकारान्त शब्द नाहीत हें उघड आहे. वस्तुतः पाहतां प्राकृतांत व विशेषें महाराष्ट्रींत तीनच प्रकारचे शब्द आहेत; कारण मूळच्या ऋकाराबद्दल उ, अर अथवा आर आदेश होतो. त्याचप्रमाणें मूळच्या अंतींच्या व्यंजनाचा लोप होतो किंवा त्याबद्दल 'आ' आदेश होतो.

२२ प्राकृतांत प्रातिपदिक व विभक्तिस्वर ह्यांचा संधी होत नाही. जसें:—लदाउ प्रथमेचें बहुवचन.

२३ प्राकृतांत सर्वनामें चालविण्याच्या बाबतींत सामान्य नियम नाहीत. प्रत्येक सर्वनामाच्या संबंधानें विशेष नियम आहेत. अकारान्त सर्वनामांविषयींमात्र काहीं सामान्य नियम आहेत.

२४ सर्वादी शब्द—सर्व, उभ, उभय, उत्तर, उत्तम, इतर, अन्यतर, त्वत्, त्व, नेम, सम, सिम, त्यद्, यद्, एतद्, इदम्, अदस्, एक, द्वि, युष्मन्, अस्मत्, भवत्, किम्.

२५ प्राकृतांत धातूंचे निरनिराळे गण केलेले नाहीत. सर्व धातू सारखेच चालविण्यांत येतात. अकारान्त धातूंशिवाय इतर धातूंच्या बाबतींत परस्मैपद अथवा आत्मनेपद हा भेद पाळण्यांत येत नाही; शोरसेनींत तर सर्व धातू परस्मैपदी समजतात. संस्कृतांत प्राकृताप्रमाणें क्रियाप-

पदाचे १°० गण नसून एकच आहे. तो पहिला व सहावा होय. संस्कृतांतील कालांपैकीं प्राकृतांत तीनच काळ समजतात. तेः—वर्तमान, दुसरा भविष्य, व आज्ञार्थी.

आतां **नामें, सर्वनामें, व क्रियापदें कशीं चालवितात**, ह्याविषयीं थोडीं उदाहरणें देऊन हा वाढलेला उपोद्घात पुरा करूं.

**नाम**—वृक्ष=वच्छ. ( पुल्लिंगी )

| | एक. व. | अनेक. व. |
|---|---|---|
| प्र० | वच्छो | वच्छा. |
| द्वि० | वच्छं | वच्छे. |
| तृ० | वच्छेण—णं | वच्छेहिं—हि. |
| पं० | वच्छादो—दु, वच्छाहि, वच्छा. | वच्छाहिंतो वच्छेहिंतो वच्छासुंतो, वच्छेसुंतो |
| ष० | वच्छस्स | वच्छाणं—ण. |
| स० | वच्छस्मि, वच्छे | वच्छेसु—सुं. |
| सं० | वच्छ, वच्छा. | वच्छा. |

**इकारान्त पुल्लिंगी नाम** अग्नि=अग्गी.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्र० | अग्गी | अग्गीओ, अग्गिणो. |

---

१–४ थ्या गणाच्या संबंधाने अंतींचें व्यंजन द्वित्त करतात. कुप्यति=कुप्पति. ७ व्या गणांतील धातूंस अनुस्वार लावतात. जसें:—रुणद्धि=रुंधदि. पांचव्या गणांतील धातूंस 'ण' लावतात. जसें:—शृणोमि=सुणामि; व नवव्या गणांतील धातूंस 'ण' लावतात. जसें:—जानाति=जाणादि.

शद्ब ऋकारान्त आहेत, ९ मुळांत जे शद्ब व्यंजनान्त आहेत. ह्यावरून प्रकृतांत एकारान्त अथवा ओकारान्त शद्ब नाहीत हें उघड आहे. वस्तुतः पाहतां प्राकृतांत व विशेषें महाराष्ट्रींत तीनच प्रकारचे शब्द आहेत; कारण मूळच्या ऋकाराबद्दल उ, अर अथवा आर आदेश होतो. त्याचप्रमाणें मूळच्या अंतींच्या व्यंजनाचा लोप होतो किंवा त्याबद्दल 'आ' आदेश होतो.

२२ प्राकृतांत प्रातिपदिक व विभाक्तिस्वर ह्यांचा संधी होत नाही. जसें:-लद्दाउ प्रथमेचें बहुवचन.

२३ प्राकृतांत सर्वनामें चालविण्याच्या बाबतींत सामान्य नियम नाहीत. प्रत्येक सर्वनामाच्या संबंधानें विशेष नियम आहेत. अकारान्त सर्वनामांविषयींमात्र काहीं सामान्य नियम आहेत.

२४ सर्वादी शब्द—सर्व्व, उभ, उभय, उत्तर, उत्तम, इतर, अन्यतर, त्वत्, त्व, नेम, सम, सिम, त्यद्, यद्, एतद्, इदम्, अदस्, एक, द्वि, युष्मन्, अस्मत्, भवत्, किम्.

२५ प्राकृतांत धातूंचे निरनिराळे गण केलेले नाहीत. सर्व धातू सारखेच चालविण्यांत येतात. अकारान्त धातूंशिवाय इतर धातूंच्या बाबतींत परस्मैपद अथवा आत्मनेपद हा भेद पाळण्यांत येत नाही; शौरसेनींत तर सर्व धातू परस्मैपदी समजतात. संस्कृतांत प्राकृताप्रमाणें क्रियाप-

पदाचे १०[1] गण नसून एकच आहे. तो पहिला व सहावा होय. संस्कृतांतील कालांपैकीं प्राकृतांत तीनच काळ समजतात. ते:—वर्तमान, दुसरा भविष्य, व आज्ञार्थी.

आतां **नामें, सर्वनामें, व क्रियापदें** कशीं चालवितात, ह्याविषयीं थोडीं उदाहरणें देऊन हा लांबलेला उपोद्घात पुरा करूं.

**नाम**–वृक्ष=वच्छ. ( पुल्लिंगी )

| | एक. व. | अनेक. व. |
|---|---|---|
| प्र० | वच्छो | वच्छा. |
| द्वि० | वच्छं | वच्छे. |
| तृ० | वच्छेण–णं | वच्छेहिं–हि. |
| पं० | वच्छादो–दु, वच्छाहि, वच्छा. | वच्छाहिंतो वच्छेहिंतो वच्छासुंतो, वच्छेसुंतो |
| ष० | वच्छस्स | वच्छाणं–ण. |
| स० | वच्छम्मि, वच्छे | वच्छेसु–सुं. |
| सं० | वच्छ, वच्छा. | वच्छा. |

**इकारान्त पुल्लिंगी नाम** अग्नि=अग्गी.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्र० | अग्गी | अग्गीओ, अग्गिणो. |

१–४ थ्या गणाच्या संबंधानें अंतींचें व्यंजन द्वित्त करतात. कुप्यति=कुप्पति. ७ व्या गणांतील धातूंस अनुस्वार लावतात. जसें:—रुणद्धि=रुंधदि. पांचव्या गणांतील धातूंस 'ण' लावतात. जसें:—शृणोमि=सुणामि; व नवव्या गणांतील धातूंस 'णा' व 'ण' लावतात. जसें:—जन्मति=जाणादि.

| | | |
|---|---|---|
| द्वि० | आग्गिं | आग्गिणो. |
| तृ० | आग्गिणा | अग्गीहिं–हि. |
| पं० | अग्गीदो–दु–हि | अग्गीहिंतो, अग्गीसुंतो. |
| ष० | आग्गिणो, अग्गिस्स | अग्गीणं, ण. |
| स० | आग्गिम्मि | अग्गीसु–सुं. |
| सं० | आग्गि | अग्गीओ, आग्गिणो. |

---

## आकारान्त स्त्रीलिंगी नाम–माला=माला.

| | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. | माला | मालाओ–उ, माला. |
| द्वि. | मालं | मालाओ–उ. |
| पं. | मालादो–दु–हि | मालाहिंतो–सुंतो. |
| तृ. | मालाए–इ | मालाहिं–हि. |
| ष. | मालाए–इ | मालाणं—ण. |
| स. | मालाए–इ | मालासु–सुं. |
| सं. | माले | मालाओ—उ. |

---

## ईकारान्त स्त्रीलिंगी नाम—नदी=णई.

| | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्र. | णई | णईओ–उ |
| द्वि. | णइं | ” |
| पं | णईदो–दु–हि | णईहिंतो–सुंतो. |
| तृ. | णईअ–आ, णईइ–ए | णईहिं–हि |
| ष. | णईअ–आ, णईइ–ए | णईणं–ण |
| स. | णईअ–आ, णईइ–ए | णईसु–सुं |

| | | |
|---|---|---|
| सं. | णइ | णईओ–उ |

---

## सर्वनाम–यः= जो ( पुल्लिंगी. )

| | एक. व | अनेक व. |
|---|---|---|
| प्र० | जो | जे |
| द्वि० | जं | जे |
| तृ० | जेण, जिणा | जेहिं, जेहि. |
| पं० | जत्तो–त्तु, जदो–दु | जाहिंतो, जासुंतो |
| ष० | जस्स, जास | जाणं–ण, जेसिं |
| स० | जस्सिं–स्सि, जम्मि, म्मि, जहिं, जहि, जत्थ | जेसु–सुं |

---

## सर्वनाम अस्मत्.

| | ए. व. | अनेक. व. |
|---|---|---|
| प्र० | अहं, हं, अहअं, अहम्मि | अम्हे (वअं–गद्यांत ) |
| द्वि० | मं, ममं, अहम्मि | अम्हे, णो, णे. |
| तृ० | मे, मए, मइ, ममाइ | अम्हेहिं–हि |
| पं० | मइत्तो, ममादो–दु, ममाहि, मत्तो | अम्हाहिंतो– सुंतो |
| ष० | मे, मम, मज्झ, मह | णो, अम्ह, अम्हाणं, अम्हे. |
| स० | मइ, मए, ममम्मि | अम्हेसु. |

---

## क्रियापद, वर्तमानकाल हस् धातू

| | एक व. | अनेक. व. |
|---|---|---|
| प्र० पु० | हसामि, हसमि, हसाम्हि | हसामो–मु–म, हसिमो–मु–म. हसमो–मु–म, हसम्हो–म्ह. |
| द्वि० पु० | हससि | हसह, हसध=धं (गद्यांत), हासित्था. |
| तृ० पु० | हसदि, हसइ | हसन्ति. |

### आज्ञार्थी.

| | एक व. | अनेक. व. |
|---|---|---|
| प्र० पु० | हसमु | हसामो–म, हसमो –म, हसम्ह. |
| द्वि० पु० | हससु, हस, हसाहि, हसस्स | हसह, हसध, धं |
| तृ० पु० | हसदु, हसउ | हसन्तु |

### भविष्यकाळी प्रत्यय.

| | एक.व. | अनेक. व. |
|---|---|---|
| प्र० पु० | स्सं, स्सामि | अ, व |
| द्वि० पु० | स्स, सि | स्सामो |
| तृ० पु० | स्सदि, स्सइ | स्सध, स्सह. स्सन्ति. |

---

**टीप:**—प्रकृत ग्रंथास कावेल साहेबांनी केलेल्या भाषांतराचा व हृषीकेश ह्यांच्या व म्यूर साहेब ह्यांच्या ग्रंथाचा फार उपयोग झाला हें येथें सांगणे जरूर आहे. प्रथम हा ग्रंथ शालापत्रक कारांनी आपल्या मासिक पुस्तकांतून छापून दिला ह्याबद्दल त्यांचे आभार मानणे अवश्य आहे.

# प्राकृत प्रकाश.

## परिच्छेद १ ला.

**आदेरतः** १–हें सूत्र अधिकार सूत्र आहे, म्हणजे ह्या सूत्रावरून पुढील सूत्रांचें नियमन होतें, व हें सूत्र पुढील सूत्रांत अंतर्गत आहे, असें समजावें. पुढें जे नियम दिलेले आहेत त्यांत प्रारंभींच्या ' अ ' बद्दल जे आदेश होतात, ते सांगितले आहेत. ' प्रथमारंभींच्या बद्दल ' असे शब्द हा परिच्छेद संपेपर्यंत पुढील सर्व सूत्रांत घेऊन चालावयाचे, असें समजावें. ' अ ' हा दुसऱ्या स्वराबद्दल आदेश आहे असें सांगेपर्यंत ( सूत्र १० पाहा ) तो पुढील सूत्रांत अध्याहृत घेऊन चालावयाचा. ' अत् ' ह्यांतील ' त् ' चा उपयोग सवर्ण स्वर वगळण्याकरतां आहे. ( पाणिनी १. १. ७०.)

**आ समृद्ध्यादिषु वा** २–समृद्धि वगैरे शब्दांतील प्रथमच्या ' अ ' बद्दल विकल्पें ' आ ' आदेश होतो. जसें:–समृद्धि=समिद्धी, सामिद्धी; प्रकट=पअड, पाअड; अभिजाति ( कूळ ) = अहिजाई, आहिजाई; मनस्विनी ( शाहणी स्त्री )=मणंसिणी,

मार्गसिणी; प्रतिपत् = पडिवआ, पाडिवआ (पाडवा); सदृक्ष=सरिच्छ, सारिच्छ (सारखा); प्रतिस्पर्धिन् = पडिसिद्धी, पाडिसिद्धी; प्रसुप्त=पसुत्त, पासुत्त; प्रसिद्धि=पसिद्धी, पासिद्धी; अश्व= अस्सो, आसो.

इदीषत्पक्वस्वप्नवेतसव्यजनमृदङ्गाङ्गारेषु ३ ईषत् वगैरे शब्दांतील प्रथमच्या 'अ' बद्दल 'इ' आदेश होतो. वरच्या सूत्रांत सांगितलेला विकल्प होत नाही, असें समजावें. जसें:–ईषत् (किंचित्)=इसि; पक्व=पिक्क; स्वप्न=सिविण; वेतस (वेत)=वेडिस; व्यजन (पंखा)=विअण; मृदंग=मुइंग; अंगार (कोळसा)=इंगाल.

लोपोऽरण्ये ४–अरण्य शब्दांतील प्रथम अक्षर जें 'अ' त्याचा लोप होतो. जसें:–अरण्य–रण्ण–रान.

ए शय्यादिषु ५.–शय्यादी शब्दांमधील प्रथमारंभींच्या 'अ' बद्दल 'ए' आदेश होतो. जसें:–(१) शय्या–सेज्जा–सेज, शेज; (२) त्रयोदश–तेरह –तेरा; (३) वल्लिः–वेल्ली–वेल; (४) सौन्दर्य–सुंदेर; (५) उत्कर–उक्केर; (६) पर्यन्त–पेरंत; आश्चर्य–अच्छेर.

ओ बदरे देन ६–बदर शब्दांतील दकारासह जो प्रारंभींचा 'अ' त्याबद्दल 'ओ' आदेश होतो. जसें:–बदर–बोर–बोर.

**लवणनवमल्लिकयोर्वेन** ७–लवण व नवमल्लिका ह्या दोन शब्दांमधील प्रथमारंभींचा 'अ' व स्वरयुक्त 'व' ह्यांऐवजीं 'ओ' आदेश होतो. जसें:—नवमल्लिका–णोमल्लिआ; लवण–लोण–लोणा ( भिंतीचा ).

**मयूरमयूखयोर्य्वा वा** ८. मयूर व मयूख ( किरण ) ह्या शब्दांतील प्रथमचा 'अ' व 'यू' ह्यांबद्दल विकल्पें 'ओ' आदेश होतो. जसें:—मयूर–मोर, मऊर–मोर; मयूख–मोह, मऊह.

**चतुर्थीचतुर्दश्योस्तुना** ९. चतुर्थी व चतुर्दशी ह्या शब्दांतील प्रथमचा 'अ' व 'तु' ह्यांबद्दल विकल्पें 'ओ' आदेश होतो. जसें:—चतुर्थी–चउत्थी, चोत्थी–चऊथ, चौथ; चतुर्दशी–चोद्दही, चउद्दही.

**अदातो यथादिषु वा** १०. यथा वगैरे शब्दांत 'अ' विकल्पें होतो. जसें:—यथा–जह, जहा; प्राकृत–पउअ, पाउअ; तथा–तह, तहा; तालवृन्तक–तालवेण्टअ, तलवेण्टअ; प्रस्तार–पत्थर, पत्थार–फत्तर ( दगड ); उत्खात–उक्खअ, उक्खाअ; प्रहार–पहर, पहार; चामर–चमर, चामर–चवरी; चाटु–चडु, चाडु; संस्थापित–सण्ठविअ, सण्ठाविअ,–सांठविलेलें; दावाग्नि–दवग्गी, दावग्गी. खादित–खइअ, खाइअ; हालिक–हलिअ, हालिअ;

**इत्सदादिषु** ११. सदा वगैरे शब्दांत ' आ 'च्या ऐवजीं विकल्पें ' इ ' आदेश होतो. जसें:–सदा–सइ, सआ; तदा–तइ, तआ; यदा–जइ, जआ.

**इत एतत्पिंडसमेषु** १२. ' पिंड ' आदी शब्दांत 'इ' बद्दल विकल्पें ' ए ' आदेश होतो. जसें:—पिण्ड–पेण्ड, पिण्ड–पेंढा; धम्मिल्ल–धम्मेल्ल, धम्मिल्ल; निद्रा–णिद्दा, णेद्दा–नीज; चिन्ह–चिंध, चेंध; सिंदूर–सेंदूर, सिंदूर–शेंदूर; विष्णु–विण्हू, वेण्हू–विनू; पिष्ट–पिट्ठ, पेट्ठ–पीठ.

टीपः–सूत्रांत ' सम ' शब्द आहे, त्यावरून असें समजावयाचें कीं, ' इ ' पुढें संयुक्त व्यंजन असेल, तेव्हां हा नियम लागू पडतो.

**अत्पथिहरिद्रापृथिवीषु** १३. पथिन् (मार्ग), हरिद्रा ( हळद ) वगैरे शब्दांत ' इ ' बद्दल ' अ ' आदेश होतो जसें:—हरिद्रा–हलद्दा–हळद; पथिन्–पह; पृथिवी–पुहवी.

**इतेस्तः पदादेः** १४. इति ' (ह्याप्रमाणें) हा शब्द वाक्याच्या प्रारंभीं आला असता ' त् ' च्या पुढील ' इ ' बद्दल ' अ ' आदेश होतो. जसें:–इति पश्यतान्यथावचनम्=इअ उअह अण्णहवअणं ( पाहा तें ढोंग ); इति विकसन्त्याश्चिरम्=इअ विअसंतीउ चिरं ( ह्याप्रमाणें फार वेळ विकसणाऱ्या ).

**टीपः**—वाक्याच्या प्रथमारंभीं ' इति ' असेल, तर ' इ बद्दल ' अ ' होतो असें म्हटलें आहे, त्यावरून इतर ठिकाणीं होत नाही, हें स्पष्ट आहे. जसें:—प्रिय इति=पिओत्ति.

**उदिक्षुवृश्चिकयोः १५.** इक्षु (ऊस) व वृश्चिक (विंचू) ह्या दोन शब्दांतील ' इ 'बद्दल ' उ ' आदेश होतो. जसें:—इक्षु—उच्छू—ऊस; वृश्चिक—विञ्छुअ—विंचू.

**ओ च द्विधाकृञः १६.** ' कृ ' धातूशीं ' द्विधा ' शब्दाचा उपयोग केला असतां ह्या शब्दांत 'ओ' आदेश होतो. सूत्रांत ' च ' शब्द आहे, त्यावरून १५ वे सूत्रांत सांगितलेला ' उ ' आदेशही होतो असें समजावें. जसें:—द्विधाकृतम् =दोहाइअं, दुहाइअं; द्विधा क्रियते=दोहाइज्जइ, दुहाइज्जइ.

**ईर्त्सिंहजिव्हयोश्च १७**—सिंह व. जिव्हा या शब्दांतील प्रथमच्या ऱ्हस्व ' इ ' बद्दल दीर्घ ' ई ' आदेश होतो. जसें:—सिंह—सीह—सिंह; जिव्हा—जीहा—जीभ.

**टीप**—सूत्रांत ' च ' आहे त्यावरून सिंह व जिव्हा ह्या शब्दांप्रमाणें ज्या दुसऱ्या शब्दांचा नामनिर्देश केला नाही, त्यांसही हें सूत्र लागू आहे, असें समजावें. म्हणून

विश्वस्त व विश्रंभ ह्यांबद्दल वीसत्थ व वीसंभ अशीं रूपें दृष्टीस पडतात. मराठींत सिंह शब्दाचें मूळचेंच रूप कायम ठेवण्यांत आलें आहे. जीहा असें एक रूप व जीब्भा असेंही रूप आढळांत येतें व त्यावरून जीभ हें रूप प्रचारांत आलें असलें पाहिजे. मराठींत असा साधारण नियम आहे कीं, अंत्य व उपांत्य ई, ऊ दोन्ही दीर्घ असावयाचे नाहीत. अंतींचे ई, ऊ दीर्घ असावयाचे; तेव्हां उपान्त्य इ उ ऱ्हस्व असावयाचे. अंन्तीं "अ" असेल, तर उपान्त्य इ, उ दीर्घ असावयाचे; मात्र उपान्त्याचा अनुस्वारासारखा उच्चार होत असेल, तर उपांत्य इ, उ ऱ्हस्व असावयाचे. अंतीं 'अ' शिवाय इतर स्वर असेल, तर उपांत्य इ, उ ऱ्हस्व असावयाचे. प्राकृत रूपाचें मराठी रूप बनवितांना हे नियम लक्षांत ठेवण्याची आवश्यकता फार आहे. जीब्भा ह्यांतील "जी" कायम ठेवावयाची आहे, तर अंतीं "भ" अक्षर ठेवावें लागतें. उलट पक्षीं "भ" कायम ठेवावयाचा आहे, तर उपांत्य दीर्घ "जी" कायम ठेवली पाहिजे. संयुक्त वर्णांची भानगड मराठींच्या स्वभावाविरुद्ध आहे. सोपें रूप करण्याविषयीं तिची प्रवृत्ती फार असते, ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

इदीतः पानीयादिषु १८. पानीय वगैरे शब्दांतील दीर्घ "ई" बद्दल ऱ्हस्व "इ" आदेश होतो. जसें:—पानीय—पाणिअ—पाणी; द्वितीय—दुइअ-

दुई, दुहो; गभीर–गहिर–गहिरा; अलीक–अलि-अ; व्यलीक–वलिअ; तदानीम्–तआणिं; करीष–कारिस; तृतीय–तइअ.

टीपः—प्राकृतांत "न" चा नेहमीं " ण " होतो. ह्याबद्दलचें सूत्र पुढें येईल. पाणिअ, दुइअ वगैरे शब्दांतील उपान्त्य " इ " व अंतींचा " अ " मिळून दीर्घ " ई " होते.

एन्नीडापीडकीदृगीदृशेषु १९. नीडा ( घरटें ), आपीड ( दाबणे ), कीदृक्, व ईदृक् ह्या शब्दांतील " ई " बद्दल " ए " आदेश होतो. जसें:–कीदृक्–केरिसो–कैसा, कसा; ईदृक्–एरिसो–ऐसा, असा; नीडा–णेड्ड; आपीड–आपेल.

उत ओत्तुंडरूपेषु २०. " तुण्ड " वगैरे शब्दांत " उ " बद्दल " ओ " होतो:—तुंड–तोंड–तोंड; मुक्ता–मोत्ता–मोती; पुस्तक–पोत्थअ–पोथी; पुष्कर–पोक्खर; लुब्धक–लोद्धअ; कुट्टिम ( रत्नाची खाण )–कोट्टिम.

टीपः—सूत्रामध्यें 'रूप' शब्द घातला आहे, त्याचा अर्थ असा समजावयाचा कीं, ' उ ' स्वरापुढें संयुक्त व्यंजन असलें पाहिजे. उ० तुण्ड, मुक्ता इ०.

उलूखले ल्वा वा २१. उलूखल शब्दांतील उकारासह जो ' लू ' त्याबद्दल विकल्पें ' ओ ' आदेश होतो. जसें:—ओक्खलं किंवा उलूहलं.

**अन्मुकुटादिषु २२.** मुकुट वगैरे शद्बांतील प्रथमच्या 'उ' बद्दल 'अ' आदेश होतो. जसें:—मुकुट–मउड; मुकुल–मउल; उपरि–अवरि–वरि, वर; गुरु–गरुअ; गुर्वी–गरुई; युधिष्ठिर–जहिट्ठिल.

टीपः—उपरि ह्यापासून अवरि हें रूप प्राकृतांत झालें. अरण्य, अरघट्ट वगैरे शब्दांतील पहिलें अक्षर 'अ' ह्याचा लोप होतो. त्याप्रमाणें 'अवरि' ह्यांतील 'अ'चा लोप होऊन 'वरि' हें रूप प्रथम बनलें व हें काव्यांत आढळतें; व 'वरि' ह्यापासून नंतर 'वर' हें सोपें रूप बनलें.

**इत्पुरुषे रोः २३.** पुरुष शब्दांतील 'रु' पैकीं 'उ' बद्दल 'इ' आदेश होतो. जसें:—पुरुषः =पुरिसो.

**उदूतो मधूके २४.** मधूक शब्दांतील 'ऊ' बद्दल 'उ' आदेश होतो. जसें:—मधूक–महुअ.

**अद्दुकूले वा लस्य द्वित्वम् २५.** 'दुकूल' शब्दांतील 'ऊ' बद्दल विकल्पें 'अ' आदेश होतो व ज्या वेळेस असा आदेश होतो, त्या वेळेस 'ल' द्वित्त होतो. जसें:–दुकूलम्=दुअल्लं, दुऊलं.

**एन्नूपुरे २६.** नूपुर शब्दांतील 'ऊ' बद्दल 'ए' आदेश होतो. जसें:—नूपुर=णेउर.

**ऋतोऽत् २७.** संस्कृत शब्दांच्या प्रथमारंभीच्या ऋकाराबद्दल 'अ' आदेश होतो. जसें:—तृण–

तण–तण; वृद्ध–वद्ध–बडा, बुड्ढा, वडील; वृषभ–वसह ( बैल )–वसू; घृणा–घणा; मृत–मअ; कृत–कअ.

इदृष्यादिषु २८. ऋषि वगैरे शब्दांतील ऋकाराबद्दल 'इ' आदेश होतो. जसें:—ऋषि–इसी; दृष्टि–दिट्ठी–दिठी ( काव्यांत ); वृषी–विसी; सृष्टि–सिट्ठी; भृंग–भिंग–भुंगा; गृष्टि–गिट्ठी; शृंगार–सिंगार; हृदय–हिअअ–हिय्या; मृगांक–मिअंक; भृंगार–भिंगार; कृपा–किवा–कीव; वितृष्ण–विइण्ह; बृंहित–बिंहिअ; कृशर–किसर; कृत्या–किच्चा; वृश्चिक–विंछुअ; शृगाल–सिआल; कृति–किई; कृषि–किसी.

उदृत्वादिषु २९. ऋतु वगैरे शब्दांच्या आरंभींच्या ' ऋ ' बद्दल उकार होतो. जसें:–ऋतु–उदू; प्रावृष्–पाउस–पाऊस; मृणाल–मुणाल; जामातृक–जामाउअ–जावई; पृथिवी–पुहवी; वृंदावन–वुंदावण; प्रवृत्ति–पउत्ती; विवृत–विउद; संवृत–संवुद; निर्वृत–णिव्वुद; वृत्तांत–वुत्तंत; परभृत–परहुअ; मातृक–माउअ.

अयुक्तस्य रिः ३०. जेव्हां ऋकाराचा दुसऱ्या वर्णाशीं संयोग नसतो, तेव्हां त्याऐवजीं ' रि ' आदेश होतो. जसें:—ऋण–रिण–रीण, ऋद्धि–रिद्धी-रिद्धी, ऋक्ष–रिच्छ–रीस ( आस्वल ).

टीपः—प्राकृतांतून मराठींत रूप बनतांना असा एक सामान्य नियम आहे कीं, प्राकृतांत जोडाक्षर असल्यास त्यांपैकीं एकाचा लोप होतो व त्याच्या पूर्व अक्षरास दीर्घत्व येतें. उ० ' रिच्छ ' या शब्दांत ' च्छ ' हें जोडाक्षर आहे. त्यांतील एक वर्ण नाहीसा होऊन पूर्वीचें अक्षर जें ' रि ' त्यास दीर्घत्व येतें व रीच्छ असें रूप बनतें. नंतर ' छ ' चा ' श ' व्हावयाचा; परंतु प्राकृतांत ' श ' व ' ष ' हे वर्ण न येतां ' स ' होतो व एकंदर रूप ' रीस ' असें आखेरीस बनतें. वर जो दीर्घत्वाचा नियम सांगितला तो बराच व्यापक आहे.

**क्वचिद्युक्तस्यापि** ३१. केव्हां केव्हां ऋकाराशीं एकाद्या वर्णाचा संयोग असतांही ऋकाराबद्दल रिकार होतो. जसें:—ईदृश–एरिस–ऐसा, असा; सदृश –सरिस–सरिसा ( काव्यांत ); तादृश–तारिस –तैसा, तसा.

**वृक्षे वेन रुर्वा** ३२. वृक्ष शब्दांतील वकारासह जो ' ऋ ' त्याबद्दल म्हणजे ' वृ ' बद्दल ' रु ' आदेश होतो. जसें वृक्ष–रुक्ख---रूख(काव्यांत).

**ऌतः क्लृप्त इलिः** ३३. क्लृप्त शब्दांतील ऌकाराला ' इलि ' असा आदेश होतो. ह्यावरून प्राकृत चा असा व्यापक नियम समजावयाचा कीं, ऋ अथवा ऌ वर्ण प्राकृत शब्दांत कधीं यावयाचा नाही. ह्याच नियमावरून शुद्ध मराठी शब्दांत

ऋकार अथवा ऌकार यावयाचा नाही, असा मराठीचाही व्यापक नियम झाला आहे. जे शुद्ध संस्कृत शब्द जशाचे तसेच ठेवण्यांत येतात, त्यांतीलमात्र ' ऋ ' अथवा ' ऌ ' कायम ठेवावयाचा. जसें ऋण, ऋषि, ऋग्वेद, ऋत्विज, ऋचा, ऋतु, ऋद्धि, ऋतुपर्ण, कॢप्ति इ०

**एत इद्वेदनादेवरयोः** ३४. वेदना व देवर ह्या शब्दांतील ' ए ' बद्दल ' इ ' आदेश होतो. जसें:— वेदना=विअणा; देवरः=दिअरो=दीर.

**टीपः**- वरील शब्दांच्या बाबतींत विकल्प सांगितला आहे, त्या अर्थी ' वेअणा ' व ' देअरो ' अशींही रूपें होतात, असें समजावें.

**ऐत एत्** ३५. शब्दांच्या प्रारंभीं ' ऐ ' असल्यास त्याबद्दल ' ए ' होतो. जसें:—शैल (पर्वत)—सेल; शैत्य—सेच्च; कैलास—केलास; ऐरावत—एरावण; त्रैलोक्य—तेलोक्क.

**दैत्यादिष्वइ** ३६. दैत्य वगैरे शब्दांत ' ऐ ' बद्दल ' अइ ' असा आदेश होतो. जसें:—दैत्य—दइच्च; चैत्र—चइत्त; वैर—वइर—वैर; स्वैर—सइर—सैरा( सैरावैरा ह्यांतील सैरा); वैशाख—वइसाह; दैव—दइव—दैव; भैरव—भइरव; वैदेश—वइदेस; वैदेह—वइदेह; कैतव—कइअव; वैशाख—वइसाह; वैशिक—वइसिअ; वैशंपायन—वइसंपाअण.

**दैवे वा ३७.** दैव शब्दांतील ' ऐ ' बद्दल ' अइ ' असा विकल्पें आदेश होतो. जसें:—दैवम्=दइवं, देव्वं.

**इत्सैंधवे ३८.** सैंधव शब्दांतील ' ऐ ' बद्दल ' इ ' आदेश होतो. जसें:–सैंधवम्=सिंधवं.

**ईद्धैर्ये ३९** धैर्य शब्दांतील 'ऐ' बदल 'ई' होतें. धैर्य–धीर–धीर.

**ओतोऽद्वा प्रकोष्ठे कस्य वः ४०.** प्रकोष्ठ शब्दांतील ' ओ ' बद्दल विकल्पें ' अ ' आदेश होतो व ज्या वेळेस असा आदेश होतो त्या वेळेस ह्या शब्दांतील ' क ' बद्दल ' व ' आदेश होतो. जसें:–प्रकोष्ठ=पवट्ठो, पओट्ठो.

**औत ओत् ४१.** प्रारंभींच्या ' औ ' च्या ठिकाणीं 'ओ' होतो. कौमुदी–कोमुई; यौवन–जोव्वण; कौस्तुभ–कोत्थुह; कौशाम्बी–कोसंबी.

**पौरादिष्वउ ४२.** पौर वगैरे शब्दांतील ' औ ' बद्दल ' अउ ' आदेश होतो. जसें:—पौर (शहरवासी)=पउर; कौरव=कउरव; पौरुष=पउरिस.

**टीपः**—कौशल ( कल्याण ) ह्या शब्दांत विकल्पें ' उ ' होतो, असें समजावें. जसें:—कौशल–कोसलो, कउसलो.

**आच्च गौरवे ४३.** गौरव शब्दांतील ' औ ' बद्दल ' आ ' आदेश होतो. सूत्रांत ' च ' शब्द

आहे, तेव्हां ' अउ ' असाही आदेश होतो, असें समजावयाचें. जसें:—गौरवम्=गारवं, गउरवं.

उत्सौंदर्यादिषु ४४. सौंदर्य वगैरे शब्दांतील ' औ ' बद्दल ' उ ' आदेश होतो. जसें:—सौंदर्यम्—सुंदेरं; मौंजायन=मुंजाअण; शौंड (मद चढलेला)==सुंड; कौक्षेयक ( तरवार )=कुक्खेअअ; दौवारिक ( द्वारपाल ) =दुव्वारिअ.

---

# परिच्छेद २ रा.

अयुक्तस्यानादौ १. 'अयुक्तस्यानादौ' हें अधिकार सूत्र आहे व ह्याचा पुढील सूत्रांत अंतर्भाव होतो, असें समजावें. पुढें जे नियम सांगण्यांत येतील, ते ज्या शब्दांच्या प्रारंभीं एकाकी व्यंजन नाही, अशा शब्दांस लागू आहेत असें समजावयाचें. दुसऱ्या सूत्रांत सांगितलें आहे कीं, 'क' वगैरे व्यंजनांचा लोप होतो, ह्यावरून सूत्राच्या अर्थाविषयीं संशय राहणार नाही. उदाहरणार्थ—संस्कृत ' मुकुट ' ह्याचें प्राकृतांत ' मउड ' असें रूप होतें. एकाकी व्यंजन असें ह्मटलें, ह्याचें कारण कीं, संस्कृत अर्घ व अर्क ह्या शब्दांत 'र्घ' व 'र्क' हीं जोडाक्षरें असल्यामुळें लोप न होतां त्यांचीं प्राकृतांत ' अग्घो ' व ' अक्को ' अशीं रूपें होतात.

अनादी म्हणण्याचें कारण कीं, कमल शब्दांतील प्रारंभींच्या 'क' चा लोप होत नाही व 'कमलं' असेंच रूप प्राकृतांत होतें. 'एकाकी' ही संज्ञा परिच्छेद समाप्त होईपर्यंत आहे व 'अनादी' ही संज्ञा ३१ वे सूत्रांत 'ज' होतो असें सांगितलें आहे, तोपर्यंत आहे असें समजावें.

**कगचजतदपयवां प्रायो लोपः २.** क्, ग्, च्, ज्, त्, द्, प्, य् आणि व् हे नऊ वर्ण एकटे असून शब्दांच्या प्रारंभीं नसतील, तेव्हां त्यांचा प्रायः लोप होतो. जसें:—मुकुल—मउल; नकुल—णउल; सागर—साअर; नगर—णअर—नेर (संगमनेर, पिंपळनेर, जामनेर, बडनेर); वचन—वअण; सूची—सूई—सुई; गज—गअ; रजत—रअद; कृत—कअ; वितान—विआण; गदा—गआ; मद—मओ; कपि—कई; विपुल—विउल; सुपुरुष—सुउरिसो; वायु—वाऊ; नयन—णअण; जीव—जीअ; दिवस—दिअह.

सूत्रांत 'प्रायः' असें म्हटलें आहे, त्यावरून श्रुतिसुख होत असेल, म्हणजे कानाला ज्या ठिकाणीं शब्द बरा लागत असेल त्या ठिकाणीं लोप होत नाही, असें समजावयाचें. उदाहरणार्थः—आदर—आदर—आदर; अपार—अपार—अपार; अयश—अजस; अतुल—अतुल—अतुल;

सुकुसुम—सुकुसुम; प्रियगमन—पिअगमण; सचाप—सचाव; अपजल—अवजल; सबहुमान—सबहुमाण.

टीपः—सुपुरुष ह्या शब्दांतील पुरुष ह्यांत जरी प्रारंभीं 'प' आहे, तथापि त्याचा लोप करावयाचा. कारण, वृत्तिकार असें म्हणतात कीं, उत्तर पदाच्या प्रारंभींचा वर्ण हा अनादीच आहे.

**यमुनायां मस्य ३.** यमुना शब्दांतील 'म' चा लोप होतो. जसें:—यमुना = जउणा.

**स्फटिकनिकषचिकुरेषु कस्य हः ४.** अनादी ही संज्ञा चालू आहेच. स्फटिक, निकष व चिकुर ह्या तीन शब्दांतील 'क' बद्दल 'ह' होतो. जसें:—स्फटिक = फलिहो; निकष = णिहसो; चिकुर ( केश ) = चिहुरो.

टीपः—ह्या व पुढील सूत्रांत 'लोपा' बद्दलचा विचार न सांगतां आदेशाबद्दलचा विचार सांगितला आहे.

**शीकरे भः ५.** शीकर ( पर्जन्याचे तुषार ) ह्या शब्दांतील 'क' बद्दल 'भ' आदेश होतो. जसें:—शीकर = सीभरो.

**चंद्रिकायां मः ६.** चंद्रिका शब्दांतील 'क' बद्दल 'म' आदेश होतो. जसें:—चंद्रिका = चंदिमा.

**ऋत्वादिषु तो दः ७.** ऋत्वादी शब्दांतील 'त' बद्दल 'द' आदेश होतो. जसें:—ऋतु—उदू; रजत—रअद; आगत—आअद; निर्वृति—णिव्वुदी;

आवृति–आउदी; संवृति–संवुदी; सुकृति–सुइदी; आकृति–आइदी; हत—हद; संयत—संजद; विवृत--विउद; संयात—संजाद; संप्रति—संपदि; प्रतिपत्ति—पडिवद्दी.

**प्रतिसरवेतसपताकासु डः ८.** प्रतिसर ( चाकर ), वेतस ( वेत ) व पताका ह्या शब्दांतील ' त ' बद्दल ' ड ' आदेश होतो. जसें:—प्रतिसर–पडिसर; वेतस—वेडिस; पताका—पडाआ.

**वसतिभरतयोर्हः ९.** वसति ( राहण्याचें ठिकाण ) व भरत ह्या दोन शब्दांतील तकाराबद्दल हकार होतो. जसें:—वसति–वसही; भरत—भरह.

**गर्भिते णः १०.** गर्भित शब्दांतील ' त ' बद्दल ' ण ' आदेश होतो. जसें:–गर्भित–गाब्भिण--गाभण ?

**टीपः**—गर्भिणी ह्यापासून गाब्भिणी व त्यापासून गाभण हें रूप झालें असावें असें दिसतें.

**ऐरावते च ११.** ऐरावत शब्दांतील तकाराबद्दलही णकार होतो. जसें:--ऐरावत=एरावण.

**प्रदीप्तकदम्बदोहदेषु दो लः १२.** प्रदीप्त, कदंब व दोहद ह्या शब्दांतील ' द ' स ' ल ' आदेश होतो. जसें:—प्रदीप्त–पलित्त--पलिता; कदम्ब—कलंब—कळंब; दोहद··दोहल-डोहळे.

**गद्गदे रः १३.** गद्गद ( अस्पष्ट ध्वनी ) ह्या शब्दांतील

'द' बद्दल 'र' आदेश होतो. जसें:—
गद्गद = गग्गर.

**संख्यायां च १४.** हें सूत्र 'गद्गदे रः' ह्याच्या पुढचें आहे, तेव्हां पूर्वीच्या सूत्रावरून प्रस्तुतच्या सूत्राचा असा अर्थ आहे कीं, संख्यावाचक शब्दांतील दकारास रेफादेश होतो, म्हणजे 'द'च्या ठिकाणीं 'र' होतो. जसें:–एकादश—एआरह—अकरा; द्वादश--बारह--बारा; त्रयोदश--तेरह—तेरा.

टीपः—चतुर्दश ह्याचें चउद्दह असें रूप प्राकृतांत व चउदा, चौदा अशीं रूपें मराठींत होतात; कारण, मूळ शब्दांतील 'द' एकाकी नसून त्याचा संयोग दुसऱ्या वर्णाशीं झाला आहे. असा संयोग झाला असतां 'द' चा 'र' होत नाही, असें समजावें.

**पो वः १५.** एकाकी, व प्रारंभीं नसणाऱ्या 'प' बद्दल 'व' आदेश होतो. जसें:—शाप--साव; शपथ—सवह; उलप--उलव; उपसर्ग--उवसग्ग.

टीपः—दुसऱ्या सूत्रांत सांगितलें आहे कीं, 'प' वगैरे नऊ वर्णांपैकीं एकादा वर्ण एकटा असून शब्दाच्या प्रारंभीं नसेल, तर त्याचा लोप होतो. अशा प्रकारें ज्या ठिकाणीं 'प' चा लोप होत नसेल, त्या ठिकाणीं वरील सूत्राची व्याप्ती आहे.

**आपीडे मः** १६. आपीड शब्दांतील पकाराचा मकार होतो. जसें:—आपीड = आमेलो.

**उत्तरीयानीययोर्ज्जो वा** १७. उत्तरीय शब्दांतील व ' अनीय ' प्रत्यय लागून बनलेले शब्दांतील ' य ' बद्दल विकल्पें ' ज्ज ' आदेश होतो. जसें:—उत्तरीय—उत्तरीअ, उत्तरिज्ज; रमणीय—रमणीअ, रमणिज्ज; भरणीय–भरणीअ, भरणिज्ज.

**छायायां हः** १८. छाया शब्दांतील यकाराबद्दल हकार आदेश होतो. जसें:—छाया—छाहा.

**कबंधे वो मः** १९. कबंध शब्दांतील ' ब ' बद्दल ' म ' आदेश होतो. जसें:—कबंध ( धड )–कमंधो.

**टो डः** २०. ' ट ' हा शब्दाच्या प्रारंभीं नसेल, तर त्याबद्दल ' ड ' होतो. जसें:—नट—णड; विटप—विडप.

**सटाशकटकैटभेषु ढः** २१. सटा ( जटा ), शकट ( गाडा ), कैटभ ( दैत्य ) ह्या शब्दांतील टकाराबद्दल ढकार होतो. सटा = सढा; शकट = सअढो; कैटभ = केढवो.

**स्फटिके लः** २२. स्फटिक शब्दांतील टकाराबद्दल लकार होतो. जसें:—स्फटिक—फलिहो.

टीप—स्फटिक शब्दांतील ' क ' चा ' ह ' होतो, तो परिशिष्ट २ सूत्र ४ प्रमाणें होतो.

**डस्य च** २३. ह्या सूत्राच्या पूर्वीचें सूत्र 'स्फटिके लः' असें आहे. ह्याप्रमाणें 'ट' चा 'ल' व्हावयाचा. तेव्हां 'डस्य च' ह्यांतील 'च' म्हणजे आणखी ह्या शब्दावरून 'ड' चाही 'ल' करावयाचा; परंतु हा 'ड' एकाकी असून शब्दाच्या आरंभीं असतां कामा नये. जसें:--- दाडिम--दालिम--डाळिंब; तडाग- तलाअ--तलाव, तळें; वडभि ( जांभई देणे )—वलही.

**टीपः**--- मुळांत 'प्रायः' असा शब्द आहे, त्यावरून दाडिम, वडिस, णिविड वगैरे रूपेंही ग्राह्य आहेत असें समजावें

**ठो ढः** २४. ठकार एकाकी असून शब्दाच्या प्रारंभीं नसेल, तर त्याऐवजीं ढकार होतो. जसें:---मठ --मढ, कठोर--कढोर; जठर---जढर इ०

**अंकोठे ल्लः** २५. अंकोठ ( वनस्पती ) शब्दांतील ठकाराचा ल्लकार होतो. जसें:—अंकोठ—अंकोल्लो.

**फो भः** २६. फकार एकाकी असून शब्दाच्या प्रारंभीं नसेल, तर त्याऐवजीं भकार होतो. जसें:—सफल—सभल; शिफा ( तंतूंसह असणारें मूळ )—सिभा; शेफालिका ( पुष्प )—सेभालिआ; शफरी ( लहान मासा )—सभरी.

**खघथधभां हः** २७. ख्, घ्, थ्, ध्, व भ्, ह्या पांच व्यंजनांपैकीं एकादें व्यंजन एकाकी असून

शब्दाच्या आरंभीं नसेल, तर त्याबद्दल हकार आदेश होतो. जसें:—मुख–मुह; मेघ–मेह; गाथा–गाहा; शपथ–सवह; राधा–राहा; बधिर–बहिर–बहिरा; सभा–सहा; रासभ–रासह; मेखला–मेहला; जघन–जहण.

टीप:—२३ वे सूत्रांतील 'प्राय:' घेऊन चालावयाचें, म्हणून पुढील रूपें दृष्टीस पडतात:—प्रखल ( फार नीच )–पखल; प्रलंघन ( उल्लंघन )–पलंघण; अधीर–अधीर; अधन–अधण; उपलब्ध भाव–उवलद्ध भाव.

**प्रथमशिथिलनिषधेषु ढः २८.** प्रथम, शिथिल व निषध ह्या शब्दांतील ' थ ' व ' ध ' ह्यांऐवजीं ' ढ ' आदेश होतो. जसें:—प्रथम–पढम; शिथिल–सिढिल–सढळ; निषध–णिसढ.

**कैटभे वः २९.** कैटभ शब्दांतील भकाराचा वकार होतो. जसें:—कैटभ = केढवो.

**टीप**—कैटभ शब्दांतील ' ट ' चा ' ढ ' परि. २ सूत्र २१ प्रमाणें होतो.

**हरिद्रादीनां रो लः ३०.** हरिद्रा वगैरे शब्दांतील रकारास ' ल ' आदेश होतो. जसें:—हरिद्रा–हलद्दा–हळद; चरण ( पाय )–चलण; करुण (दीन) –कलुण; अंगुरी ( बोट )–अंगुली; अंगार–इंगाल–इंगळी; मुखर–मुहर; युधिष्ठिर–जहिट्ठिल;

सुकुमार–सोमाल; किरात–चिलाद; परिखा–फलिहा; परिघ–फलिह.

**आदेर्यो जः** ३१. शब्दाच्या आरंभीं ‘ य ’ असेल, तर त्याबद्दल ‘ ज ’ आदेश होतो. जसें:—यष्टि–जट्ठी; यश–जस; यक्ष–जक्ख; यात्रा–जत्ता--जत्रा; यति–जती; यंत्र–जंत–जातें.

**टीप:**—वरील शब्दांपैकीं यष्टि शब्दाचा अर्थ काठी नसावा, असें पुढील सूत्रावरून दिसतें.

**यष्ट्यां लः** ३२. यष्टि ( काठी ) शब्दांतील ‘ य ’ बद्दल ‘ ल ’ आदेश होतो. जसें:—यष्टि–लट्ठी–लाटी ( हिंदुस्थानी ).

**किराते चः** ३३. किरात शब्दांतील आरंभींच्या ‘ क ’ वर्णाबद्दल ‘ च ’ आदेश होतो. जसें:—किरात=चिलादो.

**कुब्जे खः** ३४ कुब्ज शब्दांतील ‘ क ’ बद्दल ‘ ख ’ आदेश होतो. जसें:—कुब्ज–खुज्ज–खुजा.

**दोलादंडदशनेषु डः** ३५. दोला (डोली), दंड (काठी), दशन ( दांत ) ह्यांतील आद्य वर्णास डकार आदेश होतो. जसें:—दोला--डोला–डोली; दंड–डंड; दशन–डसण–डसणे.

**परुषपरिघपरिखासु फः** ३६. परुष (कठोर), परिघ व परिखा ह्या शब्दांतील आरंभींच्या ‘ प ’ बद्दल

'फ' आदेश होतो. जसें:—परुष=फरुसो; परिघ=फलिहो; परिखा=फलिहा.

**पनसेऽपि** ३७. ह्याच्या अगोदरचें सूत्र "पुरुषपरिघ-परिखासु फः" असें आहे; त्यांत आद्य वर्णास फकार करावा असें सांगितलें आहे. तेव्हां पनस शब्दांतील प्रारंभींच्या वर्णास फकार आदेश होतो. जसें;—पनस–फणस–फणस.

**बिसिन्यां भः** ३८. बिसिनी शब्दांतील प्रारंभींच्या 'ब' वर्णाबद्दल भकार होतो. जसें:—बिसिनी ( कमलसमुच्चय )–भिसिणी.

**टीपः**—सूत्रांत बिसिनी स्त्रीलिंगी शब्दांविषयीं सांगितलें, त्यावरून नपुंसकलिंगी 'बिसं' ह्या शब्दास वरील सूत्र लागू नाही, असें अनुमान करावयाचें.

**मन्मथे वः** ३९. मन्मथ ( मदन ) शब्दांतील आदी वर्ण जो 'म' त्याबद्दल 'व' आदेश होतो. जसें:—मन्मथ=वम्महो.

**लाहले णः** ४०. लाहल शब्दांतील आरंभींच्या 'ल' बद्दल 'ण' आदेश होतो. जसें:—लाहल =णाहलो.

**षट्शावकसप्तपर्णानां छः** ४१. षष्ठी, षण्मुख ( कार्तिकस्वामी ), शावक ( लहान प्राणी ) व सप्तपर्ण ( वृक्ष विशेष ) ह्यांतील आद्य वर्णास छकार

आदेश होतो. जसें:—षष्ठी–छट्ठी–; षण्मुख–छम्मुह; शावक–छावअ=छावा; सप्तपर्ण--छत्तवण्ण.

**नो णः सर्वत्र** ४२. 'न' बद्दल सर्वत्र 'ण' आदेश करावयाचा; मग हा 'न' प्रारंभीं असो किंवा कोठेंही असो. जसें:—नदी–णई; कनक–कणअ; वचन–वअणं; मानुष–माणुस–माणूस.

**शषोः सः** ४३. 'श' व 'ष' ह्यांबद्दल सर्वत्र सकार करावयाचा. जसें:—शब्द–सद्द–साद; निशा ( रात्र )–णिसा; अंकुश–अंकुस; वृषभ–वसह; षंढ–संढ; कषाय–कसाअ.

**दशादिषु हः** ४४.दशादी जे संख्यावाचक शब्द त्यांतील शकाराबद्दल हकार होतो. जसें:—दश-दह–दहा; एकादश–एआरह–अकरा; द्वादश–बारह–बारा; त्रयोदश–तेरह–तेरा; चतुर्दश–चउद्दह–चउदा, चौदा.

**संज्ञायां वा** ४५. जेव्हां एकादा शब्द संज्ञावाचक असेल, तेव्हां 'दश' शब्दांतील 'श' बद्दल 'ह' विकल्पें होतो. जसें:—दशमुख (रावण) =दहमुहो, दसमुहो; दशबल ( बौद्ध धर्मगुरू ) =दहबल, दसबल; दशरथ=दहरहो, दसरहो.

**दिवसे सस्य** ४६. दिवस शब्दांतील 'स' बद्दल 'ह' आदेश होतो. जसें:—दिवस–दिअहो.

टीपः—' द ' चा ' र ' कसा होतो, हें १४ वे सूत्रांत सांगितलें आहे. ' ह ' चा ' अ ' होऊन किंवा ' ह ' जाऊन शेवटील स्वरास दीर्घत्व येतें, असें दिसतें.

**स्नुषायां ण्हः** ४७. स्नुषा शब्दांतील षकाराबद्दल 'ण्ह' आदेश होतो. जसें:—स्नुषा–सोण्हा–सून.

---

# परिच्छेद ३ रा.

**उपरिलोपः कगडदपषसाम्** १. क्, ग्, ड्, द्, प्, ष्, स् ह्या आठ व्यंजनांपैकीं एकादें व्यंजन संयुक्त वर्णांत प्रथम म्हणजे वर असेल, तर त्याचा लोप होतो. जसें:–सिक्थक–सित्थअ; भक्त–भत्त; मुग्ध ( मूर्ख )–मुद्ध; स्निग्ध–सिणिद्ध; खड्ग-खग्ग; षड्ज ( सूर )-सज्ज; उत्पल (कमल) –उप्पल; उत्पात–उप्पाअ; मुद्ग––मुग्ग; मुद्गर ( हातोडा )–मुग्गर; सुप्त ( निजलेला )–सुत्त; पर्याप्त—पज्जत्त; गोष्ठी ( समाज ) गोट्ठी; स्खलित ( घसरलेलें )—खलिअ; निष्ठुर–निट्ठुर; स्नेह–णेह.

**टीप**—क, ग वगैरे वर्णांपैकीं एकादा वर्ण प्रथम असेल, तर त्याचा वरील सूत्राप्रमाणें लोप होतो, परंतु दुसरा जो वर्ण राहतो तो शब्दाच्या प्रारंभीं नसेल, तर त्यास द्वित्व होतें. हें द्वित्व पुढील म्हणजे चालू परिच्छे-

दाच्या ९० व ९१ सूत्रांप्रमाणें होतें. 'ठ्ठ', 'द्ध' असें होणे, हें द्वित्वच समजावयाचें.

**अधो मनयाम्** २. म्, न् व य् ह्या तीन व्यंजनांपैकीं एकादें व्यंजन संयुक्त वर्णांत खालीं, म्हणजे शेवटीं आलें, तर त्याचा लोप होतो. जसें:— शुष्म( प्रकाश )–सोस्स; रश्मि ( किरण )–रस्सी; युग्म–जुग्ग–जूग; वाग्मी (वक्ता)–वग्गी; योग्य–जोग्ग–जोगा; नग्न–णग्ग–नाग+डा ( नागडा, नागवा ); सौम्य–सोम्म.

**टीपः**—म, न आणि य ह्या तीन व्यंजनांपैकीं एकादें व्यंजन संयुक्त वर्णांत शेवटीं आलें, तर त्याचा लोप होतो, पण बाकी राहिलेल्या वर्णास सूत्रें ९० व ९१ ह्यांप्रमाणें द्वित्व होतें.

**सर्वत्र लवराम्** ३. ल, व, र ह्या वर्णांपैकीं एकादा वर्ण संयुक्त वर्णांत प्रथम अगर शेवटीं आला तरी, त्याचा सर्वत्र लोप करावयाचा. जसें:— उल्का–उक्का; वल्कल ( साल )–वक्कल; पक्व–पिक्क–पिकलेलें; शक्र ( इंद्र )––सक्क; अर्क (सूर्य)–अक्क; विक्लव–विक्कव; लुब्धक–लोद्धअ;

**टीपः**—ल, व, र ह्यांचा वरील सूत्राप्रमाणें लोप होतो; परंतु बाकी राहिलेल्या वर्णास ९० व ९१ सूत्रांप्रमाणें द्वित्व होतें.

**द्रे रो वा** ४. द्र ह्या संयुक्त वर्णांतील रकाराचा विकल्पें लोप होतो. द्रोह–दोह, द्रोह; चंद्र–चंद, चंद्र–चांद, चंद्र; रुद्र–रुद्द, रुद्र.

**सर्वज्ञतुल्येषु ञः** ५. 'सर्वज्ञ' सारख्या शब्दांतील 'ञ' चा लोप होतो:—सर्वज्ञ–सव्वज्ज; इंगितज्ञ–इंगिअज्ज.

**टीप**–'ज्ञ' हा संयुक्त वर्ण असून तो 'ज' व 'ञ' मिळून झाला आहे. 'ञ' चा लोप होऊन वर सांगितल्याप्रमाणें दुसऱ्या वर्णास द्वित्व होतें. 'ज्ञ' संयुक्त वर्ण हा ज्या शब्दांमध्यें यावयाचा, ते शब्द अथवा त्यांपैकीं एक अवयव 'ज्ञा' धातूपासून प्रायः बनलेला असतो. अशा ठिकाणीं 'ज्ञ' चा लोप होतो, असें समजावें.

**स्मश्रुस्मशानयोरादेः** ६. स्मश्रु व स्मशान ह्या दोन शब्दांतील आदी वर्ण जो 'स्' त्याचा लोप होतो. जसें:–स्मश्रु–मस्सू; स्मशान–मसाण.---मसणवाट, मषणांत.

**मध्यान्हे हस्य** ७, मध्यान्ह शब्दांतील हकाराचा लोप होतो. जसें:—मध्यान्ह=मज्झण्ण.

**ह्नह्लह्मेषु नलमां स्थितिरूर्द्धं** ८. ह्न, ह्ल व ह्म ह्या संयुक्त वर्णांतील न्, ल् व म् हे वर्ण अनुक्रमें 'ह' च्या अगोदर लिहावे. जसें:–पूर्वाह्ण=पुव्वण्ह, अपराह्ण=अवरण्ह, कह्लार ( पांढरें कमळ )= कल्हार; अह्लाद=अल्हाद; ब्राह्मण=ब्रम्हण.

युक्तस्य ९. हें अधिकार सूत्र असून चालू परिच्छेद संपेप-
र्यंत पुढील सर्व सूत्रांस लागू आहे, असें समजावें.
आतां जे नियम सांगण्यांत येतील ते संयुक्त
वर्णांबद्दल कोणकोणते आदेश होतात, ह्यांविष-
यीं होत. उदाहरणार्थ 'आस्थि' ह्याचें 'अट्ठी'
असें रूप होणे. संयुक्त वर्ण म्हणण्याचें कारण
कीं, जे आदेश व्हावयाचे ते अंत्याक्षरासंबंधाने
नाहीत. कारण, अंतींच्या त्या संयुक्त वर्णांपैकीं
दुसऱ्या वर्णाचा लोप होतो. (पाणिनी ८
२, २३ पाहा).

ष्टस्य ठः १०. 'ष्ट' ह्या संयुक्त वर्णांबद्दल ठकार
होतो. जसें यष्टि—लट्ठी—लाटी; दृष्टि—दिट्ठी—दिठी.

आस्थिनि ११. अस्थि (हाड) ह्या शब्दांतील संयुक्त
वर्ण जो 'स्थ' त्याबद्दल ठकार होतो. जसें:—
आस्थि=अट्ठी.

स्तस्य थः १२. 'स्त' च्या ठिकाणीं थकार होतो.
जसें:—हस्त—हत्थ—हात; स्तुति—थुई; समस्त—
समत्थ; स्तबक—थबअ; कौस्तुभ—कोत्थुह.

टीप—संयुक्त वर्णांत प्रथम स् वगैरे वर्ण आला,
तर त्याचा लोप करावयाचा असें "उपरिलोपः कगडद-
षषसाम्" ह्या सूत्रांत सांगितलें आहे; पण चालू सूत्र
हें अपवादादाखल आहे, असें समजावें.

**न स्तंबे** १३. स्तंब शब्दांतील स्तकाराचा थकार होत नाही. जसें:—स्तंब=तंब.

**टीप:**—स्तंब शब्दांतील सकाराचा लोप परि० ३ सूत्र १ प्रमाणें होतो.

**स्तंभे खः** १४. स्तंभ शब्दांतील 'स्त' बद्दल 'ख' आदेश होतो. जसें:—स्तंभ–खंभ–खांब.

**स्थाणावहरे** १५. स्थाणु ( दृढ ) शब्दांतील संयुक्त वर्ण जो 'स्थ' त्याबद्दल खकार होतो. जसें:—स्थाणु=खाणू. स्थाणु शब्दाचा अर्थ 'हर' असा असेल, तेव्हां 'स्थ' चा 'ख' होत नाही. असा अपवाद करण्याचें कारण कीं, असा अर्थ असेल, तेव्हां 'स्थाणु' बद्दल 'थाणू' असें रूप प्राकृतांत होतें.

**स्फोटके** १६. स्फोटक ( गळू ) शब्दांतील संयुक्त वर्णाबद्दल खकार होतो:—स्फोटक=खोडअ.

**र्यशय्याभिमन्युषु जः** १७. संयुक्त वर्ण 'र्य' ह्याबद्दल व शय्या व अभिमन्यु ह्या दोन शब्दांतील संयुक्त वर्ण 'य्य' व 'न्य' ह्यांबद्दल 'ज' आदेश होतो. जसें:—कार्य–कज्ज–काज ( कामकाज ह्यांतील ); शय्या–सेज्जा–सेज, शेज; अभिमन्यु–अहिमज्जू.

**टीप**—जोडाक्षरांपैकीं एकाचा लोप झाला असतां दुसऱ्यास द्वित्व व्हावयाचें, हा नियम लागू आहेच.

**तूर्यधैर्यसौंदर्याश्चर्यपर्यंतेषु रः १८.** तूर्य, धैर्य, सौंदर्य, आश्चर्य व पर्यंत ह्या शब्दांतील 'र्य' बद्दल 'र' आदेश होतो. तूर्य—तूर; धैर्य—धीर—धीर; सौंदर्य—सुंदेर; आश्चर्य—अच्छेर; पर्यंत—पेरंत.

**टीप**—९४ व्या सूत्राप्रमाणें 'र' व 'ह' ह्यांस द्वित्व नाही, म्हणून द्वित्व करण्याविषयींचें ९० वें सूत्र ह्या ठिकाणीं लागू पडत नाही, असें समजावें.

**सूर्ये वा १९.** हें सूत्र १८ व्या सूत्राच्या पुढीलच सूत्र आहे; म्हणून त्याचा अर्थ असा समजावयाचा कीं, सूर्य शब्दांतील 'र्य' बद्दल विकल्पें 'र' होतो. जसें:—सूर्य—सूर किंवा सुज्ज.

**चौर्यसमेषु रिअं २०.** चौर्य शब्दासारख्या शब्दांत 'र्य' बद्दल 'रिअं' असा आदेश होतो. जसें:—चौर्य—चोरिअं—चोरी; शौर्य—सोरिअं; वीर्य—वीरिअं—विरी ( चुन्याची. )

**टीप**:—सूत्रांत 'सम' असें म्हटलें आहे, त्यावरून ह्या वर्गांतील शब्दांचें नियमन अधिकृत आहे, असें समजावें.

**पर्यस्तपर्याणसौकुमार्येषु लः २१.** पर्यस्त ( अस्ताव्यस्त ), पर्याण ( खोगीर ) व सौकुमार्य ह्या शब्दांतील 'र्य' बद्दल लकार होतो. जसें:—पर्यस्त—पल्लथ—पालथा; सौकुमार्य—सोअमल्ल; पर्याण—पल्लाण.

**र्तस्य टः** २२. ' र्त ' बद्दल ' ट ' होतो. जसें:- कैवर्तक ( कोळी )-केवट्टअ; नर्तक-णट्टअ; नर्तकी-णट्टई.

**पत्तने** २३. वरील सूत्रावरून पत्तन शब्दांतील ' त ' बद्दल ' ट ' आदेश होतो. जसें:-पत्तन-पट्टण-पट्टण ( विजगापट्टण, श्रीरंगपट्टण, मच्छली-पट्टण इ० ).

**न धूर्तादिषु** २४. धूर्त आदी शब्दांत जरी ' र्त ' आहे, तरी ' र्त ' बद्दल ' ट ' होत नाही. जसें:-धूर्त--धुत्त; कीर्ति--कित्ती; वार्ता--वत्ता--बात; कर्तरी-कत्तरी -कातरी, कातर; मूर्ति--मुत्ती; वर्तमान-वत्तमाण.

**गर्ते डः** २५. गर्त (खळी) शब्दांतील ' र्त ' चा डकार होतो. जसें:-गर्त=गड्ड.

**गर्दभसंमर्दवितर्दिविछर्दिषु र्दस्य** २६. गर्दभ (वास), संमर्द ( तुडविणे ), वितर्दि ( आच्छादन असलेली गच्ची ), विछर्दि ह्या शब्दांतील ' र्द ' बद्दल ' ड ' आदेश होतो. जसें:-गर्दभ-गड्डह; संमर्द-संमड्ड; वितर्दि-विअड्डी, विछर्दि - विछड्डी.

**त्यथ्यद्यां चछजाः** २७. त्य, थ्य, व द्य ह्यांऐवजीं अनुक्रमें च, छ, ज असे आदेश होतात. जसें:- नित्य-णिच्च; प्रत्यक्ष-पच्चच्छ; मिथ्या-मिच्छा;

पथ्य–पच्छ; रथ्या ( रस्ता )–रच्छा; विद्या-विज्जा; वैद्य–वेज्ज.

ध्यह्योर्झः २८. ‘ ध्य ’ व ‘ ह्य ’ ह्यांबद्दल झकार होतो. जसें:—मध्य–मज्झ; अध्याय–अज्झाअ; गुह्य ( गुप्त )- गुज्झ–गूज ( गुजगोष्टी ह्यांतील गूज ); बाह्यक ( बाहेरचें )–वज्झअ.

ष्कस्कक्षां खः २९. ष्क, स्क, व क्ष ह्यांबद्दल खकार होतो. जसें:—मुष्क ( ढीग )--मुक्ख; पुष्कर ( सरोवर )–पोक्खर–पोखर; स्कंद, ध (खांदा) –खंद, खंध–खांदा; यक्ष–जक्ख; क्षत ( जखमी झालेला )–खत.

अक्ष्यादिषु छः ३० अक्षि वगैरे शब्दांतील ‘ क्ष ’--- बद्दल छकार होतो. जसें:—अक्षि (डोळा)--- अच्छी; लक्ष्मी–लच्छी; क्षुण्ण–छुण्ण; क्षीर (दूध) –छीर–खीर; क्षुब्ध–छुद्ध; क्षार–छार; रिक्ष (अस्वल )–रिच्छ–रीस; मक्षिका–मच्छिआ–माशी; क्षेत्र–छेत–शेत; कुक्षि–कुच्छी–कूस; उत्क्षिप्त– ( वर फेकलेलें ) उच्छित्त; सदृक्ष ( सारखा )--- सरिच्छ; इक्षु–उच्छू=ऊस; उक्षन् ( बैल )— उच्छा; क्षुत–छुअ; क्षुर ( वस्तरा )–छुर; वक्षस् –वच्छ; दक्ष—दच्छ.

क्षमावृक्षक्षणेषु वा ३१. क्षमा, वृक्ष व क्षण ह्यांतील

' क्ष ' चा विकल्पें छकार होतो. जसें:—क्षमा--छमा, खमा; वृक्ष–वच्छ, रुक्ख; क्षण–छण, खण.

टीप.—वृक्ष शब्दांतील ऋकाराबद्दल परिच्छेद १ सूत्र ३ प्रमाणें ज्या वेळेस 'अ' आदेश होतो, त्या वेळेस ' क्ष ' बद्दल ' छ ' आदेश होतो; व क्षण शब्दाचा अर्थ उत्सव असा असतो ,तेव्हां ' क्ष ' बद्दल छ होतो.

**ष्मपक्ष्मविस्मयेषु म्हः ३२.** ' ष्म ' बद्दल व पक्ष्म व विस्मय ह्या दोन शब्दांतील संयुक्त वर्णांबद्दल ' म्ह ' आदेश होतो. जसें:- ग्रीष्म--गिम्ह; पक्ष्म (पापणी)–पम्ह; विस्मय–विम्हअ; उष्मा–उम्हा.

**न्हस्नष्णक्ष्णश्नां ण्हः ३३.** न्ह, स्न, ष्ण, क्ष्ण व श्न ह्यांबद्दल ' ण्ह ' आदेश होतो. जसें:—वन्हि–वण्ही; जन्हु–जण्हू; स्नान—ण्हाण—न्हाण; प्रस्नुत—पण्हुद; कृष्ण–कण्ह–कान्हा, कन्हया ( कृष्णाचें नाव ); विष्णु–विण्हू--विनू; तीक्ष्ण–तिण्ह; श्लक्ष्ण ( लहान )--सण्ह; प्रश्न--पण्ह.

**चिन्हे न्धः ३४.** चिन्ह शब्दांतील संयुक्त वर्ण ' न्ह ' ह्याबद्दल ' न्ध ' असा आदेश होतो. जसें:—चिन्ह = चिन्ध.

**ष्पस्य फः ३५.** ' ष्प ' बद्दल ' फ ' आदेश होतो. जसें:—पुष्प–पुप्फ; शष्प ( कोवळें गवत )—सप्फ; निष्पाय ( पाण्याशिवाय )–णिप्फाअ.

**ष्पस्य सर्वत्र स्थितस्य** ३६. मागील सूत्रांत सांगितलें आहे कीं, ' ष्प ' बद्दल ' फ ' होतो; तेव्हां ह्या सूत्राचा अर्थ असा समजावयाचा कीं, जेथें जेथें शब्दांत 'स्प' संयुक्त वर्ण येईल, तेथें तेथें त्याऐवजीं ' फ ' आदेश करावयाचा. जसें:— स्पर्श—फंस; स्पंदन—फंदण—फुंदणें ?

**सि च** ३७. ' स्प ' स क्वचित् ' सि ' आदेश होतो. जसें:—प्रतिस्पर्धी—पाडिसिद्धी.

**बाष्पेऽश्रुणि हः** ३८. बाष्प शब्दाचा अर्थ ' अश्रु ' असा असेल, तेव्हां त्यांतील ' ष्प ' बद्दल ' ह' आदेश होतो. जसें:—बाष्प = बाह. ' अश्रु ' असा अर्थ म्हणण्याचें कारण कीं, ज्या वेळेस त्याचा अर्थ वाफ असा असतो त्या वेळेस त्याचें रूप प्राकृतांत ' वप्फ ' असें होतें. ( परिच्छेद ३ सूत्र ३६ पाहा. )

**कार्षापणे** ३९. कार्षापण ( एका प्रकारचें वजन ) शब्दांतील ' र्ष ' बद्दल हकार होतो. जसें:— कार्षापण = काहावण.

**टीप:**—'प' चा 'व' झाला तो ' पो वः ' परि० २ सूत्र १५ प्रमाणें झाला.

**श्चत्सप्सां छः** ४० श्च, त्स, व प्स ह्यांबद्दल ' छ ' आदेश होतो. जसें:—पश्चिम—पच्छिम; आश्चर्य-

अच्छेर; वत्स--वच्छ; लिप्सा ( इच्छा )–लिच्छा.

**वृश्चिके ञ्छः** ४१. वृश्चिक शब्दांतील ' श्च ' बद्दल ' ञ्छ ' आदेश होतो. जसें:—वृश्चिक–विञ्छु· अ–विंचू.

**नोत्सुकोत्सवयोः** ४२. उत्सुक व उत्सव ह्या दोन शब्दांतील ' त्स ' बद्दल छकार होत नाही. जसें:—उत्सुक–उस्सुअ; उत्सव–उस्सव.

टीपः—४० वे सूत्रांत सांगितलें आहे कीं, ' त्स ' बद्दल ' छ ' होतो. तेव्हां ४२ वें सूत्र अपवादादाखल आहे असें समजावें.

**न्मो मः** ४३. ' न्म ' बद्दल ' म ' आदेश होतो. जसें:—जन्म–जम्म; मन्मथ–वम्मह.

टीपः—' अधोमनयाम् ' ह्या दुसऱ्या सूत्राप्रमाणें ' म ' हा वर्ण शेवटील असल्यामुळें त्याचा लोप व्हावयाचा; परंतु ह्या सूत्रावरून होत नाही व हें सूत्र अपवादक समजावें.

**म्नज्ञपंचाशत्पंचदशेषु णः** ४४. म्न व ज्ञ ह्यांबद्दल व पञ्चाशत् ( पन्नास )व पंचदश (पंधरा) ह्यांतील संयुक्त वर्ण ' ञ्च ' ह्याबद्दल ' ण ' आदेश होतो. जसें:–प्रद्युम्न–पज्जुण्ण; यज्ञ–जण्ण; विज्ञान–विण्णाण; पञ्चाशत्–पण्णासा––पन्नास; पञ्चदश-पण्णरह–पंधरा.

**तालवृन्ते ण्टः** ४५. तालवृंत ( पंखा ) ह्या शब्दांतील ' न्त ' बद्दल ' ण्ट ' आदेश होतो. जसें:— तालवृन्त = तालवेण्टअ.

**भिन्दिपाले न्डः** ४६. भिंदिपाल ( बाण ) शब्दांतील संयुक्त वर्ण जो ' न्द ' त्याबद्दल ' ण्ड ' आदेश होतो. जसें:—भिन्दिपाल–भिण्डिवाल.

**विव्हले भहौ वा** ४७. विव्हल शब्दांतील संयुक्त वर्ण ' व्ह ' बद्दल विकल्पें ' भ ' व ' ह ' असे आदेश होतात. विव्हल= वेब्भल, विहल.

**आत्मनि पः** ४८. आत्मन् शब्दांतील संयुक्त वर्णास ' प ' आदेश होतो. जसें:–आत्मा--अप्पा.

**टीप**—सूत्रें ४८ व ४९ हीं दोन्हीं एकत्र करतां येण्यासारखीं आहेत, परंतु तीं निराळीं करण्याचें कारण कीं, ४९ वें सूत्र नित्यार्थी आहे व ४८ वें अंशतः लागू आहे. कारण, आत्मा शब्दाचें रूप अप्पा असें होतें व परि. ९ सूत्र ४९ प्रमाणें अप्पाण असेंही होतें. पण रुप्प व रुप्पिणी ह्यांचीं दुसरीं रूपें होत नाहीत.

**क्मस्य** ४९. ' क्म ' च्या ठिकाणीं ' प ' आदेश होतो. जसें:—रुक्म ( सोनें )—रुप्प; रुक्मिणी–रुप्पिणी.

**शेषादेशयोर्द्वित्वमनादौ** ५०. एकाद्या नियमाअन्वयें एकाद्या वर्णाचा लोप केल्यावर अथवा एकाद्या

वर्णाचा आदेश केल्यावर संयुक्त वर्णाचा प्रतिनिधी ह्मणून जो वर्ण अवशिष्ट राहिला असेल, तो शब्दाच्या प्रारंभीं नसेल, तर त्यास नेहमीं द्वित्व होतें. जसें:—

(अ) भुक्त (खाल्लेलें)–भुत्त; मार्ग–मग्ग–माग;

(ब) यष्टि–लट्ठी; दृष्टि–दिट्ठी; हस्त—हत्थ.

**टीपः**—( अ ) गटांतील शब्दांत एका वर्णाचा लोप झाल्यावर बाकी राहिलेल्या वर्णास द्वित्व झालें आहे. ( ब ) गटांतील शब्दांमध्यें एका वर्णाच्या ठिकाणीं दुसऱ्याचा आदेश झाल्यावर द्वित्व झालें आहे. ‘ शब्दाच्या प्रारंभीं नसेल तर ’ असें जें वर म्हटलें आहे, तें अशासाठीं कीं, शब्दाच्या प्रारंभीं संयुक्त वर्णापैकीं एकाचा लोप होऊन बाकी जो वर्ण राहतो त्यास द्वित्व होत नाही, अशीं उदाहरणें आढळतात. तीं:–स्खलित–खलिअ; स्तंभ–खंभ; स्तबक (तुरा)–थवअ.

**वर्गेषु युजः पूर्वः ५१.** जेव्हां वरील सूत्रांत सांगितल्याप्रमाणें द्वित्व होतें ( मग हें द्वित्व संयुक्त वर्णांपैकीं प्रथम अथवा दुसऱ्या वर्णास होवो ) तेव्हां अवशिष्ट राहिलेला एकटा प्रतिनिधी वर्ण महाप्राण असेल, ( म्हणजे वर्गांतील दुसरा किंवा चौथा वर्ण असेल ) तर महाप्राण वर्णास द्वित्व करावयाचें व महाप्राण कायम ठेवून त्याच्या जातीचा जो

अमहाप्राण तो त्याच्यापूर्वी जोडावयाचा व द्वित्व करावयाचें. दुसऱ्या म्हणजे महाप्राणाशिवाय इतर वर्णाच्या संबंधाने द्वित्व करावयाचें, तें त्याच वर्णाचें द्वित्व करावयाचें. [ अ ] व्याख्यान--वक्खाण; मूर्छा-मूच्छा; अर्घ-अग्घ; निर्झर--णिज्झर; लुब्ध ( लोभी )--लुद्ध; निर्भर ( भरलेलें, अतिशय ) -- णिब्भर.

[ ब ] दृष्टि—दिट्ठी; यष्टि—लट्ठी; वक्ष [ ऊर ] वच्छ; यक्ष—जक्ख; लक्ष्मी--लच्छी; पुष्प--पुप्फ; विस्पर्श--विप्फरिस; निस्तार (ओलांडणे)—नित्थार; आस्थि ( हाड )—अट्ठी.

टीपः—[ अ ] गटांतील शब्द हे वर्णाचा लोप होऊन अवशिष्ट राहिलेल्या वर्णास द्वित्व झाल्याचीं उदाहरणें होत. [ ब ] गटांतील शब्द आदेश झाल्यावर द्वित्व झाल्याचीं उदाहरणें आहेत.

नीडादिषु ९२. नीड वगैरे शब्दांतील मध्य अक्षर जरी जोडाक्षर नसलें, तरी त्यास द्वित्व होतें. जसें—नीड ( घरटें )--णेड्ड; प्रेम--पेम्म; व्याहृत (उच्चारलेलें )--वाहित्त; ऋजु [ सरळ ] -- उज्जू--उजू; जनक--जण्णअ; यौवन—जोव्वण; स्रोत ( प्रवाह, नदी ) – सोत्त.

टीपः—नीडा ह्यांतील ईकाराबद्दल एकार हा परि-

च्छेद १ सूत्र १९ प्रमाणें झाला आहे. तें सूत्र "एन्नीडापीडकीदृगीदृशेषु" हें होय.

**आम्रताम्रयोर्बः** ५३. आम्र व ताम्र ह्या शब्दांत ५० वें सूत्राप्रमाणें द्वित्व करतांना 'ब' वर्णाचा उपयोग करावयाचा. जसें—आम्र–अम्ब–आंबा; ताम्र–तम्ब–तांबें.

**न रहोः** ५४. रेफ व हकार ह्यांस द्वित्व होत नाही. जसें—धैर्य–धीर; तूर्य–तूर; जिव्हा–जीहा.

**आङो ज्ञस्य** ५५. ज्या वेळेस 'ज्ञ'च्यापूर्वी 'आ' उपसर्ग येतो, त्या वेळेस त्याच्याऐवजीं जो 'ण' आदेश होतो, त्यास द्वित्व होत नाही. जसें:—आज्ञा–आणा; आज्ञप्ति–आणत्ती.

टीपः—'आ' उपसर्ग म्हणण्याचें कारण कीं, संज्ञा ह्याचें 'सण्णा' असें रूप होतें.

**न बिंदुपरे** ५६. अनुस्वारापुढें येणाऱ्या वर्णास द्वित्व होत नाही. जसें:–संक्रांत–संकंत; संध्या–संझा–सांज.

**समासे वा** ५७. सामासिक शब्दांत द्वित्व विकल्पें होतें. जसें:–नदीग्राम–णइग्गाम, णईगाम; देवस्तुति–देवत्थुई, देवथुई; कुसुमप्रकर (तुरा)–कुसुमप्पअर;कुसुमपअर; आलानस्तंभ-आणालक्खंभ, आणालखंभ.

**सेवादिषु च ५८.** सेवा वगैरे शब्दांत प्रारंभीं नसणारे वर्णास विकल्पें द्वित्व होतें. जसें:- सेवा--सेव्वा, सेवा; एक--एक्क, एक; नख–णक्ख, णह; त्रैलोक्य--तेलोक्क, तेलोअ; दीर्घ–दिग्घ, दीह; रात्रि–रत्ती, राई; दुःखित–दुःक्खिअ, दुहिअ; अश्व--अस्स, अस; ईश्वर–इस्सर, ईसर; विश्वास–विस्सास, वीसास; रश्मि–रस्सी, रसी; मित्र–मित्त, मिअ; पुष्य–पुस्स, पुस–पूस (महिना); दैव–देव्व, दइव; अशिव–असिव्व, असिव; निहित–णिहित्त, णिहिअ; तूष्णीक ( स्तब्ध )–तुण्हिक्क, तुण्हिअ; कर्णिकार ( वृक्षविशेष ) – कण्णिआर, कणिआर; निश्वास ( सुस्कारा ) – णिस्सास, णीसास.

**विप्रकर्षः ५९.** 'विप्रकर्षः' हें अधिकार सूत्र आहे, व त्याचा पुढील सूत्रांत अंतर्भाव होतो. सूत्र ९ ह्यांत सांगितलेला संयुक्त वर्णाविषयींचा विचार चालू आहेच, तेव्हां प्रस्तुतच्या सूत्राचा अर्थ असा समजावयाचा कीं, चालू परिच्छेद संपेपर्यंत पुढील सूत्रांत संयुक्त वर्णांच्या विप्रकर्षाविषयीं ( निरनिराळें करण्याविषयीं ) विचार व्हावयाचा.

**क्लिष्टश्लिष्टरत्नक्रियाशार्ङ्गेषु तत्स्वरवत्पूर्वस्य ६०.** क्लिष्ट, श्लिष्ट, रत्न वगैरे शब्दांतील संयुक्त वर्ण निरनिराळे होतात व पहिल्या वर्णास स्वतःचा

स्वर नसल्यामुळें त्याचा जो स्वर तो त्यास प्राप्त होतो; म्हणजे पूर्वी जो निरर्थ होता, तो सार्थ होतो. जसें:—क्लिष्ट ( त्रस्त ) —किलिट्ठ; श्लिष्ट [ आलिंगन दिलेलें ] — सिलिट्ठ; रत्न—रअण; क्रिया—किरिआ; शार्ङ्ग ( शिंगाचा )—सारंग.

कृष्णे वा ६१. कृष्ण शब्दांतील संयुक्त वर्णाचा विप्रकर्ष विकल्पें होतो. जसें:—कृष्ण—कसण, कण्ह.

टीपः——विप्रकर्ष झाला असतां वरच्या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें स्वराची योजना केली पाहिजे. ह्या ठिकाणीं हा विकल्प मर्यादित आहे. कारण, कृष्ण ह्याचा अर्थ ' काळा ' असा असेल, तेव्हां असा विप्रकर्ष झालाच पाहिजे; पण जेव्हां त्याचा अर्थ विष्णू असा असेल, तेव्हां असा विप्रकर्ष होत नाही. म्हणून विकल्प असण्याची आवश्यकता आहे. सूत्र ६० पासून पुढील सूत्रें संयुक्त वर्णाच्या विप्रकर्षाबद्दल आहेत.

इः श्रीह्रीक्रीतक्लान्तक्लेशम्लानस्वप्नस्पर्शहर्षार्हगर्हेषु ६२. श्री ( सौंदर्य ), ह्री [ लज्जा ], क्रीत [ विकत घेतलेलें ], क्लान्त [ दमलेलें ], क्लेश, म्लान, स्वप्न, स्पर्श, हर्ष, अर्ह [ योग्य ] व गर्ह [ निंदा करणारा ] ह्यांतील संयुक्त वर्णाचा विप्रकर्ष होतो, व संयुक्त वर्णापैकीं पहिल्या वर्णास ' इ ' स्वर लागतो. जसें:—श्री—सिरी; ह्री—हिरी; क्रीत

--किरीत; क्लांत--किलंत; क्लेश--किलेस; म्लान--मिळाण; स्वप्न–सिविण; स्पर्श–फरिस; हर्ष -हरिस; अर्ह--अरिह; गर्ह--गरिह.

**अः क्ष्माश्लाघयोः** ६३. क्ष्मा [ पृथ्वी ] व श्लाघा [ स्तुती ] ह्या शब्दांतील संयुक्त वर्णांचा विप्रकर्ष होतो; व संयुक्त वर्णांपैकीं प्रथम वर्णास ' अ ' स्वर लागतो. जसें:—क्ष्मा –खमा; श्लाघा–सलाहा.

**स्नेहे वा** ६४. स्नेह शब्दांतील संयुक्त वर्णांचा विप्रकर्ष विकल्पें होतो; व जेव्हां असा विप्रकर्ष होतो, तेव्हां संयुक्त वर्णांपैकीं प्रथम वर्णास ' अ ' स्वर लागतो. जसें:—स्नेह–सणेह, णेह.

**उः पद्मतन्वीसमेषु** ६५. पद्म शब्दांतील व तन्वी [ बारीक ], लघ्वी [ हलकी ] वगैरे शब्दांतील संयुक्त वर्णांचा विप्रकर्ष होतो; व संयुक्त वर्णांपैकीं पहिल्या वर्णास ' उ ' स्वर लागतो. जसें:-पद्म–पउम; तन्वी–तनुई; लघ्वी–लहुई.

**ज्यायामीत्** ६६. ' ज्या ' ( धनुष्याची दोरी )शब्दांतील संयुक्त वर्णांचा विप्रकर्ष होतो; व संयुक्त वर्णांपैकीं प्रथम वर्णास ' ई ' स्वर लागतो. जसें:—ज्या–जीआ.

---

## परिच्छेद ४ था.

संधावचामज्लोपविशेषा बहुलम् १. स्वरांचा संधी अथवा संयोग होत असतां त्याऐवजीं निरनिराळ्या प्रकारचे स्वर येतात किंवा त्यांचा लोप होतो.

स्वराविशेषांचीं उदाहरणें:––नदीस्रोत–णइसोत्त, णईसोत्त; यमुनातट–जउणअड, जउणाअड; वधूमुख–वहुमुह, वहूमुह; कर्णपूर–कण्णउर, कण्णऊर; शिरोवेदना–सिरोवेअणा, सिरवेअणा; पीतापीत–पिआपीअ, पिआपिअ; सितासित–सिआसीअ, सिआसिअ; सरोरुह–सरोरुह, सररुह.

लोपविशेषांचीं उदाहरणें:—राजकुल––राउल, राअउल–राऊळ; कुंभकार–कुंभार, कुंभआर–कुंभार; तवार्द्धम्–तुहद्धं, तुहअद्धं; ममार्द्धम्–महद्धं, महअद्धं; पादपतनम्–पावडणं, पाअवडणं; पवनोद्धत–पवणुद्धअ, पवणोद्धअ.

टीप:—संयुक्त वर्णांपैकीं प्रथमच्या वर्णाचा लोप होतो. सूत्रांत 'बहुल' असें म्हटलें आहे, त्यावरून असें समजावयाचें कीं, काहीं ठिकाणीं असा लोप नित्य होतो, व काहीं ठिकाणीं निरनिराळीं रूपें होतात; व अशीं निरनिराळीं रूपें दृष्टीस पडलीं, तर तीं ह्या सूत्रांतील लक्षणाप्रमाणें होतात असें समजावें.

**उदुम्बरे दोर्लोपः** २. उदुंबर शब्दांत ' दु ' चा लोप होतो. जसें:—उदुंबर–उंबर–उंवर.

**कालायसे यस्य वा** ३. कालायस ( लोखंड ) शब्दांतील 'य' चा विकल्पें लोप होतो. जसें:—कालायस=कालासं, कालाअसं.

**भाजने जस्य** ४. ' कालायसे यस्य वा ' ह्या सूत्रापुढचें सूत्र ' भाजने जस्य ' हें आहे; तेव्हां त्याचा अर्थ भाजन शब्दांतील ' ज ' चा विकल्पें लोप होतो, असा करावयाचा. उदा०—भाजन ( पात्र )–भाण, भाअण.

**यावदादिषु वस्य** ५. यावत् वगैरे शब्दांतील 'व' चा लोप विकल्पें होतो. जसें:–यावत्–जा (जोपर्यंत), जाव–जव ( कवितेंत ); तावत्–ता ( तोपर्यंत), ताव–तव ( कवितेंत ); पारावत—पारावअ, पाराओ–पारवा; अनुवर्तमान ( पुढील ) –अणुत्तंत, अणुवत्तंत; जीवित ( जीव )–जीअ, जीविअ; एवम्–एअं, एव्वं; एव–एअ, एव्व; कुवलय ( कमल ) – कुअलअ, कुवलअ.

**टीपः**—यावत् वगैरे शब्दांतील अंतींच्या व्यंजनाचा लोप झाला आहे तो पुढील सूत्राअन्वयें होय.

**अन्तस्य हलः** ६. पूर्वीच्या सूत्रांत सांगितलेला विकल्प एथें संपला, असें समजावें. शब्दाच्या अंतीं-

च्या व्यंजनाचा लोप होतो. जसें:—यशस्–जस; सरस् (सरोवर)–सर; कर्मन्–कम्म–काम; यावत्–जाव; तावत्–ताव.

**स्त्रियामात्** ७. स्त्रीलिंगी शब्दाच्या अंत्य व्यंजनाबद्दल 'आ' आदेश होतो. जसें:—प्रतिपत्–पडिव-आ–पाडवा; सरित् (नदी)–सरिआ; वाक् (वाणी)– वाआ.

**रो रा** ८. स्त्रीलिंगी शब्दाच्या अंतीं 'र' व्यंजन असेल, तर त्याऐवजीं 'रा' आदेश होतो. जसें:—धुर् (गाडीचा)–धुरा; गीर् (वाणी)–गिरा.

**न विद्युति** ९. विद्युत् [ वीज ] ह्याच्या अंत्य व्यंजनाच्या ठिकाणीं 'आ' आदेश होत नाहीं. ६ व्या सूत्राप्रमाणें अंत्य व्यंजनाचा लोपमात्र करावयाचा. जसें:—विद्युत्–विज्जू–वीज.

**शरदो दः** १० शरद् [ वर्षाकाल ] ह्यांतील अंत्य व्यंजनाऐवजीं 'द' आदेश होतो. जसें:—शरद्–सरद.

**दिक्प्रावृषो सः** ११. दिक् (दिशा) व प्रावृट् (वर्षाकाल) ह्यांच्या अंत्य व्यंजनाच्या स्थानीं 'स' आदेश होतो. जसें:–दिक्–दिसा–दिशा; प्रावृट्–पाउस–पाऊस.

**मो बिंदुः** १२. शब्दांचें अंत्य व्यंजन 'म्' असेल, तर

त्याबद्दल अनुस्वार होतो. जसें:-वत्सम्-(बालक)—वच्छं; वनम्-वणं; धनम्—धणं; अक्षम्-अच्छं; भद्रम्—भद्दं; अग्निम्-आग्गिं; दृष्टम्-दट्ठं.

अचि मश्च १३. अंतींच्या 'म्' व्यंजनापुढें स्वर आला असतां त्याबद्दल विकल्पें 'म' होतो. जसें:-फलम् अपहरति ( तो फळ गोळा करतो )-फलमवहरइ, फलं अवहरइ.

नञोर्हलि १४. नकार व ञकार ह्यांपुढें व्यंजन आलें असतां त्याऐवजीं अनुस्वार करावा किंवा त्याऐवजीं 'म्' केला असतां चालतो. जसें:-अन्श ( अंश )-अंस, अम्स; कन्स ( राजा )-कंस, कम्स; विंध्य ( पर्वत )-विंझ, विम्झ; वञ्चनीय-वंचणीअ, वम्चणीअ.

वक्रादिषु १५. वक्र वगैरे शब्दांत अनुस्वाराचा आगम होतो. जसें:-वक्र-वंक—वांक, वांकडें इ०; ह्रस्व-हंस; अश्रु-अंसू-असूं ( रडणे ); श्मश्रु-मंसू; मस्त—मंथ; दर्शन—दंसण; अश्व-अंस; त्र्यस्त्र ( त्रिकोण )—तंस; गृष्टि (सवत्स गाय)-गुंठी; मनस्विनी—मणंसिणी; स्पर्श-फंस; वर्ण-वण्ण; प्रतिश्रुत-पडिंसुद ( वचन दिलेलें ); अभिमुक्त ( मुक्त केलेलें )-अहिमुंक.

मांसादिषु वा १६. मांस वगैरे शब्दांत अनुस्वार वि-

कल्पें होतो. जसें:—मांस (मास)—मंस, मास—मास; कथम् (कसें)—कहं, कह; नूनम्—(खचीत)—णूणं, णूण; तस्मिन्—तहिं, तहि; आसु—असुं, असु.

टीप.—मांसादी शब्द ठरीव नाहीत, पण ज्या ठिकाणीं वृत्तभंग होईल अशी भीती असते, त्या ठिकाणीं अनुस्वाराचा उपयोग कधीं करतात व कधीं करीत नाहीत. अशा ठिकाणीं असे शब्द मासादी वर्गांत येतात, असें समजावें.

**ययि तद्वर्गांतः** १७. 'ह' शिवाय व प्रत्याहार यय् पैकीं, म्हणजे उष्म वर्णांपैकीं कोणत्याही वर्णाशिवाय दुसरें व्यंजन लागलींच पुढें आलें असतां ज्या वर्गांतील वर्ण असेल, त्या वर्गाचा अनुनासिक विकल्पें होतो. जसें:—संका, सङ्खो, अङ्को, अङ्ग, सञ्चरइ, सण्ढो, सन्तरइ, सम्पत्ती.

टीप:—प्रत्याहार यय् म्हणण्याचें कारण कीं, 'ह' व उष्म वर्ण वगळतां यावे. अशा ठिकाणीं अनुस्वाराचाच उपयोग करावयाचा, विकल्प करावयाचा नाहीं. जसें:—अंश—अंस. विकल्प करावयाचा, तर पंक, बिंदू संका, संखो अशीं रुपें होतात.

**नसांतप्रावृट्शरदः पुंसि** १८. नकारान्त व सकारान्त नामें व प्रावृट् व शरद् शब्द हे पुल्लिंगी

समजावयाचे. जसें:–कर्मन्–कम्म; जन्मन्–जम्म; वर्मन् ( चिलखत )–वम्म; यशस्–जसा; तमस्–तम; सरस्-सर; प्रावृष्–पाउस; शरद्-शरदो.

**न शिरोनभसी** १९. शिरस् ( डोकें ) व नभस् ( आकाश ) हीं दोन नामें जरी सकारान्त आहेत, तरी तीं पुल्लिंगी न समजतां संस्कृताप्रमाणें नपुंसकलिंगी समजावीं. जसें:–शिरस्–सिरं; नभस्–णहं.

**पृष्ठाक्षिप्रश्नाः स्त्रियां वा** २०. पृष्ठ ( पाठ ), अक्षि ( डोळा ) व प्रश्न हीं नामें विकल्पें स्त्रीलिंगी समजावीं. जसें:–पृष्ठ–पुट्ठी, पुट्ठं–पुट्ठा; अक्षि–अच्छी, अच्छं; प्रश्न—पण्हा, पण्ह.

**ओदवापयोः** २१. 'अव' व 'अप' या उपसर्गाच्याऐवजीं 'ओ' विकल्पें आदेश होतो. जसें:–अवहास ( हशा )—ओहास, अवहास; अपसारित ( दूर केलेला )—ओसारिअ, अवसारिअ.

**तल्त्वयोर्दात्तणौ** २२. 'तल्' ( ता ) व 'त्व' ह्या प्रत्ययांबद्दल अनुक्रमें 'दा' व 'त्तण' असे आदेश होतात. जसें:—पीनता, त्वम् ( लठ्ठपणा )–पीणदा, पीणत्तण; मूढता, त्वम् ( मूर्खपणा )–मूढदा, मूढत्तण.

**त्क ऊणः** २३. त्का प्रत्ययाबद्दल प्राकृतांत 'ऊण' आदे-

श होतो. गृहीत्वा–घेऊण—घेऊन; श्रुत्वा (ऐकून)—सोऊण; कृत्वा ( करून )—काऊण; दत्वा ( देऊन )–दाऊण.

**तृण इरः शीले २४.** शील अर्थवाचक जो ' तृण ' प्रत्यय त्याऐवजीं ' इर ' असा आदेश होतो. जसें:–हसनशील–हसिर---हसरा.

**आल्विल्लोल्लालवन्तेन्ता मतुपः २५.** मतुप् प्रत्यय ह्मणजे ज्याजवळ तें आहे, अशा अर्थाच्या प्रत्ययाबद्दल आलू, इल्ल, उल्ल, आल, वन्त, इन्त असे आदेश होतात. जसें:- -निद्रावत्---णिद्दालू; ईर्षावित् - ईसालू; विकारवत्--विअरिल्ल; मालावत्--मालाइल्ल; धनवत्- -धणाल; शब्दवत्--सद्दाल; यौवनवत्--जोव्वणवन्त; रोषवत् ( रागावलेला )--रोसाइन्त; प्राणवत्–पाणाइन्त (जिवंत).

**टीपः**—' क्वचिदा मतुपोऽन्त्यस्य मंतो वा दृश्यते,' म्हणजे केव्हां केव्हां ' मतुप् ' प्रत्ययाबद्दल विकल्पें 'मंत' अथवा ' आ ' असेही प्रत्यय उपयोगांत आढळतात. जसें:—हनुमत्–हणुमा, हणुमंत. काहीं शैषिक प्रत्ययांच्या अर्थानें ' इल्ल ' व ' उल्ल ' ह्यांचा उपयोग करतात. जसें:—पौरस्त्य ( पुरोभव ह्मणजे पूर्वेस झालेलें )= पुरिल्ल; आत्मीय–अपुल्ल. परिमाणार्थी किम् वगैरे सर्वनामांबद्दल जीं रूपें प्राकृतांत वापरावयाचीं तीं:—कियत् ( किती )—केद्दहं, केत्तिअं; यावत् ( जितकें )–जेद्दहं;

जेत्तिअं; एतावत् ( इतकें )–एद्दहं, एत्तिअं. ' कृत्वः ' ह्या प्रत्ययाबद्दल देशपरत्वें हुत्तं असें रूप दृष्टीस पडतें. जसें:—सहस्रकृत्वः ( हजार वेळां )–सअहुत्तं, सहस्स-हुत्तं. शब्दाच्या अर्थांत बदल न करतां केव्हां केव्हां ' क ' प्रत्ययाची योजना करतात. मंत व वंत हे प्रत्यय मराठींत आले आहेत, ते प्राकृताच्या द्वारें आले असावे. वर जे प्रत्यय सांगितले, त्यांचा उपयोग वाटेल त्या ठिकाणीं करावयाचा नाही; संस्कृत प्रत्यय लक्षांत आणून करावयाचा.

**विद्युत्पीताभ्यां लः** २६. विद्युत् ( वीज ) व पीत ( पिवळा ) ह्या शब्दांच्या शेवटीं ' ल ' लागूनही अर्थ फिरत नाही. जसें विद्युत्–विज्जू, विज्जुली–बिजली; पीत–पीअ, पिअल–पिवळा.

**वृन्दे वो रः** २७. वृन्द ( ढीग, समुदाय ) शब्दांत अर्थ न बदलतां ' व ' पुढें रकाराचा उपयोग करतां येतो. जसें:—वृन्द—व्रंदं, वंदं.

**करेण्वां रणोः स्थितिपरिवृत्तिः** २८. करेणु ( हत्तीण ) ह्या शब्दांतील रेफ व णकार ह्यांची स्थितिपरिवृत्ति ह्मणजे उलटापालट होते. जसें:—करेणु=कणेरू.

टीपः—ज्या अर्थी सूत्रांत स्त्रीलिंगाचा स्पष्ट उल्लेख केला आहे, त्या अर्थीं करेणु शब्द पुल्लिंगी असतां रेफ व णकार ह्यांची उलटापालट होत नाही, असें समजाव-

याचें. हा शब्द पुल्लिंगी असतां प्राकृतांत त्याचें रूप करेणू असें होतें.

**आलाने लनोः** २९. आलान शब्दांतील 'ल' व 'न' ह्यांची वरच्या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें उलटापालट होते. आलानस्तंभ=आणालखंभ.

**बृहस्पतौ वहोर्भऔ** ३०. बृहस्पति शब्दांतील 'ब' व 'ह' ह्यांबद्दल अनुक्रमें भकार व अकार होतात. जसें:—बृहस्पति=भअप्फई.

टीपः—'स्प' चा 'प्फ' झाला आहे तो "स्पस्य सर्वत्र स्थितस्य" (पारि० ३ सूत्र ३६.) ह्या सूत्राप्रमाणें झाला आहे.

**मलिने लिनोरिलौ वा** ३१. मलिन शब्दांतील लिकार व नकार ह्यांबद्दल अनुक्रमें इकार व लकार विकल्पें होतात. जसें:—मलिन–मइल, मलिण–(मईलखोर ह्यांतील मईल, मळीण.)

**गृहे घरोऽपतौ** ३२. गृह शब्दाबद्दल 'घर' आदेश होतो, परंतु गृह शब्दापुढें 'पति' शब्द आला, तर असा आदेश होत नाही. जसें:—गृह–घर-घर. गृहपति—घहवई.

**दाढादयो बहुलम्** ३३. दंष्ट्रा वगैरे शब्दांबद्दल दाढा वगैरे शब्द अनियमित रितीने उपयोगांत आलेले दृष्टीस पडतात. जसें:—दंष्ट्रा–दाढा; दुहिता—धीआ, धूदा; चातुर्य—चातुलिअ; मंडूक—मं-

डूर; गोदावरी—गोला; ललाट–णिडाल; इदानी-म्–एण्हिं; गृहे निहितम्—घरे णिहितं; उत्पल–कंदोट्ट; भूः—भूमआ; वैदूर्य–वेलुरिअ; उभय-पार्श्वे ( दोन्ही बाजू )—अवहोवास; चूतः—माइंद, माअंद.

---

# परिच्छेद ५ वा.

अत ओत्सोः १. अकारान्त एकवचनी प्रथमेच्या 'सु' प्रत्ययाबद्दल 'ओ' आदेश होतो. जसें:–वृक्षः-वच्छो; वृषभः–वसहो; पुरुषः–पुरिसो.

जश्शसोर्लोपः २. अनेकवचनी प्रथमा व द्वितीया ह्यांचे प्रत्यय 'जस्' व 'शस्' ह्यांचा लोप होतो. जसें:—वृक्षाः शोभंते–वच्छा सोहंति.

टीपः—११ व्या सूत्राप्रमाणें अंत्य 'अ' स दीर्घत्व येऊन मग 'जस्' चा लोप झाला आहे. वृक्षान् नियच्छत ( झाडें आणा )= 'वच्छेणि अच्छ.' ह्या ठिकाणीं बाराव्या सूत्राप्रमाणें 'अ' चा 'ए' होऊन नंतर 'शस्' प्रत्ययाचा लोप झाला आहे.

अतो मः ३. द्वितीयेचा एकवचनी प्रत्यय जो 'अम्' त्यांतील 'अ' चा अकारान्त शब्दांपुढें लोप होतो. जसें:—वृक्षं प्रेक्षते–वच्छं पेक्खई.

टीपः—अनुस्वाराच्या संबंधाने परिच्छेद ४ नियम ११ पाहा.

**टामोर्णः** ४. अकारान्त शब्दांपुढें तृतीयेचा एकवचनी प्रत्यय ' टा ' व षष्ठीचा अनेकवचनी प्रत्यय ' आम् ' आले असतां त्यांऐवजीं ' ण ' आदेश होतो. जसें:—वृक्षेण—वच्छेण; वृक्षाणाम्-वच्छाण.

**टीपः**—वच्छेण शब्दांतील ' ए ' १२ व्या सूत्राप्रमाणें झाला आहे; व वच्छाण शब्दांतील दीर्घ स्वर ११ व्या सूत्राप्रमाणें झाला आहे.

**भिसो हिं** ५. अकारान्त शब्दांपुढें तृतीया विभक्तीच्या अनेकवचनी ' भिः ' प्रत्ययाच्याऐवजीं ' हिं ' आदेश होतो. जसें:—वृक्षैः—वच्छेहिं.

**टीपः**—वच्छेहिं ह्यांतील ' ए ' १२ व्या सूत्राप्रमाणें होतो.

**ङसेरादोदुहयः** ६. अकारान्त शब्दांपुढें पंचमीचा एकवचनी प्रत्यय ' ङसि ' आला असतां त्याबद्दल आ, दो, दु व हि असे आदेश होतात. जसें:—वच्छा, वच्छादो, वच्छादु, वच्छाहि.

**टीपः**—शेवटील तीन रूपांतील उपांत्य दीर्घ झाला आहे, तो ११ व्या सूत्राप्रमाणें होय. पहिल्या रूपास दीर्घत्व १३ व्या सूत्राप्रमाणें आलें आहे.

**भ्यसो हिंतो सुंतो** ७. अकारान्त शब्दांपुढें पंचमीचा अनेकवचनी प्रत्यय ' भ्यस् ' आला असतां त्याऐवजीं ' हिंतो ' व ' सुंतो ' असे आदेश

होतात. जसें:--वृक्षेभ्यः—वच्छाहिंतो, वच्छासुंतो.

टीपः---वरील रूपांतील उपांत्याच्या पूर्वीच्या वर्णास दीर्घत्व आलें आहे, तें १२ सूत्राप्रमाणें होय.

**स्सो ङसः** ८. अकारान्त शब्दांपुढें षष्ठीचा एकवचनी प्रत्यय 'ङस्' आला असतां त्याबद्दल 'स्स' आदेश होतो. जसें:—वृक्षस्य–वच्छस्स.

**ङेरेम्मी** ९. अकारान्त शब्दांपुढें सप्तमीचा एकवचनी प्रत्यय 'ङि' आला असतां त्याबद्दल 'ए' व 'म्मि' असे आदेश होतात. जसें:—वृक्षे–वच्छे, वच्छम्मि.

टीपः—वच्छे हें रूप बनण्यापूर्वी अंतींचा जो 'अ' होता त्याचा लोप १३ व्या सूत्राप्रमाणें होतो.

**सुपः सु** १०. अकारान्त शब्दांपुढें सप्तमीचा अनेकवचनी प्रत्यय 'सुप्' आला असतां त्याऐवजीं 'सु'. आदेश होतो. जसें:—वृक्षेषु–वच्छेसु.

टीप —वच्छेसु ह्यांतील 'ए' हा १२ व्या सूत्राप्रमाणें होतो.

**जश्शस्ङस्यांसु दीर्घः** ११. प्रथमा व द्वितीया ह्यांच्या अनेकवचनी प्रत्ययांच्या व पंचमीचा एकवचनी व षष्ठीचा अनेकवचनी प्रत्यय ह्यांच्यापूर्वींच्या 'अ' बद्दल 'आ' होतो. जसें:—वृक्षाः शोभंते–वच्छा सोहंति; वृक्षात्–वच्छादो, दु, हि; वृक्षाणाम्–वच्छाण.

टीप.—' जस् ' चा लोप २ ऱ्या सूत्राप्रमाणें होतो; ' दो, ' ' दु ' व ' हि ' हे प्रत्यय ६ वे सूत्राप्रमाणें लागले व ' ण ' प्रत्यय ४ थ्या सूत्राप्रमाणें लागला.

एच्च सुप्यङिङसोः १२. षष्ठी व सप्तमी ह्यांच्या एकवचनी प्रत्ययांशिवाय बाकीच्या विभक्तिप्रत्ययांपूर्वी अंतींच्या ' अ ' बद्दल ' ए ' होतो. जसें:— वृक्षात्—वच्छे; वृक्षेण—वच्छेण; वृक्षैः—वच्छेहिं; वृक्षेषु—वच्छेसु.

टीप.—नियमांत ' च ' आहे, त्यावरून दीर्घ ' आ ' चाही उपयोग करावयाचा. जसें:—वृक्षात्—वच्छाहिंतो, वच्छासुंतो. षष्ठीचें व सप्तमीचें एकवचन वगळण्याचें कारण कीं, वच्छम्मि ( सू० ९ ) व वच्छस्स ( सू० ८ ) ह्यांत ऱ्हस्व स्वर राहतो.

क्वचिद्ङसिङ्योर्लोपः १३. पंचमी व षष्ठी ह्यांचे एकवचनी प्रत्यय ' ङसि ' व ' ङि ' हे पुढें आले असतां नामाच्या अंत्य ' अ ' चा केव्हां केव्हां लोप होतो. जसें:—वच्छा (सू० ६); वच्छे (सू.९).

इदुतोः शसो णो १४. इकारान्त व उकारान्त नामांचा द्वितीयेचा अनेकवचनी प्रत्यय जो 'शस्' त्याबद्दल विकल्पें ' णो ' होतो. जसें:— अग्नीन्—अग्गिणो; वायून्—वाउणो.

ङसो वा १५. इकारान्त व उकारान्त नामांचा षष्ठीचा एकवचनी प्रत्यय जो ' ङस् ' त्याबद्दल वि-

कल्पें 'णो' आदेश होतो. जसें:—अग्नेः— अग्गिणो, अग्गिस्स; वायोः—वाउणो, वाउस्स.

टीप.—'स्स' असा आदेश ८ व्या सूत्राप्रमाणें होतो.

जसश्च ओयूत्वं १६. अग्नि व वायु वगैरे नामांतील प्रथमेचा अनेकवचनी प्रत्यय जो 'जस्' त्याबद्दल 'ओ' आदेश होतो; व अंतींच्या 'इ' व 'उ' ह्यांबद्दल अनुक्रमें ई व ऊ आदेश होतात. सूत्रांत 'च' आहे, त्यावरून असें समजावयाचें कीं, 'ओ' आदेश करून शिवाय 'णो' आदेशही करावयाचा. जसें:—अग्गीओ, अग्गिणो; वाऊओ, वाउणो.

टा णा १७. तृतीया विभक्तीचा एकवचनी प्रत्यय जो 'टा' त्याबद्दल वरील नामांत 'णा' आदेश होतो; जसें:—अग्निना—अग्गिणा; वायुना—वाउणा.

सुभिस्सुप्सु दीर्घः १८. प्रथमेचा एकवचनी, तृतीयेचा अनेकवचनी, व सप्तमीचा अनेकवचनी प्रत्यय जे अनुक्रमें 'सु, भिस् व सुप्' ते पुढें आले असतां वरील नामांच्या अंतींचा 'इ' अथवा 'उ' ह्यांस दीर्घत्व येतें. जसें:— अग्निः—अग्गी; वायुः—वाऊ; अग्निभिः—अग्गीहिं; वायुभिः—वाऊहिं; अग्निषु—अग्गीसु; वायुषु—वाऊसु.

स्त्रियां शस उदोतौ १९. स्त्रीलिंगी नामें असतां

द्वितीयेचा अनेकवचनी प्रत्यय जो 'शस्' त्याबद्दल 'उ' व 'ओ' आदेश होतात. जसें:—माला:–मालाउ, मालाओ; नदी:–णईउ, णईओ; वधू:–वहूउ, वहूओ.

**जसो वा** २०. स्त्रीलिंगी नामें असतां प्रथमेचा अनेकवचनी प्रत्यय जो 'जस्' त्याबद्दल 'उ' व 'ओ' असे विकल्पें अदेश होतात. जसें:— माला:–मालाउ, मालाओ, माला.

टीपः—माला हें रूप सूत्र २ प्रमाणें बनलें आहे.

**अमि ह्रस्वः** २१. स्त्रीलिंगी नामें असतां त्यांतील अंतींचा दीर्घ स्वर हा द्वितीयेचा एकवचनी प्रत्यय जो 'अम्' त्यापूर्वी ह्रस्व होतो. जसें:— मालाम्–मालं; नदीम्–णइं; वधूम्–वहुं.

**टाङस्ङीनामिदेददातः** २२. स्त्रीलिंगी नामें असतां तृतीया, षष्ठी व सप्तमी ह्यांचे एकवचनी प्रत्यय जे 'टा' 'ङस्' व 'ङि' त्यांबद्दल 'इ', 'ए', 'अ', 'आ' असे आदेश होतात. जसें:— नद्या (तृ.), नद्याः (षष्ठी), नद्याम् (स.)– णईइ, णईए, णईअ, णईआ.

टीपः—नदीनें, नदीचा, नदींत ह्यांपैकीं कोणत्याही विभक्तीचें रूप प्राकृतांत लिहिणे असल्यास 'इ', 'ए', 'अ', 'आ' हे प्रत्यय मूळ रूपास लावले असतां चालतें.

**नातोऽदातौ** २३. आकारान्त स्त्रीलिंगी नामें असतां

'इ', 'ए', 'अ', 'आ' ह्यांपैकीं 'अ' 'आ' हे आदेश होत नाहीत; फक्त 'इ', 'ए' असे दोनच आदेश होतात. जसें:—मालया, मालायाः, मालायाम् = मालाइ, मालाए.

टीपः—२२ व्या सूत्राची व्याप्ती २३ वे सूत्रावरून मर्यादित केली आहे; ह्मणजे आकारान्त नामें असतां चारही प्रत्यय लावतां येत नसून फक्त दोनच लावतां येतात.

**आदीतौ बहुलम्** २४. आकारान्त स्त्रीलिंगी नामें असतां, अंत्य स्वरास 'आ' किंवा 'ई' प्रत्यय वाटेल त्या ठिकाणीं लावतात. जसें:—सहमाना (सोसणारी)—सहमाणा, सहमाणी; हरिद्रा (हळद)–हलद्दा, हलद्दी; छाया–छाहा, छाही; शूर्पनखा–सुप्पणहा, सुप्पणही.

**न नपुंसके** २५. नपुंसकलिंगी प्रथमेचें एकवचनी रूप असतां अंत्य स्वरास दीर्घत्व होत नाही. जसें:— दधि–दहिं; मधु महुं; हविस्–हविं.

टीपः–अकारान्त नामें असतां अंत्य स्वर दीर्घ करण्याविषयीं नियम नाही; इकारान्त व उकारान्त नामांबद्दल आहे. अकारान्ताच्या संबंधाचा अपवाद नसतां, तर इकारान्त व उकारान्त नामांची व्यवस्था १८ वे सूत्राप्रमाणें झाली असती.

**इज्जश्शसोर्दीर्घश्च** २६. नपुंसकलिंगी नामें असतां प्रथमेचे व द्वितीयेचे अनेकवचनी प्रत्यय जे

' जस् ' व ' शस् ' त्यांबद्दल ' इ ' आदेश होतो; व ह्या प्रत्ययांपूर्वीच्या स्वरास दीर्घत्व येतें. जसें:—वनानि—वणाइ; दधीनि-दहीइ; मधूनि-महूइ.

**नामंत्रणे सावोत्वदीर्घबिंदवः** २७. जेव्हां प्रथमेच्या एकवचनी रूपाचा उपयोग संबोधनाप्रमाणें करतात, तेव्हां पहिल्या सूत्राप्रमाणें ' ओ ' किंवा १८ वे सूत्राप्रमाणें दीर्घ स्वर किंवा ३० वे सूत्राप्रमाणें अनुस्वार होत नाही. जसें:—वृक्ष—हे वच्छ; अग्ने—हे अग्गि; वायो—हे वाउ; वन—हे वण; दधि— हे दहि; मधु—हे महु.

**स्त्रियामात एत्** २८. स्त्रीलिंगी नामांचें एकवचनी संबोधनाचें रूप बनविणे झाल्यास ' सु ' प्रत्ययापूर्वी ' आ ' बद्दल ' ए ' आदेश होतो. जसें:—माले—हे माले,

**टीपः**—' सु ' प्रत्यय जो वर सांगितला त्यांतील स्वराचा लोप पाणिनी अ० १–३–२ प्रमाणें होतो; व व्यंजनाचा लोप परिच्छेद ४ सूत्र ६ प्रमाणें होतो.

**इदुतोर्ह्स्वः** २९. संबोधन असतां अंतींचा ' ई ' अथवा ' ऊ ' ऱ्हस्व होतो. जसें:—हे नदि—हे णइ; हे वधू:—हे वहु,

**सोर्बिंदुर्नपुंसके** ३०. नपुंसकलिंगी नामांत प्रथमेच्या एकवचनी प्रत्ययाबद्दल अनुस्वाराचा आदेश होतो. जसें:—वनम्—वणं; दधि—दहिं; मधु—महुं,

**ऋत आरः सुपि** ३१. सर्व विभक्तिप्रत्ययांपूर्वी ऋकारान्त शब्दांतील ' ऋ ' बद्दल ' आर ' आदेश होतो. जसें:—भत्तारो ( नवरा ); भत्तारेण ( नवऱ्यानें ).

**मातुरात्** ३२. मातृ शब्दांतील ऋकाराबद्दल ' आ ' आदेश होतो; व मग तो इतर आकारान्त शब्दांप्रमाणें चालतो. जसें:—माआ, माअं, माआइ, माआए.

**उर्जश्शस्टाङस्सुप्सु वा** ३३. प्रथमा व द्वितीया ह्यांचे अनेकवचनी, तृतीया व षष्ठी ह्यांचे एकवचनी व सप्तमीचा अनेकवचनी प्रत्यय ह्यांपूर्वी अंतींच्या ऋकाराबद्दल विकल्पें 'उ' आदेश होतो.

( जस् ) भर्तारः – भत्तारा, भत्तुणो.

( शस् ) भर्तॄन् – भत्तारे, भत्तुणो.

( टा ) भर्त्रा – भत्तारेण, भत्तुणा.

( ङस् ) भर्तुः – भत्तारस्स, भत्तुणो.

( सुप् ) भर्तृषु – भत्तारेसु, भत्तुसु.

**टीप**:—वर ज्या विभक्ती सांगितल्या त्या बाबतींत उकारान्त शब्दांस जे नियम लागू तेच ऋकारान्त शब्दांस लागू, असें समजावयाचें. ' ऋ ' बद्दल 'आर' आदेश होतो, तो ३१ वे सूत्राप्रमाणें होय.

**पितृभ्रातृजामातॄणामरः** ३४. विभक्तिप्रत्यय लावण्यापूर्वी पितृ, भ्रातृ, जामातृ ह्या शब्दांतील ' ऋ 'बद्दल

' अर ' आदेश होतो. जसें:–पिअरं, पिअरेण; भाअरं, भाअरेण; जामाअरं, जामाअरेण.

टीप:––३१ वे सूत्रांत सांगितलें आहे कीं, ' ऋ 'बद्दल ' आर ' होतो; पण प्रस्तुतचें सूत्र अपवादादाखल आहे असें दिसतें.

**आ च सौ** ३५- प्रथमेचा एकवचनी प्रत्यय जो ' सु ' त्यापूर्वीं पितृ वगैरे शब्दांतील ' ऋ ' बद्दल 'आ' आदेश होतो. सूत्रांत ' च ' शब्द आहे, ह्मणून आणखी ' अर ' आदेशही होतो, असें समजावयाचें. जसें:––पिता–पिआ, पिअरो; भ्राता–भाआ, भाअरो; जामाता–जामाआ, जामाअरो.

**राज्ञश्च** ३६. 'राजन्' शब्दास प्रथमेचा एकवचनी प्रत्यय ' सु ' लागला असतां ' आ ' आदेश होतो. राजा = राआ.

**आमंत्रणे वा बिंदुः** ३७. राजन् शब्दाचें संबोधन कर्तव्य असतां अंत्याक्षरावर विकल्पें बिंदू द्यावा. जसें:—हे राजन् = हे राअं, हे राअ.

टीपः—प्राकृतांत अंतींच्या व्यंजनाचा लोप होतो, तेव्हां ह्या नियमाप्रमाणें ' न ' चा लोप होऊन राज असें रूप होतें व ' ज ' बद्दल ' अ ' आदेश होतो.

**जश्शस्ङसा णो** ३८. राजन् शब्दास जस्, शस्, व ङस् हे विभक्तिप्रत्यय लागले असतां ह्या प्रत्यांबद्दल ' णो ' असा आदेश होतो. जसें:–

राजानः प्रेक्षन्ते=राआणो पेक्खंति; राज्ञः प्रेक्षस्व =राआणो पेक्क; राज्ञो धनम्=राइणो धणं, रण्णो धणं.

**शस् एत्** ३९. राजन् शब्दास 'शस्' प्रत्यय लागला असतां 'ए' असाही आदेश होतो. जसें:— राज्ञःप्रेक्षस्व=राए पेक्ख, राआणो पेक्ख.

**आमो णं** ४०. राजन् शब्दास षष्ठीचा बहुवचनी प्रत्यय 'आम्' लागला असतां त्याबद्दल 'णं' असा आदेश होतो. जसें:—राज्ञाम्=राआणं.

**टा णा** ४१. राजन् शब्दास 'टा' प्रत्यय लागला असतां त्याबद्दल 'णा' आदेश होतो. जसें:— राज्ञा=राइणा.

**ङसश्च द्वित्वं वांत्यलोपश्च** ४२. राजन् शब्दास 'ङस्' व 'टा' हे प्रत्यय लागले असतां त्यांस विकल्पें द्वित्व होतें. जसें:—राज्ञो धनम्=रण्णो अथवा राइणो धणं.

**इदद्वित्वे** ४३. राजन् शब्दास 'ङस्' व 'टा' हे प्रत्यय लागले तर, व त्यांचें द्वित्व न केलें, तर त्यास 'इत्व' ह्मणजे इडागम होतो. जसें:— रण्णो, रण्णा.

**आ णोणमोरङसि** ४४. राजन् शब्दास 'णो, णम्' प्रत्यय लागले असतां जकाराबद्दल आकारादेश होतो. षष्ठीचा एकवचनी प्रत्यय 'ङस्' ला-

गला असतां असा आकारादेश होत नाही. जसें:-राजानः प्रेक्षन्ते=राआणो पेक्खंति; राज्ञः प्रेक्षस्व=राअणो पेक्ख; राज्ञां धनम्=राआणं धणं. सूत्रांत ' अङसि ' असें म्हटलें आहे, त्याचें कारण कीं, राज्ञो धनम् ह्याचें रूप राइणो अथवा रण्णो धणं असें होतें.

टीप.—राजन् शब्दाचीं बाकीचीं रूपें अकारान्त शब्दाप्रमाणें होतात. जसें:-राजानम्=राअं; राजभिः= राएहिं; राज्ञः=राआ, राआदो, राआदु; राजभ्यः=राआहिंतो, राआसुंतो; राज्ञि=राअम्मि, राए; राजसु=राएसु.

**आत्मनोऽप्पाणो वा ४५.** आत्मन् शब्दाबद्दल 'अप्पाणो' रूप विकल्पें होतें. जसें:—आत्मा—अप्पाणो, अप्पा.

टीपः—'अप्पा' हें रूप परिच्छेद ३ सूत्र ४८ प्रमाणें होतें.

**इत्वद्वित्ववर्जं राजवदनादेशे ४६.** आत्मन् शब्दाच्या संबंधाने जेव्हां आदेश होत नाहीत, तेव्हां इडागम व द्वित्व वर्ज करून बाकींचीं कार्यें राजन् शब्दाप्रमाणें त्यास होतात. जसें:-आत्मा=अप्पा; आत्मानः = अप्पाणो; आत्मना = अप्पणा; आत्मनः=अप्पणो.

**ब्रह्माद्या आत्मवत् ४७.** ब्रम्ह वगैरे शब्द आत्मन् शब्दाप्रमाणें चालवावयाचे. जसें:-ब्रह्मा—बह्मा, बह्माणो; युवा—जुवा, जुवाणो; अध्वन् – अद्धा, अद्धाणो.

टीपः—वर जीं उदाहरणें दिलीं त्यांप्रमाणें अशा-सारख्या दुसऱ्या रूपांची व्यवस्था करावयाची.

# परिच्छेद ६ वा.

**सर्वादेर्जस एत्वम्** १. प्रथमेचा अनेकवचनी प्रत्यय जो 'जस्' तो सर्व आदी शब्दांपुढें आला असतां त्याबद्दल 'ए' होतो. जसें:—सर्वे (सर्व)—सव्वे; ये—जे; ते—ते; के (कोण)—के; कतरे—कदरे (दोहोंपैकीं कोणता).

**ङेः स्सिम्मित्थाः** २. सप्तमीचा एकवचनी प्रत्यय 'ङि' हा सर्वनामास लागला असतां त्याबद्दल 'स्सिं' 'म्मि' व 'त्थ' असे आदेश होतात. जसें:—सर्वस्मिन्—सव्वस्सिं, सव्वम्मि, सव्वत्थ; इतरस्मिन्—इअरस्सिं, इअरम्मि, इअरत्थ.

**इदमेतत्कियत्तद्भ्यष्टा इणा वा** ३. इदम् (हें), एतत् (हें), किम् (काय), यत् (जें), तत् (तें), ह्या सर्वनामांस तृतीयेचा एकवचनी प्रत्यय 'टा' लागला असतां त्या 'टा' बद्दल विकल्पें 'इणा' आदेश होतो. जसें:—अनेन—इमिणा, इमेण; एतेन—एदिणा, एदेण; केन—किणा, केण; येन—जिणा, जेण; तेन—तिणा, तेण.

**आम एसिं** ४. इदम्, एतत् वगैरे जीं सर्वनामें वरच्या सूत्रांत सांगितलीं त्यांस षष्ठीचा अनेक वचनी

प्रत्यय ' आम् ' लागला असतां त्याबद्दल विकल्पें ' एसिं ' असा आदेश होतो. जसें:—इमेसिं, इमाण; एदेसिं, एदाण; केसिं, काण; जेसिं, जाण; तेसिं, ताण.

**किंयत्तद्भ्यो ङस आसः** ५. किम्, यत् व तत् ह्या सर्वनामांस षष्ठीचा एकवचनी प्रत्यय ' ङस् ' लागला असतां त्याबद्दल विकल्पें ' आस ' आदेश होतो. जसें:—कस्य—कास, कस्स; यस्य—जास, जस्स; तस्य—तास, तस्स.

**इद्भ्यः स्सा से** ६. किम् आदी जीं इकारान्त सर्वनामें सांगितलीं त्यांस ' ङस् ' प्रत्यय लागला असतां त्याबद्दल ' स्सा ' व ' से ' असे आदेश होतात. जसें:—किस्सा, कीसे, कीआ, कीए, कीअ, कीइ; जिस्सा, जीसे, जीआ, जीए, जीअ, जीइ; तिस्सा, तीसे, तीआ, तीए, तीअ, तीइ.

**टीपः**—' स्सा ' व ' से ' ह्या प्रत्ययांशिवाय बाकींचे प्रत्यय परिच्छेद ५, सूत्र २२ प्रमाणें लागतात.

**ङेर्हिं** ७. ' किम्, यत् व तत् ' ह्यांस सप्तमीचा एकवचनी प्रत्यय ' ङि ' लावणे झालें, तर त्याबद्दल ' हिं ' आदेश होतो. जसें:—काहिं, कस्सिं, कम्मि, कत्थ; जाहिं, जस्सिं, जम्मि, जत्थ; ताहिं, तस्सिं, तम्मि, तत्थ.

**आहे इआ काले** ८. ' किम्, यत् व तत् ' ह्या सर्व-

नामांस कालदर्शक 'ङि' प्रत्यय लावणे झाल्यास त्याबद्दल 'आहे' व 'इआ' असे विकल्पें आदेश होतात. जसें:—कदा–काहे, कइआ; यदा–जाहे, जइआ; तदा–ताहे, तइआ.

**टीप:**—सातव्या सूत्रांत जे प्रत्यय सांगितले तेही शिवाय लावावयाचे.

**त्तो दो ङसेः** ९. किम्, यत् व तत् ह्या सर्वनामांस पंचमीचा एकवचनी प्रत्यय 'ङसि' लावणे झाल्यास त्याबद्दल 'त्तो' व 'दो' असे प्रत्यय लावावे. जसें:—कस्मात्–कत्तो, कदो; यस्मात्–जत्तो, जदो; तस्मात्–तत्तो, तदो.

**तद ओश्च** १०. तत् सर्वनामास 'ङसि' प्रत्यय लावणे झाल्यास त्याबद्दल विकल्पें 'ओ' लावावा. जसें:—तो, तत्तो, तदो.

**टीप:**—तत् ह्यांतील अंत्य व्यंजन त् ह्याचा "अंत्यस्य हलः" ह्या सूत्राप्रमाणें लोप होतो; व ह्यास 'ओ' प्रत्यय लावून संधी करण्यापूर्वी 'त' ह्यांतील 'अ' स्वराचा "संधावचामज्लोपविशेषा बहुलं" (पारि ४. १.) ह्या सूत्राप्रमाणें लोप होतो, व नंतर 'तो' हें रूप बनतें.

**ङसा से** ११. मागील म्हणजे १० वे सूत्रांत जो विकल्प सांगितला आहे तो चालू आहे. षष्ठीचा एकवचनी प्रत्यय जो 'ङस्' त्यासुद्धां जें सर्वनाम

'तत्' त्याबद्दल विकल्पें 'से' आदेश होतो. दुसरें रूप पूर्वीच्या नियमाप्रमाणें होतें:— से, तास, तस्स.

टीप:— 'तास' व तस्स हीं रूपें चालू परिच्छेदाचें ९ वें सूत्र जें 'कियत्तद्भ्यो ङस आस' त्याप्रमाणें होतात.

**आमा सिं १२.** षष्ठीचा अनेकवचनी प्रत्यय जो 'आम्' त्यासुद्धां जें सर्वनाम 'तत्' त्याबद्दल विकल्पें 'सिं' आदेश होतो. जसें:—तेषाम्, तासाम्=सिं, ताण.

टीप:— 'ताण' हें रूप चालू परिच्छेदाचें सूत्र ४ प्रमाणें झालें आहे.

**किमः कः १३.** विभक्तिप्रत्यय लावण्यापूर्वी 'किम्' बद्दल 'क' आदेश होतो. जसें:—को (प्र. ए.), के (प्र. अ. व), केण (तृ. ए.); केहिं (तृ. अ. व).

**इदम इमः १४.** विभक्तिप्रत्यय लावण्यापूर्वी 'इदम्' बद्दल 'इम' आदेश होतो. जसें:—इमो, इमे, इमेण, इमेहिं.

**स्सास्सिमोरद्वा १५.** 'इदम् शब्दापुढें षष्ठीचे व सप्तमीचे एकवचनी प्रत्यय 'स्स' व 'स्सि' आले असतां 'इदम्' बद्दल विकल्पें 'अ' आदेश होतो. जसें:—अस्य=अस्स अथवा इमस्स; अस्मिन्=अस्सि किंवा इमास्सि.

ङेर्देन हः १६. ' इदम् ' शब्दांतील ' द ' व सप्तमीचा एकवचनी प्रत्यय ' ङि ' ह्या दोहोंबद्दल ' ह ' आदेश होतो. जसें:—अस्मिन्=इह. ज्या वेळेस असा आदेश होत नाहीं त्या वेळेस पूर्वीच्या नियमाप्रमाणें अस्सिं, इमस्सिं व इमम्मि असे आदेश होतात.

न त्थः १७. ' इदम् ' शब्दास ' ङि ' प्रत्यय लागला असतां अशा प्रत्ययाबद्दल ' त्थ ' आदेश होत नाहीं. ह्या सूत्रावरून असें समजावयाचें कीं, " ङेः स्सिम्मित्थाः " ( परि० ६ सूत्र २ ) हें सूत्र इदम् ह्या सर्वनामास लागू पडत नाहीं. तेव्हां ह्याचीं प्राकृतांत रूपें होतात तीं:—इह, अस्सिं, इमस्सिं व इमम्मि.

नपुंसके स्वमोरिदमिणमिणमो १८. इदम् ( नपुंसकलिंगी ) व प्रथमेचे व द्वितीयेचे प्रत्यय ' सु ' व ' अम् ' ह्यांबद्दल इदं, इणं, इणमो असे तीन आदेश होतात. जसें:-इदं धनं=इदं,इणं, इणमो धणं

एतदः स्वोत्वं वा १९. प्रथमेचा एकवचनी प्रत्यय ' सु ' हा एतत् शब्दास लावणे झाल्यास त्याबद्दल विकल्पें ' ओ ' होतो. जसें:–एषः ( हा ) –एस, एसो.

टीप.—' सु ' बद्दल ' ओ ' होणे सार्वत्रिक आहे, पण एतत् शब्द अपवाद आहे, असें समजावें.

**त्तो ङसेः** २०. एतत् शब्दापुढें पंचमीचा एकवचनी प्रत्यय लावावयाचा असतां त्याबद्दल ' त्तो ' लावावा. जसें:–एतस्मात्–एत्तो.

**टीप.**—स्मात् प्रत्ययाबद्दल ' त्तो ' प्रत्यय लावावयाचा असें सांगितलें, तेव्हां ' एतत्तो ' असें रूप व्हावयाचें; पण पुढील सूत्राप्रमाणें ' त 'चा लोप होतो, म्हणून ' एत्तो ' असें रूप होतें. पंचमीचें एकवचनी रूप फक्त एत्तो एवढेंच होतें असें नाही. नियमित रूपें एदादो, एदादु, एदाहि अशींही शिवाय होतात.

**त्तोत्थयोस्तलोपः** २१. एतत् शब्दांस ' त्तो ' व ' त्थ ' प्रत्यय लागले असतां ह्या शब्दांतील 'त'चा लोप होतो. जसें:–एत्तो, एत्थ.

**टीप:**—' त्तो ' प्रत्यय २० वे सूत्राप्रमाणें व ' त्थ ' प्रत्यय २ ऱ्या सूत्राप्रमाणें लागतो.

**तदेतदोः सः सावनपुंसके** २२. प्रथमेचा एकवचनी प्रत्यय ' सु ' लावण्यापूर्वी पुल्लिंगी व स्त्रीलिंगी ' तत् व एतत् ' शब्दांतील ' त ' बद्दल ' स ' आदेश होतो. जसें:—स पुरुषः=सो पुरिसो; सा महिला ( ती स्त्री )=सा महिला. त्याचप्रमाणें स, एसो, एसा अशीं रूपें होतात.

**टीप:**—' सु ' म्हणण्याचें कारण कीं, वरील सूत्र प्रथमेच्या अनेकवचनी प्रत्ययास लागू पडत नाही. जसें:–एदे, ते; किंवा द्वितीयेच्या एकवचनास लागू पडत नाही.

उ०—एदं, तं. नपुंसकलिंग वगळण्याचें कारण कीं, नपुंसकलिंगी 'तत् व एतत्' ह्यांच्या प्रथमेच्या एकवचनी रूपांबद्दल 'तं' व 'एदं' अशीं रूपें होतात.

**अदसो दो मुः २३.** विभक्तिप्रत्यय लावण्यापूर्वी 'अदस्' ह्या सर्वनामांतील 'द' बद्दल 'मु' आदेश करावा; व तो शब्द उकारान्त शब्दाप्रमाणें चालवावा. जसें:—अमू पुरिसो (हा पुरूष); अमू महिला (ही बायको); अमूओ पुरिसा (हे पुरूष); अमूओ महिलाओ (ह्या बायका); अमुं वणं (हें वन); अमूइं वणाइं (हीं वनें).

टीप.—अदस् शब्दांतील 'स' चा लोप परि० ४—६ प्रमाणें होतो.

**हश्च सौ २४.** प्रथमेचा एकवचनी प्रत्यय 'सु' ह्यापूर्वी अदस् शब्दांतील 'द' बद्दल 'ह' आदेशही होतो. जसें:—अह पुरिसो; अह महिला; अह वणं.

टीप.—'ह' आदेश झाला असतां ओ, आ अथवा अनुस्वार असे पुल्लिंगी, स्त्रीलिंगी व नपुंकलिंगी आदेश होत नसून तिन्ही लिंगी 'अह' रूप राहतें.

मराठींत हा, ही, हें अशीं रूपें आलीं आहेत तीं 'अह' ह्यांतील 'अ' चा लोप होऊन आलीं असल्यास न कळे. अरण्य, अरघट्ट, उपरि (अवरी) ह्यांतील

' अ ' चा लोप होऊन प्राकृताच्या द्वारें रान, रहाट व वर अशीं रूपें मराठींत आलीं आहेत. त्याप्रमाणें ' हा ' वगैरे रूपें आलीं असल्यास सांगतां येत नाही.

**पदस्य** २५. हें अधिकार सूत्र आहे. पुढें जे नियम सांगण्यांत येतील, ते पदाबद्दल म्हणजे विभक्ति-प्रत्ययसह जो शब्द त्याबद्दलचे आदेश आहेत असें समजावें.

**युष्मदस्तं तुमं** २६. प्रथमेचा एकवचनी प्रत्यय ' सु ' हा ' युष्मत् ' शब्दांस लागला असतां ह्या दोहीं-बद्दल ' तं, तुमं ' असे आदेश होतात. जसें;--त्वम्=तं, तुमं=तूं.

**तुं चामि** २७. युष्मत् पदास द्वितीयेचा एकवचनी प्रत्यय ' अम् ' लागला असतां त्या पदाबद्दल विकल्पें ' तुं ' आदेश होतो. सूत्रांत ' च ' शब्द आहे, तेव्हां ' तुमं ' ही आणखी आदेश होतो, असें समजावयाचें. जसें;--त्वाम्--तुं, तुमं( तुला ).

**तुज्झे तुह्मे जसि** २८. युष्मत् पदास प्रथमेचा अनेकवचनी प्रत्यय ' जस् ' लागला असतां त्या सर्व पदाबद्दल ' तुज्झे ' व ' तुम्हे ' असे आदेश होतात. जसें:--यूयम्--तुज्झे, तुम्हे -- तुम्ही.

**वो च शसि** २९. युष्मत् पदास द्वितीयेचा अने-कवचनी प्रत्यय ' शस् ' लागला असतां त्या

सर्व पदाबद्दल ' वो ' आदेश होतो. सूत्रांत 'च' असें म्हटलें आहे, त्यावरून ' तुज्झे ' व ' तुम्हे' हींही रूपें आणखी आहेत, असें समजावयाचें. जसें:–युष्मान् , वः=तुज्झे, तुम्हे, वो.

टाङ्योस्तइ तए तुमए तुमे ३०. युष्मत् पदास तृतीयेचा एकवचनी प्रत्यय ' टा ' किंवा सप्तमीचा एकवचनी प्रत्यय ' ङि ' लागला असतां त्या सर्व पदाबद्दल तइ, तए, तुमए, तुमे असे आदेश होतात. जसें:—त्वया किंवा त्वयि=तइ, तए, तुमए, तुमे.

ङसि तुमोतुहतुज्झतुम्हतुम्माः ३१. युष्मत् पदास षष्ठीचा एकवचनी प्रत्यय ' ङस् ' लागला असतां त्या सर्व पदाबद्दल तुमो, तुह, तुज्झ, तुम्ह व तुम्म असे आदेश होतात.

आङि च ते दे ३२. युष्मत् पदास तृतीयेचा एकवचनी प्रत्यय ' आङ् ' लागला असतां सर्व पदाबद्दल ' ते ' व ' दे ' असे आदेश होतात. त्याचप्रमाणें षष्ठीचा एकवचनी प्रत्यय लागला असतांही हेच आदेश होतात, असें समजावें.–( सूत्रांत ' च ' शब्द आहे ह्यावरून असें अनुमान करावयाचें ). जसें:—त्वया, तव–ते, दे.

तुमाइ च ३३. युष्मत् पदास तृतीयेचा एकवचनी प्रत्यय ' आङ् ' लागला असतां त्या सर्व पदा-

बद्दल वरच्या सूत्रांत सांगितलेले आदेश होऊन आणखी ' तुमाई ' असाही आदेश होतो.

**तुज्झेहिं तुम्हेहिं तुम्मेहिं भिसि** ३४. युष्मत् पदास तृतीयेचा अनेकवचनी प्रत्यय ' भिस् ' लागला असतां सर्व पदाबद्दल तुज्झेहिं, तुम्हेहिं, तुम्मेहिं, असे आदेश होतात.

**ङसौ तत्तो तइत्तो तुमादो तुमादु तुमाहि** ३५. युष्मत् पदास पंचमीचा एकवचनी प्रत्यय ' ङसि ' लागला असतां त्या सर्व पदाबद्दल तत्तो, तइत्तो, तुमादो, तुमादु व तुमाहि असे आदेश होतात.

**तुम्हाहिंतो तुम्हासुंतो भ्यसि** ३६. युष्मत् पदास पंचमीचा अनेकवचनी प्रत्यय ' भ्यस् ' लागला असतां त्या सर्व पदाबद्दल तुम्हाहिंतो व तुम्हासुंतो असे आदेश होतात.

**वो भे तुज्झाणं तुम्हाणमामि** ३७. युष्मत् पदास षष्ठीचा अनेकवचनी प्रत्यय ' आम् ' लागला असतां त्या सर्व पदाबद्दल ' वो ', ' भे, ' ' तुज्झाणं' असे आदेश होतात. जसें:—युष्माकं धनम् —वो, भे, तुज्झाणं, तुम्हाणं धणं.

**ङौ तुमम्मि** ३८. युष्मत् पदास सप्तमीचा एकवचनी प्रत्यय ' ङि ' लागला असतां त्या सर्व पदाबद्दल ' तुमम्मि ' आदेश होतो. पूर्वी ३० वे सूत्रांत सांगितलेले ' तइ, तए, तुमए व तुमे ' असेही आणखी आदेश होतात.

**तुज्झेसु तुम्हेसु सुपि ३९.** 'युष्मत्' पदास सप्तमीचा अनेकवचनी प्रत्यय 'सुप्' लागला असतां त्या सर्व पदाबद्दल 'तुज्झेसु व तुम्हेसु' असे आदेश होतात.

**अस्मदो हमहमहअं सौ ४०.** अस्मत् पदास प्रथमेचा एकवचनी प्रत्यय 'सु' लागला असतां त्या सर्व पदाबद्दल 'हं, अहं, व अहअं' असे आदेश होतात.

**अहम्मिरमि च ४१.** 'अस्मत्' पदास द्वितीयेचा एकवचनी प्रत्यय 'अम्' लागला असतां त्या सर्व पदाबद्दल 'अहम्मि' असा आदेश होतो. सूत्रांत 'च' शब्द आहे, त्यावरून असें समजावयाचें कीं, 'अहम्मि' असा आदेश प्रथमेच्या एकवचनाबद्दलही करावयाचा. मां प्रेक्षस्व–अहम्मि पेक्ख; अहं करोमि–अहम्मि करेमि.

**मंममम् ४२.** 'अस्मत्' पदास द्वितीयेचा एकवचनी प्रत्यय 'अम्' लागला असतां 'मं' व 'ममं' असे आदेश होतात. जसें:—माम्–मं, ममं.

टीपः—'अम्' हा प्रत्यय मूळ सूत्रांत नाही, पण तो वरील सूत्रावरून घ्यावयाचा.

**अम्हे जश्शसोः ४३.** 'अस्मत्' पदास 'जस्' (प्रथमेचा अनेकवचनी प्रत्यय) व 'शस्' (द्वितीयेचा अनेकवचनी प्रत्यय) प्रत्यय लागले

असतां ' अम्हे ' असा आदेश होतो. जसें:—
वयम्—अम्हे—आम्ही; अस्मान्—अम्हे——आम्हांस.

**णो शसि** ४४. ' अस्मत् ' पदास ' शस् ' प्रत्यय लागला असतां त्या सर्व पदाबद्दल ' णो ' आदेश होतो. जसें:—अस्मान् प्रेक्षस्व—णो पेक्ख—आम्हांस पाहा.

**आङि मे ममाइ** ४५. अस्मत् पदास तृतीयेचा एकवचनी प्रत्यय ' आङ् ' लागला असतां त्याबद्दल ' मे, ममाइ ' असे आदेश होतात. जसें:—मया—मे, ममाइ.

**ङौ च मइ मए** ४६. अस्मत् पदास ' ङि ' प्रत्यय लागला असतां त्याबद्दल ' मइ ', ' मए ' असे आदेश होतात. सूत्रांत ' च ' आहे, त्यावरून असें समजावयाचें कीं, ' आङ् ' प्रत्यय लागला असतांही ' मइ ' व ' मए ' असे आदेश होतात. जसें:—मया, मयि—मइ, मए.

**अम्हेहिं भिसि** ४७. अस्मत् पदास ' भिस् ' प्रत्यय लागला असतां त्याबद्दल ' अम्हेहिं' असा आदेश होतो. जसें:—अस्माभि:—अम्हेहिं.

**मत्तो मइत्तो ममादो ममादु ममाहि ङसौ** ४८. अस्मत् पदास ' ङसि ' प्रत्यय लागला असतां त्याबद्दल ' मत्तो, मइत्तो, ममादो, ममादु, ममाहि असे आदेश होतात.

**अम्हाहिंतो अम्हासुंतो भ्यसि** ४९. अस्मत् पदास 'भ्यस्' प्रत्यय लागला असतां त्याबद्दल ' अम्हाहिंतो, ' अम्हासुंतो ' असे आदेश होतात.

**मे मम मह मज्झ ङसि** ५०. अस्मत् पदास ' ङस् ' प्रत्यय लागला असतां त्याबद्दल मे, मम, मह, मज्झ असे आदेश होतात. जसें:—मम, मे धनम्= मम, मे, मह, मज्झ धणं.

**मज्झ णो अम्ह अम्हाणमम्हे आमि** ५१. अस्मत् पदास षष्ठीचा बहुवचनी प्रत्यय ' आम् ' लागला असतां 'मज्झ, णो, अम्ह, अम्हाणं, अम्हे' असे आदेश होतात.

**ममम्मि ङौ** ५२. अस्मत् पदास 'ङि' प्रत्यय लागला असतां ' मम्मम्मि ' असा आदेश होतो. ४६ वे सूत्रावरून ' मइ, मए ' असेही आदेश होतात.

**अम्हेसु सुपि** ५३. अस्मत् पदास सप्तमीचा बहुवचनी ' सुप् ' प्रत्यय लागला असतां ' अम्हेसु ' असा आदेश होतो. जसें:—अस्मासु—अम्हेसु.

**द्वेर्दौ** ५४. अधिकार सूत्रास २९ वे सूत्रापासून प्रारंभ होऊन त्याची समाप्ती एथें झाली असें समजावें.'सुप्' ह्याची पुनरुक्ती वरील सूत्रावरून करावयाची, परंतु ती प्रत्यहार ह्या अर्थाने करावयाची; केवळ सप्तमीचा अनेकवचनी प्रत्यय म्हणून करावयाची नाही. विभक्तिप्रत्यय लावण्यापूर्वी ' द्वि '

शब्दाबद्दल ' दो ' आदेश होतो. जसें:—
द्वाभ्याम्—दोहिं; द्वयोः—दोसु.

**त्रेस्तिः ९५.** विभक्तिप्रत्यय लावण्यापूर्वी त्रि ( तीन ) शब्दाबद्दल ' ति ' आदेश होतो व मग तो शब्द इकारान्त नामाप्रमाणें चालतो. जसें:—
त्रिभिः—तीहिं; त्रिषु—तीसु.

**तिण्णि जश्शस्भ्याम् ९६.** ' त्रि ' शब्दास ' जस् व शस् ' हे विभक्तिप्रत्यय लागले असतां ह्या दोघांबद्दल ' तिण्णि ' असा आदेश होतो. जसें:—
त्रय आगताः—तिण्णि आगदा—तीन आले; त्रीन् प्रेक्षस्व—तिण्णि पेक्ख—तिघांस पाहा.

**द्वेदुवे दोणि वा ९७.** द्वि शब्दास ' जस् व शस् ' प्रत्यय लागून जें रूप बनतें त्याबद्दल ' दुवे व दोणि ' असे विकल्पें आदेश होतात. विकल्प म्हणण्याचें कारण कीं, ९४ वे सूत्राप्रमाणें 'दो' रूपाचाही उपयोग करतां येतो, जसें:—
द्वौ कुरुतः—दुवे, दोणि, दो कुणंति; द्वौ प्रेक्षस्व—दुवे, दोणि, दो पेक्ख.

**चतुरश्चत्तारो चत्तारि ९८** चतुर् शब्दास विभक्तिप्रत्यय ' जस् ' अथवा ' शस् ' लागून जें रूप होतें, त्याबद्दल ' चत्तारो व चत्तारि ' असे आदेश होतात. जसें:—चत्वारः पुरुषाः कुर्वंति—चत्तारो, चत्तारि पुरिसा कुणंति=चार पुरूष कर-

तात; चतुरः पुरुषान् प्रेक्षस्व=चत्तारो, चत्तारि पुरिसे पेक्ख.

**एषामामो ण्हम्** ५९. द्वि, त्रि, चतुर् ह्यांस षष्ठीचा अनेकवचनी प्रत्यय 'आम्' लावावयाचा असल्यास त्या प्रत्ययाबद्दल 'ण्हं' आदेश होतो. जसें:—दोण्हं धणं, तिण्हं धणं; चतुण्हं धणं.

**शेषोऽदंतवत्** ६०. अकारान्त शब्द चालविण्याबद्दल जे नियम आहेत, तेच इतर शब्द चालविण्याबद्दल आहेत असें समजावें. 'भिसोहिं' (परि. ९ सूत्र ९) हें सूत्र अकारान्त शब्दांच्या संबंधानें आहे; परंतु तें इकारान्त व उकारान्त शब्दांसही लागू आहे. जसें:—अग्गीहिं, वाऊहिं (अग्नी व वायू ह्या शब्दांचीं तृतीयेचीं अनेकवचनी रूपें). आकारान्त, ईकारान्त व ऊकारान्त स्त्रीलिंगी शब्द चालविणे झाल्यासही हेच नियम लागू आहेत. जसें:—मालाहिं, णइहिं, वहूहिं (परि. ९–१९). त्याचप्रमाणें षष्ठीचें एकवचन अग्गिस्स, वाउस्स; पंचमीचें एकवचन अग्गीदो, वाऊदो, अग्गीदु, वाऊदु व त्याचप्रमाणें दोहिं, तीहिं, चऊहिं अशीं रूपें होतात.

**न ङिङस्योरेदातौ** ६१. इकारान्त व उकारान्त नामांच्या बाबतींत ङि व ङसि प्रत्ययांबद्दल 'ए व

आ ' असे आदेश होत नाहीत. उ०–अग्गिम्मि, वाउम्मि; अग्गीदो, वाऊदो; अग्गीदु, वाऊदु; अग्गीहि, वाऊहि.

ए भ्यसि ६२. भ्यस् प्रत्यय पुढें आला असतां इकारान्त अथवा उकारान्त नामाच्या अंत्याक्षराबद्दल ' ए ' आदेश होत नाही. उ० अग्गीहिंतो, वाऊहिंतो; अग्गीसुंतो, वाऊसुंतो.

टीपः—वर जो निषेध सांगितला तो ६१ वे सूत्रावरून समजावयाचा.

द्विवचनस्य बहुवचनम् ६३. विभक्तिप्रत्यय असोत किंवा क्रियापदांचे पुरुषवाचक प्रत्यय असोत, जेथें जेथें द्विवचन येईल तेथें तेथें बहुवचनाच्या रूपाचा उपयोग करावयाचा. जसें:—वृक्षौ–वच्छा; वृक्षाभ्याम्–वच्छेहिं, वच्छाहिंतो; वृक्षयोः–वच्छाण, वच्छेसु; तिष्ठतः–चिट्ठंति.

टीप.–प्राकृतांत द्विवचन नाही.

चतुर्थ्याः षष्ठी ६४. चतुर्थी विभक्तिप्रत्ययाबद्दल षष्ठीच्या प्रत्ययाचा उपयोग करावा. जसें:–ब्राह्मणाय देहि—बम्हणस्स देहि; ब्राम्हणेभ्यः देहि—बम्हाण देहि.

टीप.—प्राकृतांत चतुर्थी विभक्ती नाही.

# परिच्छेद ७ वा.

## क्रियापदें चालविण्याविषयीं नियम.

**तातिपोरिदेतौ** १. आत्मनेपदी व परस्मैपदी तृतीयपुरुषाचे एकवचनी प्रत्यय ' त ' व ' तिप् ' ह्यांबद्दल अनुक्रमें ' इ व ए ' आदेश होतात. जसें:— पठति, पठते=पढइ, पढए; सहति, सहते=सहइ, सहए.

**थास्सिपोः सि से** २. आत्मने व परस्मैपदी द्वितीय पुरुषाचे एकवचनी प्रत्यय ' थास् व सिप् ' ह्यांबद्दल अनुक्रमें ' सि ' व ' से ' असे आदेश होतात. जसें:—पठसि, पठसे=पढसि, पढसे; सहसि, सहसे=सहसि, सहसे.

**इट्मिपोर्मिः** ३. आत्मनेपदी व परस्मैपदी प्रथम पुरुषाचें एकवचनी प्रत्यय ' इट् ' व ' मिप् ' ह्यांबद्दल ' मि ' आदेश होतो. जसें:—पढामि, हसामि, सहामि.

**न्तिहेत्थामोमुमा बहुषु** ४. बहुवचनी प्रत्ययांबद्दल 'न्ति' ( तृ. पु. ), 'ह, इत्था' ( द्वि. पु. ), 'मो, मु, म' ( प्र. पु. ) असे आदेश होतात. जसें:—पठन्ति —पढंति; पठथ—पढह, पढित्था; पठामः—पढामो, पढमु, पढम.

**अत ए से ५.** पहिल्या व दुसऱ्या सूत्रांप्रमाणें 'ए' व 'से' असे आदेश करावयाचे, पण ते सर्वत्र नाही. अकारान्त धातूस ते लावावयाचे असल्यास मात्र करावयाचे, एरवीं नाही. जसें:— रमए, पढए; रमसे, पढसे इ० अकारान्त धातू म्हणण्याचें कारण कीं, 'भू' धातूचें प्राकृत रूप 'हो' असें होतें. ह्यास 'ए' व 'से' प्रत्यय लागले असतां 'होए' व 'होसे अशीं रूपें न होतां 'होई' व 'होसि' अशीं रूपें होतात.

**अस्तेर्लोपः ६.** 'अस्' धातूस 'थास् व 'सिप्' प्रत्यय लागले असतां 'अस्' चा लोप होतो. जसें:—सुप्तोऽसि=सुत्तोसि; पुरुषोऽसि=पुरिसोसि.

**मिमोमुमानामधो हश्च ७.** 'अस्' धातूचा लोप करावयाचा, असें वरील सूत्रांत सांगितलेंच आहे, व त्याची व्याप्ती याठिकाणीं चालू आहे, असें समजावयाचें. अस् धातूस मि, मो, मु म प्रत्यय लागले असतां ह्यांतील 'म' पुढें लागलींच 'ह' जोडावयाचा. जसें:—गतोऽस्मि, गताः स्मः= गओह्मि, गअम्हो, गअम्हु, गअम्ह.

**यक ईअइज्जौ ८.** कर्मणीचा प्रत्यय 'यक्' ह्याबद्दल 'ईअ' व 'इज्ज' असे आदेश करावयाचे व ह्यांस नंतर प्रत्यय जोडावयाचे. जसें:—पठ्यते= पढीअइ, पढिज्जई; सह्यते=सहीअइ, सहिज्जई.

टीप:—पढिज्जइ ह्या रूपावरून जुन्या मराठींतील कर्मणी रूप पढिजे असें सिद्ध झालें. त्याचप्रमाणें पाहिजे करिजे, बोलिजे वगैरे कर्मणी रूपें सिद्ध होतात, असें समजावें.

**नांत्यद्वित्वे** ९. धातूचा अंत्य द्वित्त असेल, तर 'यक्' बद्दल 'ईअ' व 'इज्ज' असे आदेश होत नाहीत. उ० हस्यते=हस्सइ; गम्यते=गम्मइ. परिच्छेद ८ सूत्र ९८ प्रमाणें गम् वगैरे धातूंच्या संबंधाने अंत्यास द्वित्व विकल्पें होतें.

टीप:—ज्या वेळेस अंत्यास द्वित्व होत नाही, त्या वेळेस ८ वें सूत्र लागू आहे व गमीअइ व गमिज्जई अशीं रूपें होतात.

**न्तमाणौ शतृशानचोः** १०. कृदंत प्रत्यय 'शतृ' व 'शानच्' ह्यांबद्दल 'न्त' व 'माण' असे अनुक्रमें आदेश होतात. जसें:—पढंतो, पढमाणो; हसंतो, हसमाणो.

**ई च स्त्रियाम्** ११. 'शतृ' व 'शानच्' हे प्रत्यय स्त्रीलिंगी असतां त्यांबद्दल 'ई' आदेश होतो. सूत्रांत 'च' शब्द आहे, त्यावरून 'न्त' व 'माण' हे आदेश आणखी होतात, असें समजावयाचें. जसें:—हसई, हसंती, हसमाणा; वेवई, वेवंती, वेवमाणा.

**धातोर्भविष्यति हिः १२.** भविष्यकाळी धातूंस 'हि' असें पद जोडावयाचें व नंतर वर्तमानकाळचे प्रत्यय लावावयाचे. जसें:—भविष्यति=होहिइ (तो होईल ); भविष्यंति–होहिंति (ते होतील ); हसिष्यति–हसिहिइ ( तो हसेल ), हसिष्यंति–हसिहिंति ( ते हसतील ).

**उत्तमे स्सा हा च १३.** भविष्यकाळी प्रथम पुरुषी धातूस ' स्सा ' व ' हा ' अशीं पदें लावावयाचीं व सूत्रांत ' च ' शब्द आहे, म्हणून ' हि ' हेंही पद असावयाचें. जसें:—भविष्यामि–होस्सामि होहामि, होहिमि ( मी होईन ); भविष्याम=होस्सामो, होहामो, होहिमो.

**मिना स्सं वा १४.** भविष्यकाळी प्रथम पुरुषी एकवचनी धातूस 'मि' प्रत्ययाबद्दल 'स्सं' पद विकल्पें लावलें असतां हरकत नाही. जसें:—भविष्यामि=होस्सं=मी होईन. विकल्प आहे त्या अर्थी वरील सूत्रांतील रूपांचाही उपयोग करावयाचा.

**मोमुमैर्हिस्साहित्था १५.** भविष्यकाळी प्रथम पुरुषी अनेकवचनी धातूस ' मो, मु अथवा म ' न लावतां अनेकवचनी प्रत्ययांबद्दल हिस्सा व हित्था, विकल्पें लावावे. जसें:—भविष्याम–होहिस्सा, होहित्था ( आम्ही होऊ ); हसिष्याम–हसिहिस्सा, हसिहित्था ( आम्ही हसू ). ज्या अर्थीं विकल्प

सांगितला आहे, त्या अर्थी पूर्वींच्या रूपांचाही उपयोग करावयाचा. जसें:—होहिमो, होस्सामो, होहामो.

**कृदाश्रुवचिगमिरुदिदृशिविदिरूपाणां काहं दाहं सोच्छं वोच्छं गच्छं रोच्छं दच्छं वेच्छं १६.**

भविष्यकाळी प्रथम पुरुषी एकवचनी कृ, दा, श्रु, वच्, गम्, रुद्, दृश्, विद् ह्या धातूंबद्दल अनुक्रमें काहं, दाहं, सोच्छं, वोच्छं, गच्छं, रोच्छं, दच्छं, वेच्छं असे आदेश करावयाचे. जसें:—करिष्यामि—काहं (मी करीन), दास्यामि—दाहं (मी देईन), श्रोष्यामि—सोच्छं (मी ऐकेन), वक्ष्यामि—वोच्छं (मी बोलेन), गमिष्यामि—गच्छं (मी जाईन), रोदिष्यामि—रोच्छं (मी रडेन), द्रक्ष्यामि—दच्छं (मी पाहीन), वेत्स्यामि—वेच्छं (मी जाणीन).

**श्वादीनां त्रिष्वप्यनुस्वारवर्जं हिलोपश्च वा १७.**

भविष्यकाळी ' श्रु ' आदी धातूंबद्दल अनुस्वार सोडून 'सोच्छ' आदी आदेश होतात; व हे प्रथम, द्वितीय व तृतीय पुरुषांचे प्रत्यय लागले असतांही होतात असें समजावें. बाराव्या सूत्राप्रमाणें ' हि ' हें पद लावावयाचें; परंतु ह्या ठिकाणीं तें लावावें किंवा त्याचा लोप करावा. जसें:—श्रोष्यति ( तो ऐकेल )=सोच्छिइ, सोच्छिहिइ;

श्रोष्यंति (ते ऐकतील)=सोच्छिंति, सोच्छिहिंति;
श्रोष्यसि (तूं ऐकशील)=सोच्छिसि, सोच्छिहिसि;
श्रोष्यथ (तुम्ही ऐकाल)=सोच्छित्था, सोच्छिहित्था;
श्रोष्यामि (मी ऐकेन)=सोच्छिमि, सोच्छिहिमि;
श्रोष्यामः (आम्ही ऐकू)=सोच्छिमो, सोच्छिहिमो, सोच्छिमु, सोच्छिहिमु, सोच्छिम, सोच्छिहिम, सोच्छिस्सामु, सोच्छिस्साम. ह्याप्रमाणेंच वोच्छादी शब्द चालवावयाचे.

**उसुमु विध्यादिष्वेकस्मिन् १८.** आज्ञार्थी एकवचनी प्रत्ययांबद्दल अनुक्रमें उ, सु, मु असे आदेश होतात. जसें:—हसतु (तो हसो)=हसउ; हस (तूं हस)=हससु; हसानि (मी हसू)=हसमु.

टीप—आज्ञार्थी संस्कृत एकवचनी प्रत्ययः—तु–,आनि.

**न्तुहमो बहुषु १९.** आज्ञार्थी अनेकवचनी प्रत्ययांबद्दल अनुक्रमें न्तु, ह, मो असे आदेश होतात. जसें:—हसंतु (ते हसोत)=हसंतु; हसथ (तुह्मी हसा) =हसह; हसाम (आम्ही हसू)=हसमो.

टीप—आज्ञार्थी अनेकवचनी संस्कृत प्रत्ययः—अन्तु, त, आम्.

**वर्तमानभविष्यदनद्यतनयोर्ज्जज्जा वा २०.** वर्तमान व अनद्यतन भविष्यकाळच्या प्रत्ययांबद्दल, त्याचप्रमाणें जेव्हां आज्ञेचा बोध होत असेल तेव्हां, विकल्पें 'ज्ज' व 'ज्जा' आदेश होता-

त. ज्या अर्थी विकल्प आहे, त्याअर्थी पूर्वी सांगितलेले आदेश कायम आहेत असें समजावें- जसें:—(वर्तमान)—भवति (तो आहे)=होज्ज, होज्जा किंवा होइ; हसति (तो हसतो)= हसेज्ज, हसेज्जा किंवा हसइ. (अनद्यतन भविष्यकाळ)—भविष्यति (तो होईल)=होज्ज, होज्जा किंवा होहिइ इ०. ह्याचप्रमाणें आज्ञार्थ.

मध्ये च २१. वर्तमान, अनद्यतनभविष्य व आज्ञार्थी धातू व प्रत्यय ह्यांमध्यें विकल्पें 'ज्ज' व 'ज्जा' जोडावे. उ० [वर्तमान]—होज्जइ, होज्जाइ; [भविष्य] —होज्जहिइ, होज्जाहिइ; [आज्ञार्थी]—होज्जउ, होज्जाउ.

नानेकाचः २२. एकाक्षरी स्वरान्त धातू नसेल, तर वर्तमान, भविष्य व आज्ञार्थी धातू व प्रत्यय ह्यांमध्यें 'ज्ज' व 'ज्जा' घालावयाचे नाहीत. अशा ठिकाणीं अंतींमात्र ते येतात. जसें:—हसइ, तुवरइ. [अंतीं]—हसेज्ज, हसेज्जा; तुवरेज्ज, तुवरेज्जा.

ईअ भूते २३. भूतकाळीं प्रत्ययाबद्दल 'ईअ' आदेश होतो. जसें:—अभवत् [तो होतो]=हुवीअ; अहसत् [तो हसला]=हसीअ.

एकाचो हीअ २४. एकाक्षरी धातूच्या भूतकाळी प्रत्ययाबद्दल 'हीअ' आदेश होतो. जसें:—अभूत् [तो होता]=होहीअ.

**अस्तेरासिः २५.** भूतकाळी एकवचनी ' अस्ति ' बद्दल ' आसि ' असा आदेश होतो. जसें:- आसीद्राजा [ एक राजा होता ]=आसि राआ; आसीद्वधूः=आसि वहू.

**णिच एदादेरत आत् २६.** प्रयोज्य प्रत्यय जो 'णिच्' त्याबद्दल 'ए' आदेश होतो; व धातूच्या प्रारंभीच्या अकाराचा आकार होतो. जसें:—कारयति ( तो करवितो. )=कारेइ; हासयति ( तो हसवितो )=हासेइ; पाठयति = पाढेइ.

**आवे च २७.** ' णिच् ' बद्दल ' ए ' आदेश होऊन ' आवे ' असाही आदेश होतो. जसें:—कारयति=करावेइ, कारावेइ; हासयति=हसावेइ, हासावेइ; पाठयति = पढावेइ, पाढावेइ.

**आविः क्तकर्मभावेषु वा २८.** ' णिच् ' पुढें भूतभूतकाळचा प्रत्यय ' क्त ' आला असतां, भाव व कर्म ह्यांचा बोध होतो, ह्मणजे कर्मणी प्रयोग असतो, तेव्हां त्या ' णिच् ' बद्दल विकल्पें ' आवि ' असा आदेश होतो. जसें:— कारितम् ( करावयास लावलेलें ) = कराविअं, कारिअं.

हासितम् ( हसावयास लावलेलें ) = हसाविअं, हासिअं.

पाठितम् ( पठन करावयास लावलेलें ) = पढाविअं, पाढिअं

कार्यते ( केलें जातें ) = कराविज्जइ, कारिज्जइ.
हास्यते ( हसलें जातें )=हसाविज्जइ, हासिज्जइ.
पठयते ( पठन केलें जातें ) = पढाविज्जइ, पाढिज्जइ.

**नैदावे** २९. ' णिच् ' पुढें ' क्त ' आला तर, किंवा कर्मणी रूप असलें, तर ' णिच् ' बद्दल ' ए ' व ' आवे ' असे आदेश होत नाहीत. जसें:- कारिअं, कराविअं, कारिज्जइ, कराविज्जइ.

**अत आ मिपि वा** ३०. अकारान्त धातूस ' मिप् ' प्रत्यय लागला असतां त्याच्या अंत्याबद्दल विकल्पें ' आ ' आदेश होतो. जसें:—हसामि ( मी हसतो ) = हसामि, हसमि.

**इच्च बहुषु** ३१. प्रथम पुरुषी अनेक वचनी धातूच्या अंतींच्या ' अ ' बद्दल ' इ ' आदेश होतो. सूत्रांत ' च ' आहे, ह्मणून ' आ ' ही आणखी आदेश होतो, असें समजावें. जसें:—हसामः ( आम्ही हसतो ) = हसिमो, हसामो, हसिमु, हसामु.

टीप:—' आ ' आदेश होतो, तो ३० वे सूत्राप्रमाणें विकल्पें होतो, असें दिसतें.

**क्ते** ३२. अकारान्त धातूस ' क्त ' प्रत्यय लागला असतां ' अ ' बद्दल ' इ ' आदेश होतो. जसें:-- हसितम् ( हसलेलें ) = हसिअं; पठितम् (पठन केलेलें ) = पढिअं.

ए च क्त्वातुमुन्तव्यभविष्यत्सु ३३. 'क्त्वा, तुमुन् व तव्य प्रत्यय पुढें जोडावयाचे असतां व भविष्य-काळ असतां धातूच्या अंतींच्या 'अ' बद्दल 'ए' आदेश होतो. सूत्रांत 'च' आहे त्याव-रून आणखी 'इ' आदेशही होतो असें सम-जावें. जसें:—हसित्वा = हसेऊण, हसिऊण—हसून; हसितुम् ( हसण्यासाठीं )=हसेउं, हसिउं —हसूं; हसितव्यम् = हसेअव्वं, हसिअव्वं; हसि-ष्याति = हसेहिइ, हसिहिइ.

लादेशे वा ३४. अकारान्त धातुपुढें लकारादेश आला असतां ( ह्मणजे 'ल' बद्दल जो 'आ' आदेश होतो तो ) 'अ' च्या ठिकाणीं विकल्पें 'ए' आदेश होतो. जसें:-हसति = हसेइ, हसइ; हसंति=हसेंति, हसंति.

टीपः—लकारादेश ह्मणजे कोणत्याही काळीं व पुरुषीं असा अर्थ समजावयाचा.

---

## परिच्छेद ८ वा.

भुवो होहुवौ १ भू ( होणे ) ह्मा धातूबद्दल 'हो व हुव' आदेश होतात. जसें:-भवति ( तो आहे ) =होइ, हुवइ; भवन्ति (ते आहेत)=होंति, हुवंति.

क्ते हुः २. भू धातूस 'क्त' प्रत्यय लागला असतां त्याबद्दल 'हु' आदेश होतो. जसें:—भूतम् ( झालेलें ) = हुअं.

**प्रादेर्भवः** ३. 'प्र' वगैरे उपसर्गांपुढें 'भू' धातू आला असतां त्याबद्दल 'भव' आदेश होतो. जसें:—प्रभवति ( तो बलवान होतो )=पभवइ; संभवति ( तो जन्म पावतो )=संभवइ.

**त्वरस्तुवरः** ४. 'त्वर्' ( जलदी करणे ) ह्याबद्दल 'तुवर' असा आदेश होतो. जसें:—त्वरति = तुवरइ.

**क्ते तुरः** ५. 'त्वर्' धातूस 'क्त' प्रत्यय लागला असतां 'तुर' आदेश होतो. जसें:—त्वरित–तुरिअं.

**टीपः**—तुरिअं ह्यांतील 'इ' ही परिच्छेद ७ सूत्र ३२ प्रमाणें होते.

**घुणो घोलः** ६. 'घुण्, घूर्ण्' ( भ्रमण पावणे ) ह्यांबद्दल 'घोल' आदेश होतो. जसें:—घुणति, घूर्णति ( परस्मै. ६ ) घोलइ.

**टीपः**—मराठींतील घोळणे हें रूप प्राकृत 'घोल' पासून आलें असावें.

**णुदो णोल्लः** ७. 'णुद्' ( पाठविणे, ढकलणे, उभयपदीं ६ ) बद्दल 'णोल्ल' आदेश होतो. जसें:—नुदति = णोल्लइ; प्रणुदति = पणोल्लइ.

**दूङो दूमः** ८. 'दू' (दुःख होणे) धातूबद्दल 'दूम' आदेश होतो. जसें:—दूयति = दूमइ.

**पटेः फलः** ९. 'पट्' ( जाणे, पर. १ ) धातूबद्दल 'फल' आदेश होतो. जसें:—पाटितं हृदयम् = फलिअं हिअअं = माझा धीर खचला.

**पदेः पालः १०.** ' पद् ' ( जाणे ) ह्या धातूबद्दल ' पाल ' आदेश होतो. जसें:–पदयते?=पाळेइ.

**वृषकृषमृषहृषामृतोऽरिः ११.** ' वृष् ' (वर्षणे), कृष् ( ओढणे ), मृष् ( सहन करणे ), हृष् ( आनंदी असणे ) ह्या धातूंतील ऋकाराबद्दल ' रि ' आदेश होतो. जसें:–वर्षति = वरिसइ; कर्षति= करिसइ; मर्षति = मरिसइ; हर्षति = हरिसइ.

**ऋतोऽरः १२.** ऋकारान्त धातू असतां ' ऋ ' बद्दल ' अर ' आदेश होतो. जसें:––मृ (मरणे)=मरइ; सृ ( सरणे ) = सरइ; वृ ( वरणे ) = वरइ.

**कृञः कुणो वा १३.** ' कृ ' धातूबद्दल विकल्पें 'कुण' आदेश होतो. जसें:–करोति=कुणइ किंवा करइ.

**जृभो जंभाअः १४.** ' जृभ् ' ( जांभई देणे ) धातूबद्दल ' जंभाअ ' असा आदेश होतो. जसें:— जंभाअइ ( तो जांभई देतो. )

**ग्रहेर्गेण्हः १५.** ' ग्रह् ' ( धरणे ) ह्याबद्दल ' गेण्ह ' आदेश होतो. जसें:—गेण्हइ ( तो धरतो ).

**घेत् त्कातुमुन्तव्येषु १६.** ' ग्रह् ' धातूस ' त्का, तुमुन् व तव्य ' प्रत्यय लागले असतां त्याबद्दल 'घेत्' असा आदेश होतो. जसें:–गृहीत्वा=घेत्तूण (घेऊन); गृहीतुम् = घेत्तुं ( घेण्यास ); गृहीतव्य=घेत्तव्वं ( घ्यावें ).

**कृञः का भूतभविष्यतोश्च १७.** भूत व भविष्य काळ असतां व त्याचप्रमाणें ' त्का, तुम् व तव्य '

प्रत्यय लागले असतां 'कृ' धातूबद्दल 'का' आदेश होतो. जसें:—काहीअ (त्याने केलें); काहिइ (तो करील); काऊण (करून); काउं (करण्यास); काअव्वं (करावयाचें).

**स्मरतेर्भरसुमरौ** १८. 'स्मृ' (स्मरणे) धातूबद्दल 'भर व सुमर' असे आदेश होतात. जसें:— भरइ अथवा सुमरइ (तो स्मरतो).

**भियो भावीहौ** १९. 'भी' धातूबद्दल 'भा' व 'वीह' असे आदेश होतात. जसें:—भाइ, विहइ (तो भितो).

**जिघ्रते पापाऔ** २०. घ्रा (वास घेणे) ह्या धातूबद्दल 'पा व पाअ' आदेश होतात. जसें:— पाइ, पाअइ (तो वास घेतो).

**म्लै वावाऔ** २१. म्लै (कोमजणे) धातूबद्दल 'वा, वाअ' असे आदेश होतात. जसें:—वाइ, वाअइ (तो म्लान होतो).

**तृपस्थिपः** २२. 'तृप्' (संतुष्ट होणे) धातूबद्दल 'थिंप' आदेश होतो. जसें:—थिंपइ (तो संतुष्ट झाला आहे).

**ज्ञो जाणमुणौ** २३. 'ज्ञा' (जाणणे) धातूबद्दल 'जाण व मुण' असे आदेश होतात. जसें:— जाणइ, मुणइ (तो जाणतो).

**जल्पेर्लो मः २४.** जल्प् ( बोलणे ) धातूंतील अकारांबद्दल मकार होतो. जसें:—जल्पति= जम्पइ ( तो बोलतो. )

**स्थाध्यागानां ठअझाअगाहाः २५.** 'स्था' (उभे-राहणे ) ' ध्यै ' ( चिंतन करणे ) व ' गै ' ( गाणे ) ह्या धातूंबद्दल ' ठअ, झाअ, गाअ ' असे आदेश अनुक्रमें होतात. जसें:—ठाअंति ( ते उभे राहतात ); झाअंति ( ते चिंतन करतात ); गाअंति ( ते गातात ).

**ठाझागाश्च वर्तमानभविष्यद्विध्याद्येकवचनेषु २६.** स्था, ध्यै व गै ह्या धातूंस वर्तमान, भविष्य व आज्ञार्थी एकवचनी प्रत्यय लागले असतां त्यांबद्दल अनुक्रमें ' ठा, झा व गा ' असे आदेश होतात. सूत्रांत ' च ' शब्द आहे, तेव्हां वरील सूत्रांत सांगितलेलेही आदेश होतात असें समजावें. जसें:—ठाइ, ठाअइ ( तो उभा राहतो ); ठाहिइ, ठाअहिइ ( तो उभा राहील ); ठाउ, ठाअउ ( तो उभा राहो ). त्याचप्रमाणें— झाइ, झाअइ ( तो चिंतन करतो ); झाहिइ, झाअहिइ ( तो चिंतन करील ); झाउ, झाअउ ( तो चिंतन करो ). गाइ, गाअइ ( तो गातो ); गाहिइ, गाअहिइ ( तो गाईल ); गाउ, गाअउ ( तो गावो ).

**खादिधाव्योः खाधौ** २७. खाद् ( खाणे ) व धाव् ( धावणे ) ह्या धातूंबद्दल वर्तमान, भविष्य व आज्ञार्थ असतां 'खा' व 'धा' असे आदेश होतात. जसें:–खादति=खाइ; धावति=धाइ ( तो धावतो ); खाहिइ ( तो खाईल ); धाहिइ ( तो धावेल ); खाउ ( तो खावो ); धाउ ( तो धावो ).

**ग्रसेर्विसः** २८. ग्रस् ( खाणे ) धातूबद्दल 'बिस' आदेश होतो. जसें:—बिसइ ( तो खातो ).

**चिञश्चिणः** २९. चि ( गोळा करणे ) धातूबद्दल 'चिण' आदेश होतो. जसें:—चिनोति=चिणइ ( तो गोळा करतो. )

**क्रीञः किणः** ३० क्री ( विकत घेणे ) धातूबद्दल 'किण' आदेश होतो. जसें:—क्रीणाति=किणइ ( तो विकत घेतो ).

**वेः के च** ३१. क्री धातूपूर्वी 'वि' उपसर्ग आला असतां त्याबद्दल 'के' असा आदेश होतो व सूत्रांत 'च' आहे, म्हणून 'किण' आदेशही होतो असें समजावें. विक्रीणाति=विकेइ, विकिणइ= विकतो.

**उद्ध्म उद्धुमा** ३२. ध्मा ( फुंकणे ) धातूपूर्वी 'उत्' उपसर्ग आला असतां त्या दोहींबद्दल 'उद्धुमा' असा आदेश होतो. जसें:–उद्धुमाइ–तो फुंकतो.

**श्रदो धो दहश्च** ३३. धा ( धरणे ) धातूपूर्वी 'श्रत्'

आले असतां ' दह ' आदेश होतो. जसें:-- श्रद्धाति ( तो विश्वास ठेवतो )=सद्दहइ; सद्दहिअं ( विश्वास ठेवलेलें ).

**अवाद्गाहेर्वाहः** ३४. गाह् ( स्नान करणे ) धातूपूर्वी 'अव' उपसर्ग आला असतां ' गाह् ' बद्दल 'वाह' आदेश होतो. ओवाहइ किंवा अववाहइ ( तो स्नान करतो ).

**कासेर्वासः** ३५. कास् ( खोकणे ) धातूपूर्वी 'अव' उपसर्ग आला असतां ' कास् ' बद्दल ' वास ' आदेश होतो. जसें:--ओवासइ, अववासइ ( तो खोकतो. )

**निरो माङो माणः** ३६. मा ( मोजणे ) धातूपूर्वी निर् उपसर्ग आला असतां ' माण ' असा आदेश होतो. जसें:-णिम्माणइ (तो उत्पन्न करतो.)

**क्षियो झिज्जः** ३७. क्षि ( क्षय पावणे ) धातूबद्दल ' झिज्ज ' असा आदेश होतो. क्षयति-झिज्जइ-झिज + तो.

**भिदिच्छिदोरंत्यस्य न्दः** ३८. भिद् ( फोडणे व छिद् ( कापणे ) ह्या धातूंतील 'द' बद्दल 'न्द' आदेश होतो. जसें:--भिंदइ ( तो फोडतो ); छिंदइ ( तो कापतो ).

**कथेर्ढः** ९. कथ् ( शिजविणे ) धातूच्या अंतींच्या 'थ' बद्दल 'ढ' आदेश होतो. जसें:-कढइ=कढ+तो.

**वेष्टेश्च ४०.** वेष्ट् ( वेष्टणे ) धातूंतील 'ष्ट' बद्दलदेखील 'ढ' आदेश होतो. जसें:—वेड्ढइ=वेढतो.

**टीपः**—वेढणे, वेढा वगैरे शब्द 'वेड्ढ' पासून आले आहेत. सूत्रें ३९ व ४० हीं एकत्र असावयाचीं; परंतु तीं निराळीं असण्याचें कारण कीं, ४० वे सूत्रांत अंतींच्या संयुक्त व्यंजनाबद्दल कोणता आदेश होतो, हें सांगितलें आहे व ३९ वे सूत्रांत एकाकी व्यंजनाबद्दल कोणता आदेश होतो हें सांगितलें आहे. द्वित्त 'ढ' हा परिच्छेद ३ सूत्र २१ प्रमाणें झाला आहे.

**उत्समोर्लः ४१.** वेष्ट् धातूस 'उत्' व 'सम्' हे उपसर्ग लागले असतां अंतींच्या 'ष्ट' बद्दल 'ल' आदेश होतो. जसें:—उव्वेल्लइ, संवेल्लइ.

**रुदेर्वः ४२.** रुद् ( रडणे ) धातूच्या अंतींच्या 'द' बद्दल 'व' होतो. जसें:—रुवइ.

**उदो विजः ४३.** विज् ( कंप पावणे ) धातूस 'उत्' उपसर्ग लागला असतां अंतींच्या 'ज' बद्दल 'व' आदेश होतो. जसें:—उव्विवइ.

**वृधेर्ढः ४४.** वृध् ( वाढणे ) धातूच्या अंतींच्या 'ध' बद्दल ढकार होतो. जसें:—वड्ढइ—वाढ+तो.

**हंतेर्म्मः ४५.** हन् ( मारणे ) धातूच्या अंत्याबद्दल 'म्म' आदेश होतो. जसें हन्ति=हम्मइ ( तो मारतो. )

**रुषादीनां दीर्घता ४६.** रुष् ( रागावणे ) वगैरे धातूंना दीर्घत्व येतें. जसें:—रुष्यति=रूसइ (तो रुसतो).

**चो व्रजनृत्योः** ४७. व्रज् (जाणे) व नृत् (नाचणे) ह्यांच्या अंत्य वर्णाबद्दल 'च्च' आदेश होतो. जसें:—व्रजति=वच्चइ (तो जातो); नृत्यति=णच्चइ (तो नाचतो).

**युधिबुध्योर्झः** ४८. युध् (लढणे) व बुध् (जाणणे) ह्यांतील अंतींच्या 'ध' बद्दल 'झ' होतो. जसें:—युध्यति=जुज्झइ (तो झुजतो किंवा झुंजतो); बोधति=बुज्झइ (तो जाणतो).

**रुधेर्न्धम्भौ** ४९. रुध् (अडथळा करणे) धातूच्या अंतींच्या 'ध' बद्दल 'न्ध' व 'म्भ' असे आदेश होतात. जसें:—रुणद्धि=रुन्धइ, रुम्भइ (तो अडथळा करतो).

**मृदो लः** ५०. मृद् (तुडविणे, चेंगरणे) धातूच्या अंतींच्या 'द्' बद्दल 'ल' होतो. जसें:—मलइ (तो मळतो).

**टीप**:—मळणे, मळणी, मलई वगैरे शब्द वरील धातूपासून निघाले असावे.

**शदलृपत्योर्डः** ५१. शद् (कुजणे, नाश पावणे) व पत् (पडणे) ह्यांच्या अंत्याबद्दल 'ड' होतो. जसें:—सडइ (सडतो); पड+इ=पड+तो.

**शकादीनां द्वित्वम्** ५२. शक् (शकणे), लग् (चिकटणे) वगैरे धातूंच्या अंत्यवर्णास द्वित्व होतें. जसें:-शक्नोति=सक्कइ=सकतो, शकतो; लगति=लग्गइ=लागतो.

**स्फुटिचल्योर्वा** ९३. स्फुट् ( विकसणे ) व चल् ( कांपणे ) ह्यांच्या अंत्यवर्णास विकल्पें द्वित्व होतें. फुट्टइ, फुडइ=फुटतो, फोडतो; चल्लइ, चलइ.

**प्रादेर्मीलः** ९४. मील ( मिचकणे ) धातूपूर्वी ' प्र ' वगैरे उपसर्ग आले असतां त्याच्या अंत्यास विकल्पें ' द्वित्व ' होतें:—पमिल्लइ; पमीलइ.

**भुजादीनां त्कातुमुन्तव्येषु लोपः** ९५. भुज् (खाणे) वगैरे धातूंस ' क्त्वा ', ' तुम् ' व ' तव्य 'प्रत्यय लागले असतां त्यांच्या अंत्याचा लोप होतो:— भुक्त्वा ( खाऊन )=भोत्तूण; भोक्तुम्=भोत्तुं; भोक्तव्यं=भोत्तव्वं. ह्याचप्रमाणें विद् ( जाणणे ) ह्यापासून—वेत्तूण, वेत्तुं, वेतव्वं; व रुद् (रडणे) ह्यापासून—रोत्तूण, रोत्तुं, रोत्तव्वं अशीं रूपें होतात.

**श्रुहुजिलूधूवा णोऽन्त्ये ऱ्हस्वः** ९६. श्रु ( ऐकणे ), हु (अर्पण करणे), जि (जिंकणे), लू (कापणे), धू ( हालणे ) या धातूंच्या शेवटीं ' ण ' लावावयाचा व त्यापूर्वीचा दीर्घ स्वर ऱ्हस्व करावयाचा. जसें:—सुणइ, हुणइ, जिणइ, लुणइ, धुणइ.

**भावकर्मणो व्वश्च** ९७. वरील ' श्रु ' वगैरे धातूंची कर्मणी करावयाची असेल, तर त्यांच्या शेवटीं ' व्व ' लावावयाचा. सूत्रांत 'च' शब्द आहे, ह्मणून ' ण ' ही लावावयाचा असें समजावें.

जसें:—सुव्वइ, सुणिज्जइ; हुव्वइ, हुणिज्जइ; जिव्वइ, जिणिज्जइ; लुव्वइ, लुणिज्जइ; धुव्वइ, धुणिज्जइ.

**गमादीनां द्वित्वं वा** ५८. 'गम्' इत्यादि धातूंची कर्मणी कर्तव्य असतां त्यांच्या अंत्याक्षरास विकल्पें द्वित्व होतें. जसें:—गम्यते=गम्मइ, गमिज्जइ; रम्यते=रम्मइ, रमिज्जइ; हस्यते=हस्सइ, हसिज्जइ.

**लिहेर्लिज्झः** ५९. लिह् ( चाटणे ) या धातूची कर्मणी कर्तव्य असतां त्याबद्दल 'लिज्झ' असा आदेश होतो. जसें:–लिह्यते=लिज्झइ ( चाटलें जातें ).

**हृक्रोर्हीरकीरौ** ६०. हृ (हरण करणे) व कृ (करणे) यांची कर्मणी कर्तव्य असतां त्यांबद्दल 'हीर' व 'कीर' असे अनुक्रमें आदेश होतात. जसें:–ह्रियते=हीरइ; क्रियते=कीरइ ( केलें जातें ).

**ग्रहेर्दीर्घो वा** ६१. ग्रह् ( घेणे ) धातूची कर्मणी कर्तव्य असतां त्यांतील ऱ्हस्व 'अ' बद्दल विकल्पें दीर्घ 'आ' करावा. जसें:—गृह्यते=गाहिज्जइ, गहिज्जइ.

**क्तेन दिण्णादयः** ६२. 'क्त' प्रत्यय लागून झालेलीं धातुसाधितें ह्यांच्याबद्दल दिण्णादिकांचीं अनियमित रूपें होतात. जसें:—दा ( देणे )–दिण्णं ( दिलेलें ); रुद् ( रडणे )—रुण्णं ( रडलेलें );

त्रस् ( भय पावणे )–हित्थं; दह् ( जळणे )— दड्ढं (जळलेलें); रंज् ( रंजणे )–रत्तं (रंजलेलें).

**खिदेर्विसूरः** ६३. खिद् ( दुःख पावणे ) धातूबद्दल 'विसूर' असा आदेश होतो. जसें:—विरहेण विसूरइ बाला ( बाला आपल्या प्रियकराच्या विरहाने दुःख पावते ).

**क्रुधेर्जूरः** ६४. क्रुध् ( कोप पावणे) धातूबद्दल 'जूर' आदेश होतो. जसें:–जूरइ (तो रागावला आहे).

**चर्चेश्चंपः** ६५. चर्च् ( अध्ययन करणे ) धातूबद्दल- 'चंप' आदेश होतो. जसें:–चंपइ ( तो अध्ययन करतो ).

**त्रसेर्वज्जः** ६६. त्रस् ( उद्वेग पावणे ) धातूबद्दल 'वज्ज' आदेश होतो. जसें:—वज्जइ ( तो उद्वेग पावतो ).

**मृजेर्लुभसुपौ** ६७. मृज् ( स्वच्छ करणे ) धातूबद्दल 'लुभ' व 'सुप' असे आदेश होतात. जसें:– लुभइ अथवा सुपइ ( तो स्वच्छ करतो ).

**वुट्टखुप्पौ मस्जेः** ६८. मस्ज् (बुडणे) धातूबद्दल 'वुट्ट' व 'खुप्प' असे आदेश होतात. जसें:—वुट्टइ, खुप्पइ ( तो बुडाला आहे ).

**दृशेः पुलअणिअक्कअवक्खाः** ६९. दृश् ( पाहणे ) धातूबद्दल 'पुलअ,' णिअक्क,' व 'अवक्ख' असे आदेश होतात. जसें:–पुलअइ, णिअक्कइ, अवक्खइ ( तो पाहतो ).

**शकेस्तरवअतीराः** ७०. शक् ( शकणे ) धातूबद्दल 'तर' 'वअ' व 'तीर' असे आदेश होतात. जसें:- तरइ, वअइ, तीरइ ( तो समर्थ आहे ).

**शेषाणामदंतता** ७१. बाकीच्या धातूंच्या अनुबंधांचा लोप होतो, व ते धातू अकारान्त आहेत असें समजतात. जसें:-भ्रम् ( भटकणे )=भमइ ( तो भटकतो ), चुंब् ( चुंबन करणे )=चुंबइ ( तो चुंबन करतो ).

---

# परिच्छेद ९ वा.

**निपाताः** १. ' निपाताः ' हें अधिकार सूत्र आहे. ह्यांत निपातांविषयीं ( कृदंतांविषयीं ) विचार सांगितला आहे, व तो संस्कृत व्याकरणकारांच्या पद्धतीप्रमाणें सांगितला आहे.

**हुं दानपृच्छानिर्धारणेषु** २. 'हुं' ह्या अव्ययाचा देणे, विचारणे अथवा निक्षून बोलणे ह्या अर्थीं उपयोग करतात. जसें:—हुं गृहाणात्मनो जीवम्—हुं गेण्ह अप्पणो जीअं=हुं घे आपला जीव. हुं कथय साधुत्व सद्भावम् = हुं साहुसु सब्भावं; हुं भव तुष्णीकः = हुं हुवसु तुण्हिक्को = हुं स्तब्ध राहा.

**विअ वेअ अवधारणे ३.** निक्षून सांगणे ह्या अर्थाने 'विअ' व 'वेअ' ह्यांचा उपयोग करण्यांत येतो. जसें:—एवमेव=एवं विअ, एवं वेअ.

**ओ सूचनापश्चात्तापविकल्पेषु ४.** 'ओ' ह्या अव्ययाचा सूचना, पश्चात्ताप व विकल्प (अनिश्चितपणा) ह्या अर्थी उपयोग करतात. जसें:— ओ चिर असि.

**इरकिरकिला अनिश्चिताख्याने ५.** इर, किर व किल ह्या अव्ययांचा उपयोग अनिश्चितपणा दाखवावयाचा असतां करतात. जसें:—प्रेक्षस्व किल तेन हतः = पेक्ख इर तेण हदो; अद्य किल तेन व्यवसितः = अज्ज किर तेण ववसिओ; अयं किल स्वप्नः = अअं किल सिविणओ.

**हुं क्खु निश्चयवितर्कसंभावनेषु ७.** 'हुं' व 'क्खु' ह्या अव्ययांचा निश्चय, संशय अथवा विचार ह्या अर्थी उपयोग करतात. जसें:—हुं राक्षसः=हुं रक्खसो; गुरुः खलु भारः = गरुओ क्खु भारो.

**णवरः केवले ७.** 'णवर' ह्याचा केवलार्थी उपयोग करतात. जसें:—णवर अण्णं.

**आनंतर्ये णवरि ८.** 'णवरि' ह्याचा 'तत्काल परिणाम' ह्या अर्थी उपयोग करावयाचा.

**किणो प्रश्ने ९.** किणो ह्याचा प्रश्नार्थी उपयोग करावयाचा. जसें:—किन्नु धूयसे = किणो धुव्वसि; किन्नु हससि = किणो हससि.

**अव्वो दुःखसूचनासंभावनेषु** १०. 'अव्वो' ह्याचा दुःख, सूचना व विचार ह्या अर्थाने उपयोग करतात. जसें:—अहो कज्जलरसरंजिताभ्यामक्षिभ्याम् = अव्वो कज्जलरसरंजिएहिं अच्छीहिं; अहो अपरमिव = अव्वो अवरं विअ; अहो एनमिवात्तुं = अव्वो णांमिव अत्तुं.

**अलाहि निवारणे** ११. 'अलाहि' ह्याचा उपयोग निवारण करणे ह्या अर्थाने करतात. जसें:—अलं कलहशेन= अलाहि कलहसेण; अलं कलहबंधेन = अलाहि कलहबंधेण.

**अइ वले संभाषणे** १२. कोणास संबोधून बोलणें झाल्यास 'अइ' 'वले' ह्यांचा उपयोग करतात. अपि मूलं प्रशुष्यति—अइ मूलं पसूसइ—अरे मूळ वाळलें काय? बले किं कलयसि अबले = वले किं कलेसि अबले.

**णवि वैपरीत्ये** १३. विरोध दाखविणे असल्यास 'णवि' ह्या निपाताचा उपयोग करतात. जसें:—विपरीतं तथा प्रहसति बाला = णवि तह पहसइ बाला.

**सू कुत्सायाम्** १४. 'सू' ह्याचा धिःकारार्थी उपयोग करतात. धिक् स्वप्नः = सू सिविणो.

**रे अरे हिरे संभाषणरतिकलहाक्षेपेषु** १५. रे, अरे व हिरे ह्यांचा उपयोग अनुक्रमें हाक मारणे, आनंद अथवा कलह दाखविणे असतां कराव-

याचा. जसें:—रे मा कुरुष्व=रे मा करेहि=रे, करूं नको. नागोऽसि अरे=णाओसि अरे. दिष्टोऽसि हिरे=दिट्ठो सि हिरे.

म्मिवमिवाविआ इवार्थे १६. म्मिव, मिव व विअ ह्यांचा 'इव' (सारखा) ह्या अर्थी उपयोग करावयाचा. जसें:—गगनमिव कृष्णम्—गअणं म्मिव, किंवा गअणं मिव, किंवा गअणं विअ कसणं.

अज्ज आमंत्रणे १७. अज्ज ह्याचा उपयोग मर्यादेने हाक मारणे झालें असतां करावा. जसें:—अहो महानुभाव किं करोषि=अज्ज महाणुहाव किं करेसि=हे महानुभाव, काय करतोस?

शेषः संस्कृतात् १८. आतांपर्यंत जें निरूपण केलें आहे त्याशिवाय जें उरलें असेल, तें संस्कृत व्याकरणावरून शिकावें.

---

# परिच्छेद १० वा.

पैशाची १. पिशाच्चांची भाषा ती पैशाची. व्याख्या व उदाहरणें देऊन तिजविषयीं खुलासा केला आहे.

प्रकृतिः शौरसेनी २. हिची प्रकृती म्हणजे मूळ शौरसेनी होय. शौरसेनी प्राकृताची गद्यात्मक ग्रंथ लिहिण्याची भाषा.

**वर्गाणां तृतीयचतुर्थयोरयुजोरनाद्योराद्यौ** ३. पैशाची भाषेचा असा एक सामान्य नियम आहे कीं, प्रत्येक वर्गापैकीं तिसरा व चौथा वर्ण एकाकी असून शब्दाच्या प्रारंभीं नसेल, तेव्हां त्याऐवजीं अनुक्रमें त्या वर्गाच्या पहिल्या व दुसऱ्या वर्णाचा उपयोग करावयाचा, म्हणजे 'ग' बद्दल 'क' 'घ' बद्दल 'ख', 'ज' बद्दल 'च', 'झ' बद्दल 'छ'. जसें:—गगनं—गकनं; मेघ—मेखो; राजा—राचा; निर्झर—णिच्छर; वडिश—वटिसं; दशवदन—दसवतनो; माधव—माथवो; गोविंद—गोपितो; केशव—केसपो; सरभस—सरफस; शलभः—सलफो.

**टीप**:—एकाकी म्हणण्याचें कारण कीं, संग्राम व व्याघ्र ह्या शब्दांत संयुक्त व्यंजनें असल्यामुळें संगाम व वग्घ अशीं रूपें होतात. अनादी म्हणण्याचें कारण कीं, गमन ह्याचें रूप गमन असेंच राहतें.

**इवस्य पिव** ४. 'इव' शब्दाच्या ठिकाणीं 'पिव' असा आदेश होतो. जसें:—कमलमिव मुखम्=कमलं पिव मुखं (कमळासारखें तोंड).

**णो नः** ५. या सूत्रावरून 'ण' च्या ठिकाणीं सर्वत्र 'न' आदेश होतो. जसें:—तरुणी—तलुनी.

**ष्टस्य सटः ६.** या सूत्राप्रमाणें ' ष्ट ' च्या ठिकाणीं ' सट ' आदेश होतो. जसें:—कष्टं मम वर्तते =कसटं मम वट्टइ.

**स्नस्य सनः ७.** ' स्न ' बद्दल ' सन ' आदेश होतो. जसें:—स्नान=सनान; स्नेहः=सनेहो.

**र्यस्य रिअः ८.** ' र्य ' बद्दल ' रिअ ' आदेश होतो. जसें:—भार्या—भारिआ.

**ज्ञस्य ञ्जः ९.** ' ज्ञ ' बद्दल ' ञ्ज ' आदेश होतो. जसें:—सर्वज्ञः=सवञ्जो; विज्ञातः—विञ्जातो.

**कन्यायां न्यस्य १०.** कन्या शब्दांतील ' न्य ' बद्दल ' ञ्ज ' आदेश होतो. कन्या—कञ्जा.

**ञ्ज च्च ११.** ' ञ्ज ' बद्दल ' च्च ' आदेश होतो. जसें:— कार्यं—कच्चं.

**राज्ञो राचि टाङसिङस्ङिषु वा १२.** राजन् शब्दास तृतीया, पंचमी, षष्ठी व सप्तमी ह्या विभक्तींचे प्रत्यय ' टा ', ' ङस् ', 'ङस्' व 'ङि' लागले असतां त्या शब्दाबद्दल ' राचि ' असा विकल्पें आदेश होतो. जसें—राज्ञा ( तृ )=राचिना, रञ्जा; राज्ञः (पं व ष) =राचिनो, रञ्जो; राजनि ( स )=राचिनि, राञ्जि.

**टीपः**—तृतीया, पंचमी, षष्ठी व सप्तमी एवढ्याच विभक्ती घेण्याचें कारण कीं, प्रथमेचें एकवचनी रूप राचा, द्वितीयेचें एकवचनी रूप राचानं व द्वितीयेचें बहुवचनी रूप रञ्जो अशीं होतात.

त्कस्तूनम् १३. 'क्त्व' प्रत्ययाबद्दल 'तूनं' असा आदेश होतो. जसें:—गृहीत्वा–घेत्तूनं; दत्वा–दातूनं.

त्हृदयस्य हितअकम् १४. 'त्हृदय' शब्दावद्दल 'हित-अकं' असा आदेश होतो. जसें:—हृदयं हरसि मे तरुणि=हितअकं हरसि मे तॅलुनि=हे तरुणी, तूं माझें त्हृदय हरण करतेस.

---

# परिच्छेद ११ वा.

मागधी १ 'मागधानां भाषा मागधी' म्हणजे मगध प्रांतांत राहणाऱ्या लोकांची भाषा ती मागधी. व्याख्या व उदाहरणें देऊन तिजविषयीं खुलासा केला आहे.

प्रकृतिःशौरसेनी २. हिची प्रकृती (मूळ) शौरसेनी होय. ह्या भाषेंत विशेष गोष्टी येणेप्रमाणें:—

षसोःशः ३. ष व स ह्यांऐवजीं 'श' आदेश' होतो. जसें:-माषः (उडीद) माशे; विलास (क्रीडा)=विलाशे.

जो यः ४. 'ज' बद्दल 'य' आदेश होतो. जायते (जन्मतो)—यायदे.

चवर्गस्य स्पष्टता तथोच्चारणः ५. चवर्गो यथा स्पष्टस्तथोच्चारणो भवति. जसें:–परिचयः = पलिचए; विजलः=वियले; निर्झरः=णिझले; गृहीतछलः = गहिदछले.

**हृदयस्य हडक्कः ६.** हृदय शब्दाबद्दल 'हडक्क' आदेश होतो. जसें:—हृदये मम आदरः = हडक्के आलळे मम.

**र्यर्जयोर्य्यः ७.** र्य व र्ज ह्यांबद्दल 'य्य' होतो. जसें:—कार्यम् = कय्ये; दुर्जन—दुय्यणे.

**क्षस्य स्कः ८.** 'क्ष' बद्दल 'स्क' होतो. जसें:—राक्षसः—लस्कशे; दक्षः—दस्के.

**अस्मदः सौ हके हगे अहके ९.** अस्मद् शब्दापुढें प्रथमेचा प्रत्यय 'सु' आला असतां त्याबद्दल 'हके,' 'हगे' व 'अहके' असे आदेश होतात. जसें:—अहं भणामि = हके, हगे, अहके भणामि.

**अत इदेतौ लुक् च १०.** अकारान्त शब्दास प्रथमेचा एकवचनी प्रत्यय 'सु' लागला असतां त्याबद्दल 'इ' व 'ए' आदेश होतात. केव्हां केव्हां प्रत्ययाचा विकल्पें लोप होतो. जसें:—एष राजा (हा राजा)=एशि लाआ; एष पुरुषः (हा पुरूष)= एशे पुलिशे, एश पुलिश.

**क्तांतादुश्च ११.** ज्या शब्दाच्या शेवटीं 'क्त' प्रत्यय आहे त्यापुढें 'सु' प्रत्यय आला असतां त्याबद्दल 'उ' आदेश होतो व 'च' शब्दावरून असें अनुमान करावयाचें कीं, 'इ' अथवा 'ए' आदेशही करावयाचा किंवा प्रत्ययाचा लोप करावयाचा. जसें:—हसितः= हशिदु, हशिदि, हशिदे, हशिद.

**क्त्वस्तूनम्** १३. 'क्त्व' प्रत्ययाबद्दल 'तूनं' असा आदेश होतो. जसें:—गृहीत्वा–घेत्तूनं; दत्वा-दातूनं.

**हृदयस्य हितअकम्** १४. 'हृदय' शब्दाबद्दल 'हितअकं' असा आदेश होतो. जसें:—हृदयं हरसि मे तरुणि=हितअकं हरसि मे तॅलुनि=हे तरुणी, तूं माझें हृदय हरण करतेस.

---

# परिच्छेद ११ वा.

**मागधी** १ 'मागधानां भाषा मागधी' म्हणजे मगध प्रांतांत राहणाऱ्या लोकांची भाषा ती मागधी. व्याख्या व उदाहरणें देऊन तिजविषयीं खुलासा केला आहे.

**प्रकृतिःशौरसेनी** २. हिची प्रकृती (मूळ) शौरसेनी होय. ह्या भाषेंत विशेष गोष्टी येणेप्रमाणें:—

**षसोःशः** ३. ष व स ह्यांऐवजीं 'श' आदेश' होतो. जसें:- माषः (उडीद) माशे; विलास (क्रीडा)=विलाशे.

**जो यः** ४. 'ज' बद्दल 'य' आदेश होतो. जायते (जन्मतो)—यायदे.

**चवर्गस्य स्पष्टता तथोच्चारणः** ५. चवर्गो यथा स्पष्टस्तथोच्चारणो भवति. जसें:—परिचयः = पलिचए; विजलः=वियले; निर्झरः=णिझले; गृहीतछलः = गहिदछले.

**हृदयस्य हडक्कः ६.** हृदय शब्दाबद्दल 'हडक्क' आदेश होतो. जसें:—हृदये मम आदरः = हडक्के आलले मम.

**र्यर्जयोर्य्यः ७.** र्य व र्ज ह्यांबद्दल 'य्य' होतो. जसें:—कार्यम् = कय्ये; दुर्जन—दुय्यणे.

**क्षस्य स्कः ८.** 'क्ष' बद्दल 'स्क' होतो. जसें:—राक्षसः—लस्कशे; दक्षः—दस्के.

**अस्मदः सौ हके हगे अहके ९.** अस्मद् शब्दापुढें प्रथमेचा प्रत्यय 'सु' आला असतां त्याबद्दल 'हके,' 'हगे' व 'अहके' असे आदेश होतात. जसें:—अहं भणामि = हके, हगे, अहके भणामि.

**अत इदेतौ लुक् च १०.** अकारान्त शब्दास प्रथमेचा एकवचनी प्रत्यय 'सु' लागला असतां त्याबद्दल 'इ' व 'ए' आदेश होतात. केव्हां केव्हां प्रत्ययाचा विकल्पें लोप होतो. जसें:—एष राजा (हा राजा) = एशि लाआ; एष पुरुषः (हा पुरूष) = एशे पुलिशे, एश पुलिश.

**क्तांतादुश्च ११.** ज्या शब्दाच्या शेवटीं 'क्त' प्रत्यय आहे त्यापुढें 'सु' प्रत्यय आला असतां त्याबद्दल 'उ' आदेश होतो व 'च' शब्दावरून असें अनुमान करावयाचें कीं, 'इ' अथवा 'ए' आदेशही करावयाचा किंवा प्रत्ययाचा लोप करावयाचा. जसें:—हसितः = हशिदु, हशिदि, हशिदे, हशिद.

**ङसो हो वा दीर्घत्वं च १२.** षष्ठीचा एकवचनी प्रत्यय जो 'ङस्' त्याऐवजीं 'ह' विकल्पें होतो व पूर्व स्वरास दीर्घत्व होतें. जसें:-पुरुषस्य धनम् -पुलिशाह धणे, पुलिशश्श धणे.

**अदीर्घः संबुद्धौ १३.** अकारान्त शब्दापुढें संबोधनार्थी 'सु' प्रत्यय आला असतां 'अ' स दीर्घत्व होतें. जसें:-मनुष्य आगच्छ=माणुशा आगच्छ =माणसा, ये; पुरुष आगच्छ=पुलिशा आगच्छ.

टीप:-संबोधन म्हणण्याचें कारण कीं, 'ब्राह्मणस्य धनं' ह्याबद्दल 'बम्हणश्श धणे' असें रूप होतें.

**चिष्ठस्य चिष्ठः १४.** 'चिष्ठ' बद्दल मागधींत 'चिष्ठ' असा आदेश होतो. जसें:-पुरुषास्तिष्ठति=पुलिशे चिष्ठदि.

**कृञमृङगमां क्तस्य डः १५.** कृ (करणे), मृ (मरणे), गम् (जाणे) ह्या धातूंच्या 'क्त' प्रत्ययाबद्दल 'ड' आदेश होतो. जसें:-कृतः-कडे; मृतः-मडे; गतः-गडे.

**क्त्वो दाणिः १६.** 'क्त्वा' प्रत्ययाबद्दल 'दाणि' असा आदेश होतो. कृत्वागतः = कारिदाणि आअडे सोढ्वा गतः = शाहिदाणि गडे.

**शृगालस्य शिआलाशिआलेशिआलकाः १७.** शृगाल शब्दाबद्दल शिआला, शिआले, शिआलक अशीं रूपें होतात.

---

# परिच्छेद १२ वा.

ह्या परिच्छेदांत शौरसेनी भाषेची थोडी माहिती आहे. संस्कृत नाटकांत अशिक्षित पात्रांच्या तोंडची जी भाषा ती मुख्यत्वें ही होय. पुढील प्रकार गद्यांत येतो.

शौरसेनी १.

प्रकृतिः संस्कृतं २.

अनादावयुजोस्तथयोर्दधौ ३.

व्यापृते डः ४. व्यापृतः—वावडे.

पुत्रेऽपिकचित् ५. पुत्रः—पुडो, पुडः.

इ गृध्रसमेषु ६. गृध्रः—गिद्धो.

ब्रम्हण्यविज्ञयज्ञकन्यकानां ण्यज्ञन्यानां ञ्जो वा ७.

सर्वज्ञेंगितज्ञयोर्णः ८. जसें:—सर्वज्ञ=सव्वण्णो.

क्त्व इअः ९. 'क्त्व' प्रत्ययाबद्दल 'इअ' होतो.

कृगमोर्दुअः १०. कृत्वा—कदुअ, गत्वा=गदुअ.

णिर्ज्जश्शसोर्वा क्लीबे स्वरदीर्घश्च ११.

भोभुवस्तिङि १२.

न लृटि १३.—'भू' धातूचीं भविष्यकाळी रूपें भविस्सादि, हविस्सादि व हुविस्सादि अशीं होतात; होस्स, होहिमि अशीं होत नाहीत.

ददातेर्दे दइस्स लृटि १४. दा (देणे) बद्दल 'दे' रूप होतें. जसें:—ददाति=देदि. पण भविष्य काळचें रूप 'दास्यामि' बद्दल दइस्सं रूप होतें.

डुकृञः करः१५. कृ ( करणे ) बद्दल 'कर' रूप होतें. कवितेंत 'कुण' असें रूप होतें.

स्थश्चिट्ठः १६. 'स्था' बद्दल 'चिट्ठ' रूप होतें.

स्मरतेः सुमरः १७. 'स्मृ' बद्दल 'सुमर' आदेश होतो.

दृशेः पेक्खः १८. 'दृश्' बद्दल 'पेक्ख' रूप होतें.

अस्तेरच्छः १९. 'अस्' ह्याबद्दल 'अच्छ' रूप होतें. जसें:—अस्मि=अच्छामि; पण 'अस्ति' बद्दल अत्थि रूप होतें, हें पुढील सूत्रावरून समजेल.

तिपात्थिः २०. हें पुढील सूत्रावरून समजेल.

भविष्यति मिपा स्सं वा स्वरदीर्घत्वं च २१.

स्त्रियामित्थी २२. 'स्त्री' बद्दल 'इत्थी' असा आदेश होतो.

एवस्य जेव्व २३.

इवस्य विअ २४.

अस्मदो जसा वअं च २५. 'वयम्' बद्दल 'वअं' असें रूप होतें; व परि. ६ सूत्र ३४३ ह्यांत सांगितलेलें 'अम्हे' हेंही रूप होतें.

सर्वनाम्नां ङे स्सित्वा २६.

धातोर्भावकर्तृकर्मसु परस्मैपदं २७. 'गद्यांत' परस्मैपदाचाच उपयोग करतात; आत्मनेपदाचा करीत नाहीत.

अनंत्य एच्च २८.

मिपो लोटि च २९.

आश्चर्यस्याच्छरिअं ३०.
प्रकृत्या दोलादंडदशनेषु ३१.
शेषं माहाराष्ट्रीवत् ३२.

---

समाप्त.

C
1205